मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव

# अजिंठा

नियतकालिक
१९८४-८५



मुख्य संपादक,
पी. एन. हुपरीकर.

विद्यार्थी प्रतिनिधी,
जयंत खडके.
कृष्णादास लोहार
सुनिल इंगळे

## अजिंठा संपादक मंडळ १९८४–८५



बसलेले डावीकडून –(१) प्रा. कु. सुरेखा छापेकर (२) श्री. कृष्णा लोहार (३) श्री. जयंत
(४) प्रा. हुपरीकर (५) प्राचार्य नेमाडे (६) उपप्राचार्य
(७) श्री. सुनील इंगळे (८) प्रा. डॉ. सौ. साळवेकर

उभे डावीकडून – (१) प्रा. हेमंत चौधरी (२) प्रा. एन्. डी. पाटील (३) प्रा. शा. न.

# मुळजी जेठा महाविद्यालय, जळगांव.

LIBRARY
RECEIVED
Date [illegible]
Signature

# अजिंठा

( नियतकालिक १९८४–८५ )

–:० प्रमुख संपादक ०:–

प्रा. पी. एन. हुपरीकर

–:० विद्यार्थी प्रतिनिधी ०:–

श्री. जयंत खडके
श्री. सुनिल इंगळे
श्री कृष्णा लोहार

मुखपृष्ठ सजावट– श्री. राजेंद्र सोनार

❊ प्रकाशक ❊
प्रा. पी. एन. हुपरीकर
मु. जे. कॉलेज
जळगांव. ४२५ ००२.

❊ मुद्रक ❊
श्री. रतनकुमार बारी
(बी. ए. स्पे. इंग्रजी)
अनमोल प्रिंटिंग प्रेस,
६३६, विठ्ठल पेठ बारीवाडा
जळगांव. ४२५ ००१.

# मुळजी जेठा महाविद्यालय, जळगांव.

# अजिंठा
## १९८४-८५

### -० संपादक मंडळ ०-

प्राचार्य- डी. एस. नेमाडे
उपप्राचार्य- डी. एच. महाजन
प्रमुखसंपादक- प्रा. पी. एन. हुपरीकर
प्रा. डॉ. सौ. साळवेकर
प्रा. कु. सुरेखा छापेकर
प्रा. डॉ. एच. बी. चौधरी
प्रा. शा. न. पाटील
प्रा. एन. डी. पाटील

-❊ विद्यार्थी प्रतिनिधी ❊-

१) श्री. जयंत खडके
२) श्री. सुनिल इंगळे
३) श्री. कृष्णा लोहार

# संपादकीय

अजिंठा नियतकालिकेच्या या अंकाद्वारे आपल्याशी हितगुज करताना आम्हास मनस्वी आनंद होत आहे. या अंकाद्वारे आमच्या महाविद्यालयाशी आणि त्यातील विविध प्रकारच्या उपक्रमांची हालचालींची कल्पना आपणास करून देण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे.

यावर्षी आपल्या देशाला मोठ्या संक्रमण अवस्थेतून जावे लागले. पंजाबच्या प्रश्नावर देशामध्ये हिंसाचार वाढू लागला. प्रत्येकजण चिंताग्रस्त झाला. भारतामध्ये काय होणार हा प्रश्न प्रत्येकाला भेडसावू लागला. सुवर्ण मंदिरातील सैनिकी कृतिनंतर पंजाबची समस्या संपली असे वाटत होते. परंतु प्रत्येक्षात वेगळेच घडले. हिंसाचाराची परिणती श्रीमती इंदिरा गांधीच्या क्रुर हत्येत झाली. त्यानंतर भारतात काय होणार याची चिंता प्रत्येक भारती याला आणि जगालाही होती परंतु श्री. राजीव गांधी यांनी देशामध्ये ठरलेल्या वेळेला निवडणूका घेतल्या. निवडणूकात कांग्रेस पक्षाला पूर्वी कधीच मिळाले नाही एवढे प्रचंड बहुमत मिळाले. भारतीयांनी लोकशाहीवरचा आपला विश्वास पुन्हा एकदा व्यक्त केला. श्री राजीवगांधी यांच्या खंबीर नेतृत्वाखाली देशाची प्रत्येक क्षेत्रात नेत्रदिपक प्रगती होईल याबद्दल मुळीच शंका नाही.

शैक्षणिक क्षेत्रात पुणे विद्यापीठाने सत्रपद्धतीचा पुर्नविचार करून ज्या परीक्षा पद्धतीत सुधारणा सुचवल्या आहेत, त्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें हितावह आहेत. सत्र पद्धती स्वीकारल्या पासून पुणे विद्यापीठाचा शैक्षणिक दर्जा घसरून चालला आहे का अशी भिती वाटत असे. यानवीन सुधारित परीक्षा पद्धतीत विद्यार्थ्यांना क्रीडा, कला आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांना जास्त वेळ देता येईल आणि त्यातूनच त्यांच्या व्यक्तीमत्वाचा विकास होईल त्याच प्रमाणे विद्यार्थ्यांना अभ्यासाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही कारण यापुढे परीक्षा विद्यापीठाने सत्रपद्धतीचा पुर्नविचार करून ज्या सुधारणा सुचवल्या आहेत त्यांचे विद्यार्थी,पालक आणि प्राध्यापक वर्ग निश्चितच स्वागत करील.

हे वर्ष आंतरराष्ट्रीय युवक वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. युवकांच्या हिताचे अनेक उपक्रम यावर्षी हाती घेण्यात आले आहेत. युवा पिढी पुढील आव्हानांना कसे सामोरे जावयाचे याचे योग्य मार्ग दर्शन आपण त्याना केले पाहिजे. युवा पिढी म्हणजे सळसळणारे रक्त, अमाप उत्साह ! युवा पिढीच्या प्रचड शक्तिचा उपयोग विध्वंसक कार्याकडे न होता तो विधायक कार्याकडे व्हावयास पाहिजे कारण त्यातूनच आपल्याला सामाजिक क्रांती साध्य करावयाची आहे. आजचा तरूण हा उद्याच्या भारताचा शिल्पकार आहे हे विसरून चालणार नाही. पुन्हा एकदा आंतरराष्ट्रीय युवा वर्षाचे हार्दिक स्वागत !

या अंकातील विविध उपक्रमांचे अहवाल महाविद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीचं दर्शन आपणास घडवतील त्याच प्रमाणे विद्यार्थ्यांच्या साहित्यामधून आजच्या युवापिढीचो प्रतिनिधीक स्पंदन आपल्या पुढे येतील अशी अपेक्षा आहे.

हा अंक नेटका, सुबक अन् आकर्षक करण्यासाठी अनेकांनी हातभार लावला आहे. या सर्वांचे आम्ही आभारी आहोत.

# महाविद्यालयीन वार्ता

१९८४-८५या वर्षातील महाविद्यालयीन वार्ता आपणापुढे सादर करतांना आम्हास विशेष आनंद होत आहे. आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी कला, क्रीडा आणि शैक्षणिक क्षेत्रात तर सुयश मिळवलेच. पण त्याच बरोबर आमच्या महाविद्यालयातील प्राध्यापकांनी विविध क्षेत्रात मौलिक कार्य करून महाविद्यालयाच्या यशास उज्वलता प्राप्त करून दिली.

## १) विविध क्षेत्रातील यश-

गेल्या वर्षातील विद्यापिठीय परीक्षांच्या निकालाच्या तुलनेत विज्ञान, कला आणि वाणिज्य या तिन्हीही शाखांमधील विद्यार्थ्यांनी उत्तम दर्जाचे यश संपादन करुन महाविद्यालयाच्या उच्च शैक्षणिक परंपरेत भर घातली आहे. प्रथम श्रेणी मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कला, विज्ञान आणि वाणिज्य या तिन्ही शाखांमध्ये दरवर्षी वाढतच आहे.

शैक्षणिक प्रगती बरोबरच कला आणि क्रीडा ह्या क्षेत्रातही आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी नेत्रदिपक यश मिळविले आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद यांच्यावतीने धरणगाव येथे झालेल्या सुगम संगीत स्पर्धेत महाविद्यालयाच्या संघाला प्रथम क्रमांकाची ढाल मिळाली. तसेच श्री. राम देशपांडे यांना प्रथम क्रमांकाचे वैयक्तिक पारितोषिक मिळाले. नूतन महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या संगीत स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाच्या संघास प्रथम क्रमांकाची ढाल मिळाली. कु. कस्तुरी दातारला प्रथम क्रमांकाचे वैयक्तिक पारितोषिक मिळाले. महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे यांच्या विद्यमाने दादर (मुंबई) येथे आयोजित केलेल्या राज्यपातळीवरील एकांकिका स्पर्धेत आपल्या संघाने सादर केलेल्या डॉ. तेजपाल चौधरी लिखित "अभिशप्त" या एकांकिकेस द्वितीय क्रमांकाचे सांघिक पारितोषिक मिळाले. सर्वोत्कृष्ट लिखाणाचे बक्षिस डॉ. तेजपाल चौधरी यांना देण्यात आले. या स्पर्धेत श्री. राजेंद्र मनसुटे यांना अभिनयाचे द्वितीय पारितोषिक मिळाले. आणि श्री. चंद्रशेखर त्रिपाठी यांना सर्वोत्तम दिग्दर्शनाचे पारितोषिक मिळाले. श्री.रविंद्र जोशी लिखित "बाळू जोशीला नक्की काय वाटतं ?" या एकांकिकेच्या संघाने यंदाच्या वर्षी वेगवेगळ्या स्पर्धेत एकूण १५०० रु. ची रोख पारितोषिके व अनेक वैयक्तिक बक्षिसे जिंकून यशाचा उच्चांक प्रस्थापित केला. याशिवाय मुंबई येथील 'युवक बिरादरी' यांच्या वतीने आयोजित केलेल्या सुगम संगीत स्पर्धेत श्री राम देशपांडे यांना प्रशस्तिपत्रक मिळाले. बी. जे. मेडीकल कॉलेज पुणे यांच्या विद्यमाने घेतलेल्या संगीत स्पर्धेत श्री. राम देशपांडे आणि श्री. नितीन केंकरे या दोघांना प्रशस्तिपत्र मिळाले. श्री. राजेंद्र मनसुटे यांनी 'खानदेश प्रतिष्ठान' यांच्या वतीने आयोजित केलेल्या एकपात्री प्रयोग स्पर्धेत तृतीय क्रमांक तर नूतन महाविद्यालयातर्फे उत्तम दिग्दर्शनाचे पारितोषिक मिळवले. नाट्य आणि संगीत क्षेत्रातील हे आमच्या विद्यार्थ्यांचे यश निश्चितच गौरवास्पद आहे.

या वर्षी कनिष्ठ आणि ज्येष्ठ महाविद्यालयातील खेळाडूंनी क्रीडा क्षेत्रात नेत्रदिपक यश मिळवून महाविद्यालयास अनेक पारितोषिके मिळवून दिली. अशा सर्व क्रिडापटूंचे हार्दिक अभिनंदन.

शिवाय ज्या ज्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रात विशेष दर्जाचे यश प्राप्त केले त्या सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन

## २) विज्ञान मेळावा-

यावर्षी आकाशवाणी मुंबई, आकाशवाणी जळगाव आणि मु. जे. महाविद्यालय जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने मु. जे. महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात गेल्या जानेवारी महिन्यात एक विज्ञान मेळावा भरवण्यात आला होता. या निमित्ताने एक विज्ञान प्रदर्शन देखील आयोजित करण्यात आले होते. आंतरराष्ट्रीय किर्तीचे शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मेळाव्याचे उद्घाटक जळगाव येथील प्रसिद्ध उद्योगपती श्री. भवरलाल जैन होते पूर्व खानदेश कॉलेज शिक्षणसंस्थेचे अध्यक्ष डॉ. आण्णासाहेब बेंडाळे यांच्या शुभहस्ते विज्ञान मेळाव्याची ज्योत प्रज्वलित करण्यात आली वैज्ञानिक गप्पा, वैज्ञानिक कथा-कथन, विज्ञानावरील किर्तन, आकाशदर्शन, दक्षिणे गंगोत्रीवरील मोहिम असे अनेक कार्यक्रम या निमित्ताने आयोजित करण्यात आले होते. विज्ञान प्रदर्शनास संबंध जिल्ह्यातून फारच चांगला प्रतिसाद मिळाला. विज्ञान मेळावा आणि विज्ञान प्रदर्शन हे खरोखर अविस्मरणीय होते.

३) प्राचार्य डी. एस. नेमाडे यांची पुणे विद्यापीठीच्या कार्यकारिणीवर सदस्य म्हणून निवड झाली. याबद्दल व्यवस्थापन आणि प्राध्यापक वर्ग यांच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. त्याच प्रमाणे व्यवस्थापन मंडळाचे सभासद नामदार श्री. जे. टी. महाजन, उद्योग आणि सामान्य प्रशासन राज्य मंत्री यांचा महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात समावेश झाल्याबद्दल त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला.

## ४) प्राध्यापकांचे मौलिक यश-

विद्यार्थ्यांना त्यांच्या सर्वांगीण विकासाठी प्रेरणा देत असतांनाच महाविद्यालयातील प्राध्यापकांनीही आपापल्या क्षेत्रात व इतरही अनेक क्षेत्रात लक्षणीय कार्य केले व बहुमान मिळवले.

प्राध्यापक ए. एस. भोळे यांनी भूगोलशास्त्र विषयातपुणे विद्यापीठाला पी. एच. डी. साठी सादर केलेल्या " Konkan : A Study in Rural Settlement " प्रबंधास विद्यापीठाने मान्यता दिली आहे. प्रा. भोळे यांनी पुणे विद्यापीठातील डॉ. एस. बी. सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली आपला प्रबंध सादर केला.

संख्याशास्त्र विभागातील प्रा. भागडीकर यांनी M. Phil ही पदवी प्राप्त केली. या वर्षी प्राणिशास्त्र विभागातील प्रा. सुरेश जावळे यांची M. Phil साठी निवड झाली.

प्रा. डॉ. ग. म. तल्हार दरभंगा येथे भरलेल्या All India Commerce Conference साठी महाविद्यालयाचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते यासभेमध्ये त्यांनी Problems of sick Industries in India ( wlith Special reference to small scale Industries) या विषयावर आपला पेपर सादर केला. जानेवारी ८५ मध्ये नाशिक येथे भरलेल्या ( Cost Accountants' Conference) ला ते उपस्थित होते. औरंगाबाद येथे S. B. College ने आयोजित केलेल्या Business styles for small Business या चर्चा सत्रासाठी त्यांची मार्गदर्शक शिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. "सहकारी महाराष्ट्र" या नियतकालीकांत Fruitsale Societies & Problems of Co. operatives in Jalgaon District हा त्यांचा लेख प्रसिद्ध झाला. वर्धा येथील G. S. College मध्ये M. Phil साठी Visiting Lecturer म्हणून त्यांची निवड झाली होती.

संरक्षण शास्त्र विभागातील प्रा. ए. पी. चौधरी आणि प्रा. एस. पी. बडगुजर यांनी अखिल भारतीय स्तरावरील पुणे येथे आयोजित केलेल्या अभ्यासक्रम चर्चा सत्रात भाग घेतला.

इंग्रजी विभागातील प्रा. सौ. नाडकर्णी प्रा. हुपरीकर, प्रा. याज्ञिक आणि प्रा. चिरमाडे पुणे येथे भरलेल्या All India English Teachers' Conference साठी महाविद्यालयाच्या वतीने उपस्थित होते.

प्रा. आर. डी. राणे, (अर्थशास्त्र विभाग) प्रा. एस. डी. सिरसीकर, (भूगोल विभाग,) प्रा. डॉ. के. बी. पाटील, (गणित विभाग,) प्रा. बाहेकर आणि

प्रा. सावळे, (इतिहास विभाग) यांची राष्ट्रीय प्रज्ञा शोध परिक्षा कृतीसत्रासाठी मार्गदर्शक शिक्षक म्हणून नियुक्ती झाली होती. महाराष्ट्र राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या कृतीसत्रात त्यांनी सहभाग घेतला.

महाविद्यालयातील प्राध्यापकांनी ग्रंथलेखनाचे मौलिक कार्य केले. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी तयार केलेल्या 'विद्यार्थ्यांसाठी अध्ययन पुस्तिका' आणि " शिक्षकांसाठी अध्ययन पुस्तिका " तयार केल्या आहेत. पदार्थ विज्ञान विभागातील प्रा. येवले हे त्याचे एक लेखक आहेत. ९ व्या इयत्तेसाठी नवीन अभ्यास क्रमानुसार प्रा. येवले यांनी लिहलेल्या Principles of physics या पुस्तकास महाराष्ट्रराज्य शिक्षण मंडळाने मान्यता दिली आहे.

| लेखक | पुस्तकाचे नाव |
|---|---|
| १] प्रा. एम. के. येवले | Appllied Physics प्रथमवर्ष इंजिनिअरींगच्या विद्यार्थ्यांसाठी |
| २] प्रा डॉ.ग.म सल्हार आणि प्रा बी.व्ही.नाईक | आयकर हिशोब तपासणी [टी.वाय.बी.कॉम ६वेसत्र] |
| ३] प्रा. ए. पी. चौधरी | "भारतीय सशस्त्रसेना उगम व विकास" [इ. ११ वी साठी] |
| ४] प्रा. सिरसीकर | १] मानवी भूगोल [भौतिक पार्श्वभूमि] २] मानवी भूगोल [प्राकृतिक पार्श्वभूमि] [ इ. ११ वी साठी] ३] अध्ययन पुस्तिका [ इ. १० साठी ] ४] अध्यापन पुस्तिका [१०वीला शिकवणाऱ्या शिक्षकांसाठी] |

विभागीय स्तरावर आयोजित केलेल्या प्राश्नि-कांच्या कृतीसत्रात विषयमार्गदर्शक शिक्षक म्हणून त्यांनी मार्गदर्शन केले " राष्ट्रीय प्रज्ञाशोध " परीक्षेच्या संदर्भात Bureau of Govt. Examinations, Pune, तर्फे Papersetter म्हणून त्यांची नियुक्ती झाली आहे.

उपप्राचार्य डी. एच. महाजन यांची अभ्यास क्रमानुसार ११ वी व १२ वी समाजशास्त्रावर पुस्तके प्रसिद्ध झाली. तसेच पु. ग. अभ्यंकर आणि प्रा. ए. जी. राव यांची वाणिज्य शाखातील अभ्यासक्रमावर पुस्तके झाली आहेत. प्रा. डॉ. चिरमाडे यांचे प्रसिद्ध होणाऱ्या " योजना " मासिकात प्रसिद्धझाले आहेत.

महाविद्यालयातील पदवीधर व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, विविध विषयांशी चर्चासत्रे इ.च्या निमित्ताने अनेक मान्यवर आमच्या महाविद्यालयास भेट देऊन मार्गदर्शनाचा लाभ करून दिला आहे. मान्यवर व्यक्तींचे आम्ही सदैव ऋणी राहू.

महाविद्यालयातील विविध प्रकारचे अभ्यासेतर हालचाली व वेगवेगळ्या त्यांच्या वर्षभरातील कार्यांचा परिचय या दिलेल्या विविध अहवालांवरून होऊ शकेल.

**स्टॉफवार्ता–**

नव्या प्राध्यापकांचे स्वागत यावर्षी ज्येष्ठ कनिष्ठ महाविद्यालयात खालील प्राध्यापकांच्या नवीन नेमणूका करण्यात आल्या.

**ज्येष्ठ महाविद्यालय–**

प्रा. डॉ. मिसेस के. सी. विप्रदास

**कनिष्ठ महाविद्यालय–**

प्रा. एस. व्ही. बलसाने (रसायनशास्त्र विभाग) प्रा. पी. डी. तळेले ( पी. टी. डिरेक्टर संरक्षणशास्त्र विभाग ) ; प्रा. पी. यू. [ इग्रजी विभाग ]

ज्येष्ठ आणि कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांचे आम्ही मनःपूर्वक स्वागत करतो. सर्व प्राध्यापक महाविद्यालयाच्या परंपरेत मौलिक घालतील असा विश्वास वाटतो.

यासर्वांचे आम्ही स्वागत करतो.

नवोगतांच्या स्वागताचा आनंदा व्यक्त असतानाच कांही मान्यवर प्राध्यापक निवृत्त असल्याचे दूःखही व्यक्त करण्याचे दिव्य करावे लागत आहे.

१] प्रा. डॉ. इफ्तिकार अहमद, उर्दू विभाग प्रमुख, हे महाविद्यालयाच्या प्रदीर्घसेवेतून निवृत्त झाले.त्यांचे अध्ययन व अध्यापन कौशल्य उल्लेखनीय होते. त्यांची आम्हास सदैव आठवण येईल. त्यांचे उर्वरित आयुष्य सुखाचे आणि भरभराटीचे जावो हीच आमची सदिच्छा!

२] प्रा. म. मो. केळकर (संस्कृत विभाग) प्रमुख हे यावर्षी महाविद्यालयाच्या प्रदीर्घ सेवेतून निवृत्त झाले आहेत.केळकर स रांचे अध्ययन व अध्यापनातील कौशल्य वाखाणण्यासारखे होते. संस्कृत साहित्य आणि मराठी साहित्याचा त्यांचा व्यासंग सखोल होता. त्यांच्या कुशाग्र विनोद बुद्धिची आम्हास सदैव आठवण येईल. त्यांची अभिजात रसिकता उल्लेखनीय होतो. त्यांचे उर्वरित आयुष्य सुखाचे आणि भरभराटीचे जावो हीच आमची सदिच्छा !

३] प्रा. शंकर पुणतांबेकर हेही याच वर्षी महाविद्यालयाच्या प्रदीर्घ सेवेतून निवृत्त झाले आहेत. एक अभ्यासू, निगर्वी व्यक्तिमत्त्व, व्यंग्य कथा लेखक आणि समीक्षक म्हणून डॉ. पुणतांबेकर सर्वांना परिचित आहेत. हिंदीसाहित्य संशोधन क्षेत्रात त्यांनी महत्वाची कामगिरी बजावली आहे. बऱ्याचशा विद्यार्थ्यांनी आपले संशोधन डॉ. पुणतांबेकरांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे. त्यांचे उर्वरित आयुष्य सुखाचे आणि भरभराटीचे जावो हीच आमची सदिच्छा !

महाविद्यालयाच्या कार्यालयातून डॉ एफ. सी. महाजन यांची व्याख्याता म्हणून नियुक्ति झाल्यामुळे ते नुतन महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून रूजु झाले त्यांच्या नविन कार्यात आम्ही त्याना सुयश चिंतितो.

भूगोल विभागातील सेवक श्री. एस. यू. मानकर हे बरीच वर्षे सेवा करून निवृत्त झाले. त्यांचे पुढील आयुष्य सुखाचे जावो हीच इच्छा !

वसती गृहातील एक सेवक के. टी. माळवे यांचे अल्पशा आजारा नंतर दुःखद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास परमेश्वर शांतीदेवो हीच प्रार्थना

कै. वासुदेवशास्त्री भिराशी, कै. ग. ल. ठोकळ कै. बा. म. बोरकर, कै. दत्तू फडकर, कै. ग. ह. खरे, या मान्यवर व्यक्ति आपणास कायमच्या सोडून गेल्या आहेत. त्यांना आमची विनम्र श्रद्धांजली या सर्वांच्या आत्म्यास परमेश्वर शांती देवो ही प्रार्थना !

आभार 'अजिंठा' नियतकालीक तयार करण्यासाठी अनेकांचे परिश्रम सहाय्य भूत ठरले आहेत. विद्यार्थि विद्यार्थिनींनी दिलेले स्वयंस्फूर्त लेखन सहकार्य, व्ही. जी. जोशी, ब्लॉक मेकर्स पुणे यांनी परिश्रम घेऊन केलेली मुखपृष्ठाची व ब्लॉकची छपाई विद्यार्थी श्री. राजेंद्र सोनार यांनी दिलेले मुखपृष्ठ याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

अजिंठ्याच्या छपाईची जबाबदारी अनमोल प्रिंटींग प्रेसचे व्यवस्थापक श्री रतनकुमार बारी यांनी अल्प मुदतीत अंक छापून दिल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. तसेच अनमोल प्रिंटींग प्रेस, मधील कर्मचाऱ्यांच्या सहकार्याबद्दल आम्ही आभारी आहोत. शिवाय ज्या हितचिंतकांनी अंकासाठी जाहिराती देऊन आम्हास सहकार्य केले त्यांचेही आम्ही ऋणी आहोत. आमच्या महाविद्यालयातील कर्मचारी वर्गानेही ह्या अंकाच्या छपाईसाठी वेळोवेळी जे सहकार्य केले त्याबद्दल त्यांचेही आम्ही आभारी आहोत. तसेच आम्हास प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे ज्यांनी सहकार्य केले त्यांचे ही मनःपूर्वक आभार !

प्रा. पी. एन. हुपरीकर
( प्रमुख संपादक ]

—० नूरी, पंजाबी व सफारी ड्रेस ०—
* ब्रेसिअर्स * बनियन्स * अडरवेअर्स
स्पेशलिस्ट – कल्याणी ड्रेसेस, पॅरीस ब्युटीज
ब्रेसिअर्स – उलन होजिअरी, काश्मीरी कोट
मिळण्याचे ठिकांण
श्रीगणपती स्टोअर्स
११, फुले मार्केट, जळगाव ४२५००१

# बिना सहकार नही उद्धार.

## मु. जे. महाविद्यालय कंझ्यु. को-ऑप. सो. लिमिटेड. जळगाव

विद्यार्थ्यांना लागणाऱ्या उपयुक्त वस्तु. लेखन साहित्य, तसेच सर्व प्रकारची ऑफिस स्टेशनरी व सौन्दर्यप्रसाधने यांचीं माफक दरात व अती उत्तम दर्जेदार मालाची विक्री करणारी जळगांवातील एकमेव संस्था-

ठिकाण- मु. जे. महाविद्यालय परिसर, जळगाव

**संस्थेच्या ग्राहक भांडारातूनच आपली खरेदी करुन आपल्या सेवेची आम्हास संधी द्यावी.**

**" ग्राहकांचा संतोष हेच आमचे ध्येय "**

राजाभाऊ एन कोलते
सेक्रेटरी
मु. जे. महा. कंझ्यु. को-ऑप सोसा. जळगाव

प्रा. एल. एन. पाटील
चेअरमन
मु. जे. महा. कंझ्यु. को-ऑप सोसा. जळगाव




स्वतंत्र्य भारताच्या इतिहासातील एका महान कर्तृत्त्वाचा अस्त !



दिवंगत पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांना भावपूर्ण श्रध्दांजली !



भारताचे माजी उपपंतप्रधान, महाराष्ट्राचे शिल्पकार व धुरंधर राजकारणी कै. यशवंतराव चव्हाण यांना आमची भावपूर्ण श्रद्धांजली !

खानदेश कॉलेज शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष



सुप्रसिद्ध उद्योजक कै. तुकाराम श्रीपत चौधरी यांना आमची भावपूर्ण श्रद्धांजली !

## मु. जे. महाविद्यालय, कार्यकारिणी सदस्य



कै. बापुसाहेब गाजरे
यांना आमची भावपूर्ण श्रद्धांजली !



नामदार जे. टी. महाजन, मॅनेजमेंटच्या समवेत



श्री. अनिल चौधरी-पुणे विद्यापीठ प्रतिनिधी



नामदार जे. टी. महाजन यांचा डॉ. अण्णासाहेब बेंडाळे सत्कार करताना



श्री. किरण जावळे
जनरल सेक्रेटरी – १९८३–८४



प्राचार्य डी. एस्. नेमाडे यांची विद्यापीठ कार्यकारिणीवर निवड झाल्याबद्दल नामदार जे. टी. महाजन सत्कार करताना



कु. छाया चौधरी
सर्वोत्कृष्ठ विद्यार्थिनी – १९८३–८४



सत्कार प्रसंगी नामदार जे. टी. महाजन
आपले मनोगत व्यक्त करताना



कु. जयश्री फडके–सर्वोत्कृष्ठ विद्यार्थिनी–१९८



नामदार जे. टी. महाजन यांच्या सत्कार प्रसंगी
डॉ. अण्णासाहेब बेंडाळे भाषण करताना



श्री. संजय कौरान्ने – एम्. कॉम्., परिक्षेत
महाविद्यालयातून सर्वप्रथम.
विद्यापीठ गुणवत्ता यादीत समावेश



डॉ. अण्णासाहेब बेंडाळे प्रा. नेमाडे यांची पुणे विद्यापीठाच्या
कार्यकारिणीवर निवड झाल्याबद्दल महाविद्यालयातर्फे
सत्कार करताना।



श्री. नवनीत वेद – बी. एस्. सी. परिक्षेत सर्व



वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी
प्राचार्य नेमाडे भाषण करताना



कु. शुभदा भागवत – बी. कॉम. परिक्षेत सर्वप्रथम



वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाच्या प्रमुख पाहुण्यांचा
प्राचार्य नेमाडे सत्कार करताना



कु. कल्पना चौधरी - बी. ए. परिक्षेत सर्वप्रथम



युवती सभा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाच्या वेळी
प्रमुख पाहुण्या श्रीमती बिसारिया यांचा सत्कार करताना



श्री. उदय अट्रावलकर – १२ वी (विज्ञान)
सर्वप्रथम



प्रमुख पाहुणे डॉ. बिसारिया (डी. एस्. पी.)
आपले मनोगत व्यक्त करताना



कु. विनया साठे – १२ वी (वाणिज्य) सर्वप्र



वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात
जिमखाना जनरल सेक्रेटरी आभार मानताना



कु. भारती वझे – १२ वी (कला) सर्वप्रथम



जिमखाना कार्यकारिणी १९८४–८५



श्री. राम देशपांडे – वेगवेगळ्या सुगम संगी
स्पर्धात पाच पारितोषिकाचे मानकरी.

# अजिंठा

## मराठी विभाग

# अनुक्रमणिका

१) महान युगाचा अस्त
सुनिल अ. मोगर
२) ब्रह्म घोटाळा
संजय नेवे
३) प्रति शिवाजी यशवंतराव
सौ. रेखा सावळे
४) खांडेकरांचे अंतरंग
कु. छाया जगन्नाथ पाटील
५) 'बाकीबाब' बा. भ. बोरकर
प्रसन्न देशपांडे
६) थापा मारणे एक कला
संतोष दत्तात्रय झरकर
७) पणतीची ज्योत
सौ. प्रतिभा आडगावकर भडंग
८) मी मुलगी आहे म्हणून
कु. विजया वि. जोशी
९) डिस्को पुराण
जयराज छपरीबंद
१०) आघात !
ज्योती रमेश शिंपी
११) कविवर्य कामचलाऊ
रविंद्र सोरानकर
१२) स्त्री आणि सौंदर्य
संजय भिमराव पाटील
१३) अशी झाली वधू परीक्षा
कु. सुजाता शा. पेटारे
१४) नाटककार गडकरी
चंदा जोशी
१५) प्रेमपुजारी बंडचा
चारुशिला पि. देशमुख
१६) मनुष्य अमर झाला तर
विजयकुमार हरी पाटील
१७) 'नशीब'
टी. जे. लोखंडे
१८) एका नटाची मुलाखत
दिलीप शिरसाट
१९) स्वरसम्राज्ञी लता
प्रमोद दत्तात्रय भंगाळे
२०) चंद्रकोर
मिलिन्द मधुकर कुळकर्णी
२१) कोरकूंचा देश वाघांचा प्रदेश
अभय प्र. उजागरे
२२) वळण
एम. डी. भारंबे

# महान युगाचा अस्त

सुनिल अ. मोगर
एस. वाय. बी. ए.
( Politics Special )



" भारताच्या दिवंगत पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी म्हणजे कर्तव्याचा व धैर्याचा महामेरू सागरासारखे अथांग व हिमालयासारखे उत्तुंग असे त्यांचे व्यक्तीमत्व त्यांच्या हत्येमुळे सारादेश शोकाकुल झाला. साऱ्या जगाला धक्का बसला त्यांच्या निधनामुळे एक महान युगाचा अस्त झाला. "

देशाची एकात्मता, अखंडता, सुरक्षितता अबाधित राहावी यासाठी त्या सतत प्रयत्नशील राहत. ३० आक्टोबर रोजी त्या एका भाषणात म्हणाल्या "मी माझे आयुष्य देशाच्या सेवेसाठी खर्चिले आहे. व त्याचा मला अभिमान आहे. आज जरी मला मृत्यु आला तरी माझ्या रक्ताचा थेंब न थेंब देशाला नवे वळण देईल. नेमके दुसऱ्या दिवशी कोणाच्या स्वप्नीमनी नसतांना ते बोल खरे ठरले. त्यामुळे सारा देश शोक सागरात बुडाला.

क्रांतीकारी घराण्यात जन्म:-

भारतातील थोर क्रांतीकारी, राष्ट्रभिमानी अशा नेहरू घराण्यात त्यांचा जन्म १९ नोव्हेंबर १९१७ रोजी झाला. बालपणी त्यांची मातोश्री कमलादेवी त्यांना नियमित रामायण, महाभारतातील वीर कथा सांगत. त्यामुळे त्यांच्यावर अत्यंत उत्तम संस्कार घडले होते.

तत्वनिष्ठ व शिस्तप्रिय :-

लहानपणी त्या आपल्या मातेप्रमाणे मनाने खंबीर, संयमी, मितभाषी होत्या. तत्वनिष्ठा व शिस्तप्रियता हे त्यांचे प्रमुख गुण होते. लहान वयात त्यांच्या मनावर गरीबांविषयी कळकळ, त्यागाची भावना, कठोर परिश्रम या गोष्टी बिंबल्या गेल्या

१९३० ते ४० याकाळात देशातील मान्यवर पुढाऱ्यांच्या ते नेतृत्वाखाली देशामध्ये राजकीय व सामाजिक चळवळ सुरू होत्या. बालवयातील इंदिराजीही चळवळीत उतरल्या, महात्मा गांधीजींनी पुणे येथे जातीय निवाड्यात केलेल्या एकदिवसाच्या उपोषणातही त्या सहभागी होत्या.

### महाराष्ट्रात शिक्षण :-

१९३२ ते ३३ मध्ये पुण्यातील 'प्युपिल ओम स्कूल' मध्ये त्या होत्या पुण्यात त्यांना महाराष्ट्राच्या यथार्थ संस्कृतीचे दर्शन घडले नंतर मुंबई विद्यापीठांची मॅट्रीक परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांना गुरूदेव रविन्द्रनाथ टागोरांच्य "शांतिनिकेतनात" पाठविण्यात आले. तेथे टागोरांच्या सहवासात त्यांनी संस्कृती, विचारस्वातंत्र्य, निधर्मीपणा ह्या साऱ्या गोष्टींचे अध्ययन केले. शांतिनिकेतनातील शिक्षणा नंतर पाश्चात्य जगाची ओळख व्हावी म्हणून त्यांना स्वित्झर्लंडमध्ये पाठविले. तेथे त्यांनी इंग्रजी भाषा उत्तमरित्या अवगत केली. स्वित्झर्लंडहून आल्यावर २८ फेब्रुवारी १९३६ रोजी कमलादेवी यांचे दुःखद निधन झाले तरीही त्या डगमगल्यानाहीत आपल्या अभ्यासातखंड पडू दिला नाही. त्या स्वित्सर्लंडमध्ये असतांना त्यांची ओळख फिरोज गांधीशी झाली. परिचयाचे रुपांतर प्रेमात झाले. २६ मार्च १९४२ रोजी त्यांचा विवाहसोहळा मोठ्या थाटात पारपडला

### चलेजाव आंदोलनात सहभागी :-

ऑगस्टमध्ये गांधीजींनी इंग्रजांना 'चलेजाव' चा आदेश दिला. तेव्हा ब्रिटिश सरकार व भारतीय जनता यांच्यात संग्राम सुरू झाला. व जवाहरलालजींना अटक झाली. इंदिराजी आंदोलनात सहभागी झाल्या. ११ सप्टेंबर रोजी त्यांची तुरुंगात रवानगी झाली. १३ महिने त्यांनी तुरुंगवास भोगला.

### काँग्रेसच्या अध्यक्षपदी अविरोध निवड :-

१९५९ मध्ये नागपूरला अ. भा. काँग्रे[illegible] अधिवेशन झाले. या अधिवेशनात काँग्रेसचे अ[illegible] म्हणून त्यांची एकमताने निवड झाली. अ[illegible] पदाची सूत्रे हाती घेतल्यावर पक्षात शिस्त नि[illegible] करण्यास सुरूवात केली.

### महाराष्ट्र निर्मितीत मोठा वाटा :-

संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी प्र[illegible] लढा सुरू होता. त्याला काँग्रेसचा विरोध होता. [illegible] त्यांनी जवाहरलालजींचे मन वळवून त्या माग[illegible] मान्यता मिळवून दिली १ मे १९६० रोजी मरा[illegible] भाषा जनतेच्या महाराष्ट्र राज्याचे स्वप्न सा[illegible] झाले. महाराष्ट्राच्या दृष्टीने तो " सोनि[illegible] दिवस " ठरला.

त्या राजकारणात यशस्वी होत असताना [illegible] त्यांच्यावर एक आघात झाला. त्यांचे पति फिरो[illegible] गांधी यांचे ८ सप्टेंबर १९६० रोजी हृदयविका[illegible] निधन झाले. परंतु त्या न डगमगता व मुला[illegible] पाहून आपले दुख गिळले. एकटेपणाचे दुःख [illegible] करण्यासाठी त्यांनी स्वःताला अधिक व्यापात वि[illegible] कामात गुंतवून घेतले.

### सैन्याला दिलासा

१९६१ मध्ये त्यांची काँग्रसच्या केंद्रिय निवड[illegible] समितीवर नियुक्त झाली. १९६२ मध्ये जब[illegible] मध्ये जातीय दंगल उसळली. त्या स्वतः [illegible] ग्रस्त भागात गेल्या व तेथील दंगल ग्रस्तांना वि[illegible] दिला. याच वर्षी मित्र म्हणणाऱ्या चीनने भार[illegible] आक्रमण केले.कोणाची वाट नपहाता त्याकडा[illegible] थंडीत सैन्याचे आत्मबळ वाढविण्यासाठी सीमेवर [illegible] त्यांच्या आगमनाने जवानांचा विश्वास दुणा[illegible]

आपल्या शस्त्र सामुग्रीच्या बलावर ते निकराने लढले. पुढेचीनला माघार घ्यावी लागली.

### पितृ छत्र हरवले :-

२७ मे १९६४ रोजी जवाहरलालजींचे दुःखद निधन झाले. त्यानंतर शास्त्रीची पंतप्रधान म्हणून निवड झाली. शास्त्रींनी इंदिराजीना आपल्या मंत्री मंडळात माहिती व नभोवाणी मंत्री म्हणून समावेश केला. त्यांनी आपल्या खात्याची त्वरित पुर्नरचना केली. अमेरिका, युगोस्लाव्हिया, रशिया या देशांचा सदिच्छादौरा केला व भारतात प्रथम दिल्ली येथे दूरचित्रवाणीची सुरुवात केली.

### पंतप्रधान पदी निवड :-

११ जानेवारी १९६६ रोजी शास्त्रीचे निधन झाले तेव्हा इंदिराजी पंतप्रधान बनल्या. त्या पंतप्रधानपदी असतांना देशाची स्थिती गंभीर होती. ती सुधारण्यासाठी त्यांनी आर्थिक धोरण जाहीर केले. पाकिस्तान युध्दामुळे दुरावलेले भारत - अमेरिका संघ नव्याने प्रस्थापित करण्याचे काम हाती घेतले. अमेरिका, रशिया, फ्रान्स, इस्त्राएल आदी देशांशी स्नेहसंबंध निर्माण केले. आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर चर्चा केली व स्वतःच्या मुत्सद्दीपणाची चुणूक दाखविली.

### अनेक प्रश्न सोडविले :-

महाराष्ट्रात व बिहारमधील काही भागात दुष्काळ पडला होता. तेव्हा दुष्काळग्रस्त भागात भेटी देऊन त्या ठिकाणी अवश्यक तो धान्य पुरवठा केला. युगोस्लाव्हियाचे पंतप्रधान मार्शल टिटो व इजिप्तचे अध्यक्ष नासेर यांच्या बरोबर वाटाघाटी करून तसेच व्हिएतनामच्या ज्वलंत प्रश्नावर युध्दबंदी करून शांतता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न केले.

अत्यंत जागरूकपणे देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा अंदाज घेऊन प्रत्येक प्रश्नांवर यशस्वी तोडगा शोधून काढला.

### पुन्हा पंतप्रधानपदी निवड :-

निवडणूकीनंतर पुन्हा त्यांची पंतप्रधानपदी नेमणूक झाली. २३ मार्च १९६७ रोजी त्यांनी पंतप्रधानाची शपथ घेतली.

### बँकांचे राष्ट्रीयकरण :-

त्यांची लोकशाही समाजवादावर नितांत श्रध्दा होती. गरीब पीडित, दुर्बल, इ. लोकांना फायदा व्हावा. या उद्देशाने त्यांनी चौदा खाजगी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. त्यानंतर त्यांनी आणखी एक धाडशी पाऊल उचलले. ७ सप्टेंबर १९७० रोजी एकवटहुकम काढून संस्थानिकाना भरपाई देवून त्याचे तनखे बंद केले. संस्थानिकांनी सुप्रीम कोर्टात दाद मागितली. काहीत्रुटी दाखवून तो वटहुकम रद्द केला. त्रुटींची पूर्तता करून त्यांनी ते विधेयक लोकसभेत मंजूर करुन घेतले.

### कर्तृत्वाचा साऱ्या जगात गौरव :-

३ डिसेंबर १९७१ रोजी पाकने भारतावर हवाई आक्रमण केले. भारताच्या आरमाराने कराची बंदरात घुसून पाकिस्तानची कोंडी केली. १६ डिसेंबर १९७१ ला पाकिस्तानचे जनरल नियाझी शरण आले. १७ डिसेंबर रोजी पाकिस्तानने बिनशर्त शरणागती पत्करली. स्वतंत्र बांगला देशाला मान्यता मिळाली. इंदिराजींना देशात " दुर्गादेवी, 'महिषासुर मर्दिनी " रणरागिणी, अशा पदव्या बहाल करण्यात आल्या. भारताच्या राष्ट्रपतींनी त्यांना ' भारतरत्न ' म्हणून गौरविले

## दुर्बलांसाठी २० कलमी कार्यक्रम :-

१ जुलै १९७५ रोजी दुर्बल जनतेच्या अडचणी निवारण करण्यासाठी वीस कलमी आर्थिक कार्यक्रम जाहीर केला. काळाबाजारवाल्यांची मालमत्ता जप्त करणे, प्राप्तीकरात सवलत, हातमाग धंदयाचा विकास, भूमिहिनांना व दुर्बलांना सरंक्षण, शहरी मालमत्तेवर कमाल धारणा मर्यादा इ. कलमात समावेश होता. नंतर कुटुंब नियोजन, वन संवर्धन, बालकल्याण, नागरी विकास, अशीकलमे जोडण्यात आली. जनतेच्या हितासाठी अनेक ठराव मांडून भारतीय घटना दुरूस्त करून घेतली.

## विज्ञान तंत्रज्ञानावर भर :-

आधुनिक जगाचे प्रश्न सोडविण्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञानाचा उपयोग करून घ्यावा अशी त्यांची धारणा होती. जनतेच्या कल्याणासाठी त्यांनी 'थुंबा अग्निबाण प्रक्षेपण केंद्र'' सुरु केले. १९७३ मध्ये पहिला भारतीय उपग्रह ''आर्यभट्ट' यांच्या कारकिर्दीत अवकाशात सोडण्यात आला. शांततेसाठी त्यांनी भूगर्भांतर्गत अणुस्फोट घडवून आणला. अमेरिकेचा 'पी. एल. ४८०१ करार त्यांनी संपुष्टात आणला. तेलामुळे परकीय चलनावर फार मोठा खर्च होतो. म्हणून त्यांनी मुंबई नजीक समुद्रात तेल विहिरी खोदण्याची कार्यवाही केली. एवढेच नव्हे तर रशियाच्या सहकार्याने श्री राकेश शर्मा या अंतराळवीरास अंतराळात देखील पाठविले. या सर्व घटनेमुळे भारताचे महत्त्व जागतिक पातळीवर निश्चितच वाढले.

## एशियाडचे आयोजन :-

इंदिराजी सत्तेवर असतांना त्यांनी एशियाड क्रीडास्पर्धा भारतात घेण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे भारताची शान वाढली. भारतीय क्रीडापटूंना प्रोत्साहन मिळाले. १९ नोव्हेंबर रोजी [illegible] एशियाडचे उद्घाटन केले.

## अलिप्तराष्ट्र परिषद :-

मार्च ८३ मध्ये दिल्ली येथे त्यांनी [illegible] राष्ट्रपरिषद भरवली ही परिषद भरविण्यात [illegible] ताचामोठा वाटा होता. या परिषदेचे नेतृत्व करण्या[illegible] बहुमान त्यांना मिळाला त्यांमुळे त्यांच्या राज[illegible] मुत्सद्देगिरीची सर्वांना प्रत्यय आला. या परिषदे[illegible] जगात भारताचे महत्व वाढले. अमेरिकेचे [illegible] रोनाल्ड रीगन यांनी " आग्नेय आशियाक्षेत्रा[illegible] भारत हा एक महत्वाचा देश म्हणून गौरव [illegible] साऱ्यादेशात भारताची प्रतिमा उज्ज्वल झाली. [illegible] श्रेय इंदिराजींनाच आहे.

## पंजाब समस्या :-

गेल्या काही महिन्यापासून पंजाबची सम[illegible] भेडसावीत होती. देश एकसंघ राहावा. दहशत[illegible] निपटून काढावा. मंदिरांचे; पवित्र स्था[illegible] रूपांतर सशस्त्र अतिरेक्यांच्या केन्द्रात होऊ [illegible] साठी सामोपचाराचे सर्व प्रयत्न संपल्यावर [illegible] अमृतसर मधील सुवर्ण मंदिरात सैन्य पाठवि[illegible] निर्णय घेतला. यामुळे त्यांची देशाभिमानी, [illegible] देशप्रेम, धाडस दिसून येते. या घटनेतून [illegible] माथेफिरूने त्यांच्यावर निर्घृण हल्ला केला. व [illegible] हत्या केली. व साऱ्या मानव जातीला कलंक [illegible]

इंदिराजींचे राजकीय कर्तृत्व, त्यांची [illegible] जनमानसातील त्यांचे अजोडस्थान, देशातील [illegible] विदेशातील त्यांची प्रतिमा सारेच काही अलौ[illegible] होते. पंतप्रधान पदाच्या कारकिर्दीत आंतरराष्ट्री[illegible] क्षेत्रात भारताची शान व मानउंचावली सर्वच [illegible] धडाडीचे निर्णय घेऊन आपल्या कणखर नेतृत्वा[illegible] सर्वांना प्रत्यय आणून दिला. आपल्या 'गरिबी हटा[illegible] या मत्राने साऱ्यांना सामाजिक कर्तव्याची जाणीव करून दिली. देशाच्या प्रगतीला विज्ञान तत्रज्ञानाची जोड देऊन विज्ञान क्षेत्रात भारत मागे नाही हे जगाला दाखवून दिले. आपल्या २० कलमी कार्यक्रमाने देशातील दीनदलीत जनतेला विकासाची दिशा दाखविली. आपल्या विदेशी धोरणाने भारताचे जगामध्ये महत्त्व वाढविले. भारतीय जनतेचेही त्यांच्यावर कितीप्रेम, किती श्रद्धा, किती विश्वास. होता याचा प्रत्यय आपणास त्यांच्या निधनानंतर अंत्यसंस्कारापर्यंतच्या चार दिवसात आला. यावरून त्यांची अलौकिकता सिद्ध झाली. इंदिराजींनी आपल्या कर्तृत्वाने आपले असे एक महान युग निर्मिले होते. त्यांच्या निधनाने त्या महान् युगाचा अस्त झाला आहे.

● ● ●

## जीवनाची विशाल दृष्टी !

मूल जेव्हा नव्याने चालू लागते तेव्हा शंभरदा पडते. परंतू एकदा उभे रहाते. त्या मुलाचे लक्ष पडण्याकडे नसते. उभे राहताच ते आनंदाने नाचू लागते. आपल्या जीवनाचे असेच आहे. दुःखे आपत्ता आहेतच परंतू त्यामुळे आपण दुर्बळ आहोत असेच मनात समजाल तर सारीच उमेद नष्ट होईल. कार्य क्षेत्रातील काही विवाक्षित गोष्टीवरच भर देऊन भर देऊन बसाल तर अपयशच दिसेल, दुःखेच दिसतील. परंतु जीवन तुम्हाला विशाल दृष्टी घ्यायला सांगत असते. म्हणजे एका पलीकडची पूर्णता दिसते, ध्येय दिसते. तिकडे जायची आशा उत्पन्न होते. श्रद्धा जागी होते. स्थलकालाची बंधने जातात प्रबल इच्छाशक्ती घेऊन राहिले पाहिजे असे वाटू लागते.

---

# आनंदाशिखर

कु. स्वाती ल. पाठक
१२ वी आर्टस्

निळसर मेघातल्या रूपेरी सरी
वसुंधरेच्या देहावरी

मोती झेलती ही सुमनें
ओठात कवीच्या धुंद तराणे

ओलावलेल्या वृक्षवेली
भिजलेली पाने शहारली

भिजरे पंख विहगांचे
हसरे मुख रानफुलाचे

आता आकाश निवळलेले
काळे मेघ पळालेले

हळूच किरण ते रवीचे
मृदु तृणावरती साचे

प्रसन्न, उत्कट त्या वातावरणे
बहरली, मोहरली ही सुमने

आनंदाच्या शिखरावरती
मयूर धुंद ते थयथयती

* * *

## लपंडाव

महाजन डी. यू.
टी. वाय. बी. कॉम.

वेली वरच्या फुलांशी
खोडया करती त्या कळया
पारावरचा पिंपळ
आज वाजवितो टाळया ॥१॥

झाडाच्या मोठ मोठया
लांब पडल्या सावल्या
वेल मुरक मारून
त्यांना दाखविते वाकुल्या ॥२॥

कधी कधी येते थोडी
दाट पाण्याची फुवारी
निळया निळया आभाळात
चाले ढगांची सवारी ॥३॥

बंद झाल्यावर सरी
पाण्याची साचती डबकी
अनेक पाखरांच्या पलटणी
त्यात करती आंघोळी ॥४॥

आता मात्र तसे नाही
पाण्याची डबकी साचत नाही
मानव, पाखरे आतुर होती
लपंडाव खेळून पाऊस घेतो सचोटी ॥५॥

* * *

## सुहास्यवदना

नन्नवरे एम. ए.
एफ. वाय. बी. कॉ.

सर्व सर्व विसरलो
आणि आलो तुझ्यासाठी
हाल अपेष्टा सोसल्या
निंदा मिरविली पाठी

कोणी उधळला डाव
कोणी विस्कटला खेळ
मृत्यू कवेमध्ये घ्यावा
अशी आली होती वेळ

तुझ्या शद्बांनी त्यावेळी
माझा सावरला तोल
तुझ्या पापणीने तेव्हा
मला घेतले जवळ

हात हातात घेतले
सुरु जाहला प्रवास,
आता आपल्या दैवाला
घेतो सुखाचा सुवास !

*

## ब्रह्म घोटाळा !

संजय नेवे
टी. वाय्. बी. एसी.

'काय हे, श्रीयुत शेंगदाणे, तुम्हाला साधा रजेचा अर्ज लिहिता येत नाही. किती चुका आहे यात.? धड मराठी येत नाही आणि हे म्हणे मराठी भाविक! मिसेस काय आणि डिलीव्हरी काय? मारकुटे साहेब शेंगदाण्यांना, खडसावतांत. शेंगदाणे यांना मिसेस्‌च्या पाचव्या डिलिव्हरी करता रजा हवी असते.

मारकुटे साहेब हे मूळचे पुण्याचे त्यामुळे त्यांचे मराठी प्रेम फार. त्यांनी ऑफीसचे सर्व व्यवहार मराठीतच करावे असा फतवा काढला.

आणि त्या दिवसापासून ऑफिस् – माफ करा कार्यालयाचे सर्व कामकाज मराठीत सुरू झाले. सर्व मराठीमय झाले.

या मराठीकरणाचा जास्त परिणाम झाला तो सदाशीव या आमच्या शिपायावर. तो या उप क्रमात अग्रभागी होता. त्याचे सर्व बोलणे शुध्द मराठीत होते.

तो (सदा माझ्याकडे आला आणि काही कागद टेबलावर ठेवल. माझे त्या कागदांकडे लक्षच नव्हते. तो म्हणाला, "मोठया साहेबांनी नक्कल करायला सांगितली आहे."

मी हवेत उडालो ! इथे 'साहेब' नामक प्राणी हजर असतांना हा त्याचीच नक्कल करतो. "काय? इथे नक्कल ?" अरे, इथे तो लांडगा हजर असतांना तू त्याची नक्कल करणार म्हणजे खलास" इती मी.

"अहो, साहेब नक्कल म्हणजे या कागदांची डूप्लिकेट कॉपी करायची आहे" तेंव्हा कुठे आमच्या डोक्यातली टयूब पेटली

मी आणि राजा ( आमचा सहकारी ) किंग्ज-सर्कलला जाणार होतो. नेहमी प्रमाणे आम्ही बसची वाट बघत होतो. आलीच ती. आम्ही पुढे सरसावलो आणि त्या बसमध्ये कसेबसे चढते झालो.

" छूट्टे पैसे निकालो. कहाँ जाता है ? "
कंडक्टर आपल्या तोऱ्यात

राजा " अरे, मराठी माणूसना तू.? मग मराठी-तच बोल की ! "

" बरं, बरं, कुठे जावयाचे आहे आपणास ? "
मी " राजा चे वाटोळ घ्या दोन "

" अं ! राजाचे वाटोळं ! " कंडक्टर ओरडला " है तुला काय समजणार इंग्रजीचा बच्चानातू शेवटी बर दोन किंग्ज सर्कल वे. "

आजू बाजूचे प्रवासी कंडक्टरची फजिती ऐकत होते. ऑफीमध्ये मात्र सदाशीव सूचनांचे तंतोतंत पालन करीत होता. ट्र कॉपीला नक्कल, पिन्स ला ' टाचण्या, ' पेन ला ' झरणी, ' असे शब्द वापरत होता.

मराठीकरणातून उद्‌मणारे विनोदांमुळे ऑफीसचे वातावरण आनंदमय होते. एकंदरीत ऑफीस विनोदी झाले होते.

नवखा माणूस मात्र या मराठी करणा मुळे बावचळून गेला होता.

संध्याकाळी ५-३० ला ऑफीस सुटायची वेळ पण मुली, मात्र ८-३० वाजल्या पासूनच कोठेतरी गडप होत्या सहज म्हणून मी या संबंधी सदाला विचारले तर तो म्हणे " त्या मुखचूर्ण ओष्ठशलाका लावत आहेत " मी बुचकळ्यात पडलेला पाहून साहेब (सदा) उद्गारले " अहो साधं ' मराठी समजत नाही. त्या स्नो, पावडर लिप्स्टिक यांचा उपयोग करीत आहेत. मेकअपरूम मध्ये " त्याच्या या मराठी करणामुळे मला काही नवीन शब्द समजले.

एकादशीच्या दिवशी मी डबा नेला नव्ह तेंव्हा इतरांचा डबा मी शेअर करीत होतो. साहे बांचे बोलावणे आले पण थोडा ऊशीर झाला ' साहेबांनी इतकावेळ काय करीत होता म्ह विचारले.'

मी "मिस् मिरा ने दिलेला कीस घेत वाक्य पु होण्याच्या आत साहेब ओरडले " काय मिस मि आणि किस. हे ऑफीस आहे. वाटेल ते बोलू न थांबा मी आताच या गोष्टीचा सोक्षमोक्ष लावतो असे म्हणून साहेब तिरीमीरीत उठले. आणि केबी बाहेर जाण्यास निघाले. तोच मिरा केबीन येत होती. तिच्या हातात टिफीन होता. ति साहेबांची टक्कर थोडक्यात बचावली. टिफीन म बटाटयाचे चिप्स, वेफर्स वगैरे होते.

साहेबांनी तिला विचारले ' हे काय म्ह आहेत. तुम्ही यांना किस दिलात ? "

" हो " ती " बाहेर सर्वांना देऊन झा आणि आता मी तुम्हाला देण्यासाठी येत आहे हे ऐकून व तिचा किस देण्याचा पवित्रा बघून सा मागे सरकून खुर्चीला अडकून खाली पडले. त्य त्यांना बटाटयाचा कीसचा गैर अर्थ लावला होत

शेवटी ते पावणे दोनशे पौंडाचे धूड आप (अर्थात साहेबांचे) त्यांचे घरी पोहचते करावे ला व त्या दिवसापासून शुद्ध मराठीकरण बंद कारभार सुरळीत सुरु झाला.

# ' प्रति शिवाजी यशवंतराव '

सौ. रेखा सावळे
एम. ए. सीनियर

आपल्या प्रभावी व्यक्तिमत्व आणि कर्तबगारीने महाराष्टाचा गौरवशाली इतिहास घडवून भारताच्याही इतिहासावर महाराष्ट्राचा ठसा उमटविण्यांत महाराष्ट्रातील ज्या अपवादात्मक थोर विभूति.होऊन गेल्या त्यापैकी यशवंतरावजी चव्हाण हे एक होत.

यशवंतरावांचा जन्म अत्यंत गरीब अशा सामान्य शेतकरी कुटुंबात १२मार्च१९१४ला सातारा जिल्हयाच्या देवराष्ट्रे या खेडेगावी झाला. खेडयातील जीवन जगणाऱ्या कुटुंबांना अजून विकासाचा मार्ग दिसलेला नव्हता. कित्येक पिढया अत्यंत बिकट असह्य आणि वेदनेचे जीवन जगत आलेल्या होत्या अशा या पारंपारिक व संकुचित जीवनाचा त्याग करता यावा म्हणून त्यांचे वडील बळवंतरावजींनी शहरी जीवनाचा आश्रय घेतला.

कोर्टातील एका जज्जच्या ओळखीनं वडील बेलीफ म्हणून नोकरीला लागले आणि कऱ्हाड येथे ते राहू लागले परंतु वयाच्या अवघ्या पाचव्या वर्षीच वडिलांचे निधन झाले. त्यामुळे पितृसुखाला ते पारखे झाले. पित्याच्या निधनाने त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगरच कोसळला. परंतु माता विठाबाई मोठ्या धीराच्या. काबाडकष्ट करून त्यांनी आपल्या मुलांना उणे पडू दिले नाही.



यशवंतरावजी चव्हाण

मराठी चौथीपर्यंतचं त्यांचं शिक्षण घाटगे मामांकडे देवराष्ट्र या गावी झाले. माध्यमिक शिक्षण कऱ्हाडच्या टिळक हायस्कूल मध्ये झाले. १९३४ला ते मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण झाले. कॉलेजचं शिक्षण कोल्हापूर आणि पुणे येथे घेतले. सन १९३८ ला

इतिहास आणि अर्थशास्त्र या विषयातून बी. ए. ची पदवी घेतली पुढे दोन वर्ष कायद्याचा अभ्यास पूर्ण करून एल्. एल्. बी. ची पदवी मिळविली. सनद घेऊन सन १९४२ पासून त्यांनी वकिलीच्या व्यवसायाला प्रारंभ केला. त्याचवर्षी जून महिन्यात त्यांचा फलटण येथील मोरे घराण्यातील वेणूताईंशी विवाह झाला.

यशवंतरावांना विद्यार्थीदशेत शिक्षण घेतांना अतिशय कष्ट सहन करावे लागले. शिक्षणाच्या खर्चासाठी कधीही त्यांनी थोरामोठ्याकडे याचना केली नाही. महाविद्यालयीन शिक्षण घेणारे विद्यार्थी अंगात कोट परिधान करीत. पण यशवंतरावजींना कोटच काय पण पायात साध पायतण देखील नसायची पण मित्रमंडळींनी मात्र या काळांत त्यांना बराच आधार दिला.

विद्यार्थीदशेत त्याना अवांतर वाचनाचा मोठा छंद होता. पुस्तक केवळ वाचून बाजुला न ठेवता, त्या पुस्तकातील लिखाणाचा, आशय समजून व मांडलेल्या विचारांची चिकित्सा करून आपल स्वतंत्र मत बनविण्याची त्यांची पद्धती होती. वाचन चालू असतांना त्या काळात घडत असलेल्या राष्ट्रीय घडामोडींकडे त्यांचे लक्ष वेधले गेले.

सन १९३०ला असहकाराचे अंदोलन छेडले गेले. त्याचा त्यांच्या मनावर मोठा प्रभाव पडला. त्यांनी टिळक हायस्कूलच्या पटांगणात क्रांतीचा तिरंगी ध्वज फडकावून वयाच्या १६ व्या वर्षी १८ महिन्याची सश्रम कारावासाची शिक्षा भोगली. येरवड्याच्या तुरुंगांत ही शिक्षा भोगत असतांना त्यांना आचार्य भागवंताचा सहवास लाभला. त्यांच्याशी केलेल्या चर्चा आणि गप्पा-गोष्टीने त्यांना विचार करण्याची संधी मिळाली. विद्यार्थी जीवनाच्या बाहेरच्या जगाची आणि तत्त्वज्ञानाची ओळख होऊन त्यांना या कारावासामुळे भावी आयुष्याच्या कर्तबगारींचा पाया घालण्यास मदतच झाली.

लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, महात्मा फुले, शाहु महाराज, मानवेंद्रनाथ रॉय; स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या राजकीय आणि सामाजिक विचार सरणीचा प्रभाव त्यांच्यावर झालेला होता. त्यातूनच त्यांना राष्ट्रहित समाजहित कोणत्या मार्गाने साधावे याचे मार्गदर्शन होऊन रॉयवादी असलेले यशवंतरावजी हे म. गांधी आणि पंडीत जवाहरलालजी नेहरुंचे अनुयायी झाले. देश ब्रिटीशांच्या वर्चस्वातून प्रथम मुक्त करावा ही इच्छा बळकट झाली आणि १९४२ च्या 'चलेजाव'च्या आंदोलनात त्यांनी उडी घेतली. देशभर चळवळ करून सरकारला राज्यकारभार करणे अशक्य करावे हे ह्या लढ्याचे ध्येय होते. पण उघडपणे हे कार्य करणे कठीण होते. म्हणून तरुणांचा एक गट तयार केला. चळवळीची उद्दिष्ठे आणि दिशा त्यांना समजावून सांगितली आणि संपूर्ण सातारा जिल्ह्यात भूमिगत राहून त्यांनी तरुण क्रांतीकारकांकडून तारा तोडणे पूल पाडणे इ. गोष्टींनी इग्रजांना जेरीस आणले. रेल्वे स्टेशन जाळणे, पोलीसांच्या बंदुका पळविणे इ. कारवाया करून ब्रिटीश शासनाला हैराण केले. त्यांना पकडण्यासाठी सरकारने १०००रु. चे पारितोषिक जाहीर केले नाक दाबलं की तोंड उघडेल या नियमानुसार पोलीसांनी त्यांच्या पत्नी सौ. वेणूताई यांना मकर संक्रातीचे दिवशीच अटक केली बंधु गणपतराव यांना अटकेत ठेवले. पण यशवंतरावानी मात्र माघार घेतली नाही. १९४३ ला सौ. वेणूताई आजारी होत्या त्यांची भेट घेण्यासाठी आले असतांना त्यांना अटक झाली. या लढ्यात खंबीर, धाडसी त्यागी, आणि चिकाटी वृत्तीचे दर्शन घडवून त्यांनी जनमानसात आपला वेगळाच ठसा उमटविला. ते सातारा या जिल्ह्यातील तरुणांचे प्रमुख नेते झाले. तद्वतच त्यांनी राष्ट्रीय चळवळीच्या प्रवाहात खेड्यापाड्यातील सर्व सामान्य अशा बहुजन समाजाला सहभागी होण्यास प्रवृत्त केले.

सन १९४६ पासून निवडणुकीच्या रिंगणात त्यांनी उडी घेतली. तेव्हापासून शेवटच्या घटकेपर्यंत ते राजकारणात राहिले. १९४६च्या असेंब्लीच्या निवडणुकीत ते विजयी झाले. पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून आपल्या राजकीय कामगिरीला त्यांनी प्रारंभ केला. १९५२ च्या निवडणुकीत पुनःश्च विजयी होऊन मोरारजी देसाई यांच्या मंत्रिमंडळात नागरी पुरवठा मंत्री म्हणून काम करुन त्यांनी आपली एक वेगळी प्रतिमा तयार केली. तर स्थानिक स्वराज्य, जंगल आणि विकास खात्याच्या मंत्रीपदाची जबाबदारी अतिशय सावधगिरीने आणि कुशलतेने हाताळून पुरोगामी ध्येय्यवादी प्रशासक म्हणून ख्याती मिळविली.

सन १९५६ ला द्विभाषिक मुंबई राज्याची स्थापना झाली. तेव्हा द्वैभाषीक राज्याच्या मुख्यमंत्रीपदावर सगळ्यात तरुण अशा यशवंतरावजींची झालेली निवड ही त्यांच्या जीवनातील मोठी कसोटीच होती. कारण द्विभाषीक राज्यनिर्मीतीमुळे संयुक्त महाराष्ट्र सामितीने चळवळ जोरात सुरू करून सर्वत्र अस्थिरता निर्माण केलेली होती. तर यशवंतरावजींनी मुख्यमंत्रीपद स्वीकारले म्हणून त्यांचेवर टीकेचा भडीमार होत होता. पण साहेबांनी सारे काही संयम राखून व राज्यभर दौरा करून आपल्या वक्तृत्वाने जनतेची मने जिंकली अत्यंत कुशलतेने त्यांनी द्विभाषीक राज्याचा कारभार यशस्वी रित्या करून दाखविला. तरी ही १९५९ च्या ऑगस्ट महिन्यात कॉंग्रेस श्रेष्ठींपुढे आपलेमत मांडतांना ते म्हणाले की "द्विभाषिक राज्याचा कारभार यशस्वी होत असला तरी विकासाची कामे जरी होत असली तरी राज्यातील जनतेत एकात्मतेची भावना निर्माण होण अशक्य आहे." असे सांगून ते पुढे म्हणाले की "अशा या द्विभाषिक राज्याचा मी मुख्यमंत्री म्हणून मी कारभार चालवू शकणार नाही." असे निर्णयक मत देऊन त्यांनी एकभाषिक संयुक्त महाराष्ट्र निर्माण करण्याची नितांत आवश्यकता आहे हे पंतप्रधान पं. जवाहरलालजींच्या निदर्शनास आणून दिले. शेवटी पं. नेहरूजींनी १मे १९६० ला महाराष्ट्र राज्याची निर्मिती करून महाराष्ट्राचा सुवर्ण कलश यशवंतरावजी यांचे हाती दिला. या नव्या महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होण्याचा मान यशवंतरावजींनाच मिळाला. मुख्यमंत्री या नात्याने शिक्षण, शेती, अर्थ, उद्योग, कारभाराचे विकेंद्रीकरण सहकार; पाटबंधारे, साहित्य संस्कृति इ. क्षेत्रात पुरोगामी स्वरूपाचे निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली. महाराष्ट्रराज्य हे कल्याणकारी राज्य करण्याच्या दृष्टीने विकास कार्यक्रमाचा आणि लोकांना सुखसोयी उपलब्ध करून देण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

तर पंचायत समित्या, जिल्हापरिषदा स्थापन करुन सत्तेचे विकेंद्रीकरण केले व तांत्रिक शिक्षणाचा पाया घालून आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार बनले. पहिला सहकारी साखर कारखाना प्रथम महाराष्ट्रात झाला व राज्यभर सहकारी चळवळ रुजविली.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असतांनाच सन १९६२ ला पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी त्यांची संरक्षणमंत्री म्हणून नियुक्ती केली. त्यांच्या आदेशानुसार महाराष्ट्राचा हा सह्याद्री हिमालयाच्या मदतीला धावून गेला. सन १९६२ च्या चीन-भारत युद्धामुळे निर्माण झालेली परिस्थिती अत्यंत कौशल्याने हाताळली. तर १९६५ ला लष्करी सामर्थ्याची घमेंड असलेल्या पाकिस्तानने भारतावर

आक्रमण केले तेव्हा त्याला चोख उत्तर देऊन भारताच्या लष्करी शक्तीने प्रदर्शन घडविले. भारताचा विजय ध्वज लाहोर पर्यंत नेऊन युद्धभूमी पाकिस्थानला बनविली व सावरकरांची सुद्धा प्रशंसा मिळविली.

श्रीमती इंदिरा गांधी ह्या पंतप्रधान झाल्या तेव्हा यशवंतरावजी गृहमंत्री झाले. तर १९७० ला त्यांच्याकडे अर्थखाते, १९७४ ला परराष्ट्रखाते दिले. अशा रितीने चारही खात्यांचा कारभार समर्थपणे सांभाळून त्या त्या खात्याच्या प्रशासनावर आपल्या व्यक्तीमत्त्वाचा ठसा उमटवून आपली प्रतिमा अधिकच उज्जल केली.

मार्च १९७७ च्या निवडणूकीत कांग्रेसपक्षाचा पराभव झाला. जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आले. तेव्हा लोकसभेत विरोधी पक्ष नेते म्हणून काम केले तर जुलै १९७९ ला चरणसिंग मंत्रीमंडळात उपपंतप्रधान झाले. आठव्या वित्तआयोगाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी नंतर काम केले. असा हा त्यांचा राजकीय प्रवास होता. यात ते एक उत्कृष्ठ प्रशासक कुशल राजनितिज्ञ आणि मुत्सद्दी नेता म्हणून मान्यता पावले.

एक प्रशासक हा ग्रंथवेडा असणे अगदीच अशक्य वाटते. पण यशवंतरावजी मात्र त्याला अपवाद होते. आपल्या प्रशासकीय कर्तव्यानंतर तेरात्री इंग्रजी आणि मराठी ग्रंथाचे नियमित वाचन करीत असतं. प्रवासात जरी असले तरी त्यांच्या बॅगेत पुस्तके हमखास असावयाची. या वाचनामुळेच त्यांच्या वक्तृत्वकलेचा विकास झालेला होता. म्हणूनच वक्तृत्व हा त्यांचा खास गुण मानला जाई. भाषणात 'कृत्रिमता नव्हती, भाषा रसाळ, सोपी, जनमानसाच्या अंतःकरणाचा ठाव घेणारी, अत- त्यामुळेच श्रोत्यांचे मन ते केव्हाच जिंकून घेत.

'यशवंतरावजी जितके राजकारणात म[ग्न] असत तितकेच साहित्याच्या क्षेत्रांतही समरस हो[त] असत. बालवयातच त्यांनी कविता, निबंध लेखन कर[ून] अंगी असलेल्या साहित्यिक गुणांची ओळख क[रून] दिलेली होती. तर 'युगांतर' 'सह्याद्रीचे वारे' या ऋणानुबंध, भूमिका' 'शिवनेरीच्या नौबती' या ग्रंथातून त्यांच्या भाषण शैली आणि त्याला असलेल्या लालित्याची झाक दिसत असली तरी त्यांना ग्रंथकार म्हणून मान्यता मिळाली ती त्यांचा आत्मचरित्राचा पहिला भाग' 'कृष्णकाठ' या वैशिष्ठ्यपूर्ण ग्रंथाने. या ग्रंथाने साहित्यात एक मोलाची भर घातली आहे. या आत्मचरित्रामुळे आपली हयात पूर्णपणे पुढारी म्हणून घालविली मात्र जातांना एक ग्रंथकार, साहित्यिक म्हणून गेले.! साहित्य आणि साहित्यिक याच्यात त्यांना अतिशय रस होता. अनंत काणेकर, कै. ग. दि. माडगूळकर, रणजित देसाई, कवि यशवंत, पु. ल. देशपांडे, ना धो. महानोर यासारख्या साहित्यीकांचा सहवास त्यांना प्रिय असे. साहित्यीकांशी गप्पा मारतांना ते म्हणत "समाज मानसात जे असते तेच साहित्यात उतरते. सामाजिक राजकीय आणि साहित्यीक मूल्यांची एकमेकांपासून फारकत करता येत नाही" एक इतिहास घडविणारा साहित्यिक म्हणून महाराष्ट्रीयनांच्या मनात त्यांनी आपले स्थान निर्माण केले.

मराठी भाषा आणि मराठी साहित्याचा विकास व्हावा म्हणून त्यांनी साहित्य संस्कृती मंडळाची स्थापना केली. या मंडळाद्वारे मराठी विश्वकोशाची योजना हाती घेऊन ज्ञान आणि विज्ञान तळागाळच्या माणसापर्यंन्त पोहचवण्याचा प्रयत्न साहेबांच्या प्रेरणेमुळच सुरू झाला.

असे हे प्रज्ञावंत राजकारणी, कुशल प्रशासक समाजवादी लोकशाहीचे चाहते, आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीचे शिल्पकार एक थोर साहित्यिक असे अष्टपैलू व्यक्तिमत्व २५ नोव्हे १९८४ ला काळाच्या पडद्याआड गेले. अशा या थोर साहित्यिक आणि राजकारणधुरंधर, मुत्सद्दी नेत्याच्या स्मृतीला शतशः प्रणाम ! लोकमान्यानंतर यशवंतरावा एवढा मोठा नेता महाराष्ट्राला मिळाला नव्हता. महाराष्ट्रात पुन्हा असा प्रतिशिवाजी निर्माण होईल अशी आशा करू या ! !

• • •

# ' भौमितिक प्रेम '

**रविंद्र झोपे**
तृतिय वर्ष वाणिज्य

ऐक स्पर्शिका !
माझ्या जीवन वर्तुळाला किंचितशा
स्पर्श करुन गेली.
मी तिला म्हटलं
" अगं वेडे ! फक्त स्पर्शिका का होतेस ?
छेदिका हो ! "
नि,
माझ्या जीवन वर्तुळाचे दोन भाग कर
विवाहापूर्वी
नि
विवाहानंतर

* * *

प्रथम शील !

" The Great hope of society is in individual Charecter. "

सुप्रसिद्ध विचारवंत चॅनिंग यांचं हे वचन आहे. राष्ट्रात एक दोन व्यक्ति उत्तम शीलवान असल्या तर त्यांचबद्दल अभिमान वाटतो, त्यांचेबद्दलचा आदर सारखा वृद्धिगत होत जातो. त्यांच्या प्रमाणंच आपणही असावं असं वाटू लागतं पण असा परिणाम फार थोडया लोकांवर होतो. आणि तो टिकतोही फार थोडा काळ. समाजच चांगला प्रगतिप्रिय असावा असं वाटत असेल तर त्या समाजातील प्रत्येक व्यक्ती शीलवान असली पाहिजे. अशा शीलवान व्यक्तीवरच त्या समाजाची; राष्ट्राची, कदाचित सर्वांचीच प्रगति अवलंबून ठरते. आणि म्हणूनच आपण म्हणतो की व्यक्तींचं शील हेच समाजाच्या आशा आकांक्षांचं केन्द्रस्थान असतं. सर्व व्यक्तींची वागणूक चांगली असली व त्यांच्यात शील बनविणारे धैर्य, शालीनता, विद्वता गुण असलेत तर तो समाज उत्तम स्थितीत पोचला असे म्हणण्यास हरकत नसते. आणि म्हणूनच व्यक्तीच्या शील समाजाच्या दृष्टीनं अत्यंत महत्व असतं. ' शीलं परंभूषणम् ' असं म्हणतात ते यासाठीच.



सर्व सोयींनी युक्त
शाकाहारी व मांसाहारी
जेवणकरिता
नव्यानेच सुरु झालेले
" हॉटेल कीर्ति "
एक वेळ भेट देवून खात्री करा

हॉटेल कीर्ति

५, दिक्षीतवाडी महाराष्ट्र फेअर स्केल समोर, सनशाईन
इलेक्ट्रोप्लेटींग शेजारी, जळगाव.

प्रोप्रा.- श्री. प्रमोद श्रावण नारखेडे, जळगाव

गोबरगॅस टँक, ऑफिस फर्निचर, चॅनल गेट,
पाईप गेट, जाळ्या, व सर्व प्रकारचे
स्टील फेब्रीकेशन



आशिर्वाद वेल्डींग वर्क्स

नॅशनल फेअर स्केल जवळ,
जुना नशिराबाद रोड,
जळगांव. ४२५००१.

प्रो. गुणवंतराव झोपे आणि बंधू


# खांडेकरांचे अंतरंग


कु. छाया जगन्नाथ पाटील
१२ वी वाणिज्य


मराठी वाङमयात पत्र वाङमय हा लघुनिबंधा प्रमाणे नवीन असा साहित्यप्रकार असलातरी त्याच्या एवढा समृद्ध नाही. स्वतंत्रपणे पत्रसंग्रह गेल्या पंन्नास चाळीस वर्षातच प्रकाशित झालेल असून या दशकांत त्याने चांगले बाळसे धरले आहे.

## मराठीतील पत्र वाङ्मय-

पूज्य साने गुरूजींच्या सुंदर पत्रानंतर कै. भा. रा. तांबे, गोपीनाथ, तळवलकर, यशवंत. अनिल, ना. ग. गोरे, ह. वि. मोटे चन्द्रकांत नलगे. इ. अनेक साहित्यिकांच्या पत्रसंग्रहाची भर साहित्यात पडलेली दिसून येते. श्री. वि. वा. पत्की यांनी १९८० मध्ये प्रकाशित केलेला 'दीपगृह' हा पत्रसंग्रह ही पत्र वाङ्मयात महत्वाची भर घालू शकेल असा आहे. मराठी कथा, कादंबरी, लघुनिबंधादी क्षेत्रात आपले युग प्रस्थापित करणाऱ्या भाऊसाहेब खांडेकरांच्या दोन हजार पत्रातून त्यांच्या व्यक्तीमत्त्वावर व साहित्यावर प्रकाश टाकणाऱ्या या ग्रंथात १४५ पत्रांचा संग्रह असून सामान्य व्यक्ती पासून असामान्य साहित्यिकापर्यंत आणि युवकापासून वृद्धा पर्यंत जीवनमार्गावरील सर्व प्रवाश्यांना मार्ग दाखविणारा असल्याने त्याचे शीर्षक यथार्थ वाटते.

## आत्मचरित्र व पत्रवाङ्मय-

इतर कोणत्याही अन्य साहित्य प्रकारापेक्षा पत्र वाङ्मयात साहित्यिकाचे यथातथ्य व संपूर्ण प्रतिबिंब पडलेले दिसते. इतर साहित्य प्रकारात कल्पित पत्रांचा व घटनांचा पडदा लेखक व वाचकात असतो. आत्मचरित्र त्या मानाने पत्रवाङमयाच्या निकटचा साहित्य प्रकार असला तरी कटुसत्याला सामोरे जाणारे त्यातही फार थोडे असतात. त्यामुळे स्मृती चित्रासारखी अस्सल आत्मचरित्रे फारच कमी असतात. उलट पत्रलेखक आपले रागलोभादि विकार स्पष्टपणे पत्रातून प्रकट करीत असतो. आत्मचरित्रकार जीवनात घडलेल्या घटनांविषयी व व्यक्तिसंबंधात आत्मसमर्थकाची भूमिका घेत असल्याने सत्याला बगल देण्याची अथवा सोयीचे सत्य सांगण्याची प्रवृत्ती त्यात अनेकदा दिसून येते.

## अष्ठपैलू भाऊसाहेब

मृदु मानवतावादी आणि अतःकरणाचे खांडेकर, जीवनवादी दृष्टी असलेले साहित्यिक खांडेकर, आपल्या विद्यार्थ्यांवर अपत्यवत् प्रेमकरणारे खांडेकर आयुष्यभर विविध योगांमुळे शरपंजरी खिळूनही सतत साहित्य सृजन करणारे भीष्माचार्य खांडेकर,

अशा विविध पैलूंनी संपन्न व सकस व्यक्तीमत्वाचे 'दीपगृह' या पत्रसंग्रहातून दर्शन घडतांना दिसते. त्यातही युवापिढीशी केलेले हितगुज भाष्य व विचार मनन करण्यासारखे आहेत अठराव्या वर्षात पदार्पण करणाऱ्या त्यांच्या पुत्रास लिहीलेले पत्र संपूर्ण युवा-पिढीला मार्गदर्शक व मौलिक ठरेल असे आहे. "जीवनात एकाच्या अनुभवाने दुसरा शहाणा होतोच असे नाही. तर बऱ्याचदा माणूस स्वतःला आलेल्या अनुभवानेही शहाणा होत नाही." हे कटुसत्य ते अविनाशला सांगतात.

## समाजशिक्षक-

भाऊसाहेब केवळ शिक्षक नव्हते तर समाज शिक्षकही होते. समाजाशी असणारी त्यांची बांधीलकी शब्दाशब्दातून प्रकट होतांना दिसते. शांता शेळकेंनालिही लेल्या पत्रातुन त्यांनी आधुनिक साहित्यातील मुलभूत समस्येचा उल्लेख केला आहे. पहिल्या महायुद्धानंतर ज्या समस्या पाश्चिमात्य राष्ट्रात निर्माण झाल्या त्या कमी अधिक प्रमाणात दुसऱ्या महायुद्धानंतर आपल्या देशात निर्माण झाल्या. "दुसऱ्या महायुद्धा नंतर नैतिक स्तरापासून आर्थिक स्तरापर्यंत आपल्या पुढे जे नवे जग उभे राहिले आहे त्याचे आकलन राजकीय सामाजिक व आर्थिक नेत्यानाही आले नाही. मग ते साहित्यिकांना व्हावे असा हट्ट धरण्यात ठंशील काय ?" असा प्रश्न ते विचारतात. भुकंपाचे धक्के बसावेत तसे धक्के सर्वच क्षेत्रात आपल्यास बसत आहेत भारतीय मनाशी सुसंवादी असे नवे जग आपण भारतीय निर्माण करु शकलो नाही याची खंत त्यांना वाटते.

## साहित्य आणि साहित्यिक-

याबंधी भाऊसाहेबांनी केलेले मार्गदर्शन मौलिक आहे. हरीभाऊंच्या 'मी' 'पण लक्षात कोण घेतो' मधील आदर्शवादी नायक वि[…] स्वतः खांडेकरांनी निर्माण केलेले चंद्रका[…] दिलीप, अभय सारखे नायक ध्येयवादाने भारले[…] तरुणांचे प्रतिनिधी होते. प्रेरणादायी स्वातंत्र्यु[…] काळाची ती निर्मिती होती. गेल्या दोन तपाती[…] मराठी कादंबरीने सामाजिक आशयापेक्षा व्यक्ति[…] मनाची गुंतागुंत किंवा भूतकाळाचे भावडे पूजन हे[…] आपले प्रधान विषय मानले. याची खंत त्यांना वाटे[…] मराठी कांदबरी सामाजिक विषय हाताळू लागल्या[…] एका पत्रातून समाधान व्यक्त करतात. भारती[…] समाज मनासंबंधी ते म्हणतात, "भोगवादाच्या[…] धुंदीत औद्योगिक संस्कृतीच्या माया बाजारात उ[…] भोगाच्या बाबतीत शतकानुशतके वंजित झाले[…] भारतीय माणसाचे मन जत्रेत विस्फारित डोळ्यांनी[…] व हावऱ्या मुद्रेने चोहोकडे पाहणाऱ्या लहान मु[…] प्रमाणे धडपडत आहे. त्याचे चित्रण ही आज[…] खरीखुरी सामाजिक कादंबरी होऊ शकेल. त्या[…] आदर्शाच्या पराभवाचीच शक्यता अधिक अस[…] तरी अशा पराभवातही प्रेरकता असू शकते[…] हे त्याचे महाभारतातील उत्तम उदाहरण आहे. असे साहित्यिकांना मार्गदर्शन करणाऱ्या एका प[…] लिहीतात. साहित्यात येणाऱ्या चिंतनाबद्दल ते फि[…] दक्ष आहेत पाहा, "दुधात साखर मिसळावी[…] लेखकाचे सर्व चिंतन त्याच्या कल्पकतेत व अभि[…] क्तीत सहजपणे मिसळून गेले पाहिजे. त्या दृष्टी[…] इब्सेन त्यांना आदर्श वाटतो. या उलट डॉ. केत[…] डॉ. बर्नार्डशॉ यांच्या साहित्यात चर्चेचा व चिंतना[…] अतिरेक त्यांना साहित्याच्या दृष्टीने हानीकार[…] वाटतो. शिरवाडकरांना लिहिलेल्या पत्रातही त्यां[…] सामाजिक बांधिलकी जाणवते. आपले साहित्य आ[…] आपला समाज ज्या स्थितीत आहे ती लक्षात घे[…] साहित्यिक हा एक प्रकारचा वैचारिक मार्गदर्श[…] होणे अपरिहार्य आहे असे ते म्हणतात.

## साहित्य व सामान्य माणूस-

सामान्य माणसाच्या दृष्टीने जे. के. चव्हाण यांना लिहीलेल्या पत्रातील संदेश लाख मोलाचा आहे. जगात सर्व पेटलेले अन्यायाचे वणवे आपल्या मनातल्या चार दोन कणवेच्या थेंबांनी कुणी विझवू शकत नाही. सामान्य माणसाचे एकच काम आहे ते म्हणजे आपल्या भोवताली जे दुःख असेल ते कणभर तरी कमी करण्याचा प्रयत्न स्वतः करणे व इतरांच्या तशा प्रयत्नांना यशाशक्ती साथ देणे. यासाठी शब्द आणि कृती या दोन्हींचा प्रभावशाली उपयोग लेखकांना ते करायला सांगतात. मात्र ते शब्द जातीवंत कवी हृदयातून उमळलेले असावेत असा आग्रह धरतात. "आईने खाऊला दिलेला एक पैसा रस्त्यावरच्या भिकाऱ्याला देणारा लहान मुलगा म्हणजे संसारी जीवनातला आदर्श आहे असे ते म्हणतात"

## नवोदित साहित्यिक-

नवोदित साहित्यिकांना त्यांनी केलेले मार्गदर्शन अत्यंत परखड आहे. कवी होऊ पहाणाऱ्या एकास ते म्हणतात, "कविता ही आकाशातली वीज आहे. ती पकडून पहाणाऱ्या पैकी शेकडा ९९ लोक तिच्या स्पर्शाने होरपळून निघतात. एखाद्याच्याच ती हाताला लागते." चित्रपट, कथा आणि कादंबरी लिहू पहाणाऱ्याला ते आधी कथा लिहीण्याचा सल्ला देतात. कारण चांगल्या कथाकाराचे स्वागत चांगलेच होतांना दिसते. वाचकांना व संपादकांना इतर साहित्याच्या तुलनेने कथा अधिक हव्या असतात. मात्र साहित्यात वशिल्याचा उपयोग नाही. स्पर्धेच्या मार्गाने आपण गेले पाहिजे असेही ते बजावतात.

आपल्याला गुरु मानणाऱ्या दिलीप फलटणकराला साहित्यात इतर कलांच्या तुलनेने गुरुचा उपयोग फारच कमी होतो असे त्यांनी बजावले. "साहित्यात कुणीही कुणाला गुरु मानावे पण शिकण्याची जबाब-दारी असते, शंभर टक्के शिष्यावर ! शिष्याच्या अंगी प्रतिभेचे अस्तित्व नसेल तर माळरानावर पडलेल्या पावसासारखी गुरुच्या साहित्याची स्थिती होत असते. दत्ताने २४ गुरु केले पण साहित्याला सहस्त्रावधी गुरु मिळू शकतील. जागतिक वाङमयात होऊन गेलेले सर्व प्रतिभावंत, समाजजीवनातले संघर्ष व सौंदर्य, चराचरा सृष्टीतील लक्षावधी गोष्टी लेखकाच्या साहित्य निर्मितीला खतपाणी घालू शकतात, पण केवळ खत पाणी घालून पिके येऊ शकत नाहीत. त्याला तशी सामर्थ्यवान बीजे ही असावी लागतात. शेवटी, 'साहित्य हा धंदा नाही. तो प्रतिभेचा स्पर्श असलेला धर्म आहे." अशा हृदयावर कोरुन ठेवणारा हितोपदेश करतात. फाटक नावाच्या नवोदितास पोटतिडीक व वेडाने झपाटून जाण्याची आवश्यकता साहित्यनिर्मितीस आवश्यक असल्याचे आग्रहाने सांगतात. चांगल्या साहित्यकृतीसाठी कल्पकता, भावोत्कटता व विचार-गर्भ चिंतन या तिन्हींचा मनांत संगम आवश्यक मानतात.

समीक्षक म्हणून खांडेकरांची दृष्टी तरल व सूक्ष्म असूनही तितकीच व्यापक व उदार दिसून येते. जागतिक वाङ्मयाच्या अफाट अध्ययनाप्रमाणे पाश्चात्य समीक्षेचा त्यांचा गाढा व्यासंग थक्क करुन सोडणारा आहे. साहित्यिकांच्या हयातीतच त्यांच्या साहित्याचे समीक्षण होणे त्यांना उचित वाटत नाही. म. वा. गोडबोले यांनी लावलेल्या ज्ञानेश्वरीच्या नव्या अर्थाचा गौरव व स्वागत करुन नवनवे दृष्टी-कोन समोर येण्याची आवश्यकता एका पत्रातून त्यांनी प्रतिपादन केली आहे. मर्ढेकरांनी काव्याच्या क्षेत्रात बजावलेल्या कामगिरीचा मुक्तकंठाने गौरव करुन त्यांना तोलामोलाचा भाष्यकार मिळाला नाही अशी खंत व्यक्त करतांना दिसतात.

महामानव खांडेकर–

माणूस म्हणून खांडेकर किती थोर होते हे भालेराव आणि गं. दे. खानोलकरांना लिहीलेल्या पत्रातून दिसून येते. त्यांची अनासक्ती व प्रसिद्धी विन्मुखता संताला शोभणारी आहे. रवींद्र–नाथांप्रमाणे खांडेकरांचे विस्तृत चरित्र लिहीण्याच्या संकल्पापासून खानोरकरांना परावृत्त करतांना " मोठ्या चरित्रांचा नायक होण्यासारखे आपल्या–पाशी काही नाही " असे लीनतेने म्हणतात. खांडेकर या रसिक वाचकाने त्याच्यातीलच लेखकाचे हे केलेले परखड समीक्षण साहित्य हा आयुष्यभर आपला श्वासोच्छ्वास मानणाऱ्या तपस्व्यांचे विश्लेषण लक्षणीय आहे. त्यांच्या जीव–नावर डाक्युमेंटरी निघावी म्हणून प्रयत्नशील असणाऱ्या मित्रांना ते " अशा कामाकरिता पन्नास हजार रुपये खर्च करणे मला पटत नाही. " असे आजच्याप्रसिद्धी लोलुपतेच्या काळात म्हणतात. लेखक म्हणून माझ्या मर्यादा मी पहिल्या पासून जाणत आहे असे म्हणणाऱ्या भाऊसाहेबाबद्दल " विद्या विनयेन शोभते " या शिवाय कोणते उद्‌गार वाच–काच्या तोंडून बाहेर पडणार ?

शैलीकार खांडेकर–

सतत अनेक व्याधींनी जर्जर झालेले खांडेकर मनाने किती निरोगी होते आणि जीवनाकडे किती खेळकर वृत्तीने पाहू शकत हे त्यांच्या खालील साहित्य गुणांनी लदलेल्या वाक्यावरून लक्षात येईल. शिवाय अलंकारिकता हा त्यांच्या शैलीचा अविभाज्य भाग अथवा स्थायी भाव कसा झाला होता याचाही प्रत्यय येईल. हा कोल्हटकर गडकऱ्यांच्या प्रभावाचा परिणाम असला तरी त्यांची शैली वाचकांना हवीहवीशीच वाटते.

१) " वृद्धापकाळ हा एका दृष्टीने व्याधींच्या सत्काराचा काळ. या काळात कोणता अतिथी केव्हा येईल सांगता येत नाही. त्याला विन्मुख पाठ–विणे जमत नाही. "

२) " पूर्ण निवृत्तींचा पुन्हा पुन्हा संकल्प कर–नही संध्याकाळ झाल्यावर क्रीडांगणावर रम[...] राहणाऱ्या मुलासारखा मी परवा पर्यंत वाङ्मय क्षेत्रात लुडबुड करीत राहिलो. "

३) दामोदर नाईकांच्या पत्रात म्हणतात, " आयुष्यात मी कधीच निराश झालो नाही प[...] ७७ व्या वर्षी रक्तदाब व इतर व्याधी माझे शरीर कुरवडत आहेत. आणि एकेंक इंद्रिय हळूहळू रजेवर जाण्याच्या मार्गावर आहे. "

४) जीर्णशीर्ण शरीर फाटक्या कपड्यांना र[...] करावा तसे सांभाळ करीत पथ्ये व औषधांचा मार[...] सहन करावा लागतो. पण हे वार्धक्यात क्रमप्राप्त आहे अशी मनाची समजूत घालतो.

५) खानोलकरांना लिहितात, " शरिराचे घोडे दामटायचे झाले तरी ते चार पावले पुढे जाते आणि बसकण घेते."

६) " सर्व त्वचा रोग हटवादी असतात[...] म्हातारपणी वृद्धा इतकेच ते उतावळे व चिडखोर बनतात. "

७) कामतांना अखेरच्या पत्रात म्हणतात, " शरीर आता औषधांना दाद देत नाही. एखादे जीर्ण वस्त्र विरत जावे व नंतर ठिकठिकाणी फाटू लागावे असे झाले आहे.

८) कुसुमाग्रजांना आग्रहाने आमंत्रण देतांना " तुमची इकडे येण्याची थकबाकी फार दिव[...] राहिली आहे. तिची फेड शिल्लक ठेऊ " नये असे[...] लिहितात. पुढील एका पत्रात पुन्हा म्हणतात " समारंभाचा तुमच्या प्रमाणे मलाही कंटाळा आहे[...] पण गेली ४० वर्षे एखादा नावडता पदार्थ शिस्त म्हणून खावा त्या प्रमाणे मी वागत आलो आहे. "

खाण्डेकरांची परदुख कातरता आणि स्थित–प्रज्ञता पहा. ऑपरेशन अयशस्वी होऊन अंधत्व आल्यानंतर सांत्वनपर पत्र पाठविणाऱ्याना ते लिहीतात. " पूर्ण अंधत्वाची जी थोडी फार वर्षे वाट्याला येतील त्या बद्दल. ७५ व्या वर्षी मी कुरकुर करणे जगातल्या साऱ्या जन्मांधांचे आणि अकाली दृष्टी गेले त्यांचे दुःख मला यत्किंचितही कळले नाही असे होईल. " त्यांच्यातील दिव्यत्वाची प्रचिती येथे येते.

ययातील ज्ञानपीठ पारितोषिक मिळाल्यावर भल्यांनी, " मायमराठीच नोबेल पारितोषिकाची मानकरी व्हावी असा आशावाद व्यक्त केला होता." विख्यात तो आशाकार कुणी मराठीचा सुपुत्र पूर्ण करील काय?

● ● ●

## युवकांचे आद्य कर्तव्य

जीवनाचे ध्येय समजावून घेऊन त्याचा पाठ पुरावा करणे हे युवकांचे आद्य कर्तव्य आहे. ध्येय हीन जीवन हे मृत्यू समानच आहे. ध्येयाचा दर्जाच काय हेच जीवनाचा दर्जा ठरवीऊ. ध्येय हे श्रेष्ठ, उच्च, उदार आणि स्वर्थहिन असणे ,आवश्यक आहे, जेणेकरुन आपले व इतरांचे जीवनही यथार्थ होईल ध्येय काही का असेना त्याच्या परिपूर्तीचा ध्यास घेतला नाही. तर ध्येयाला वस्त्रत्ता येत नाही. ध्येयाच्या परिपूर्तीसाठी स्वतःला जागृत आणि सुजण करणे आवश्यक आहे. आपण काय करतो आहोत ? याचे भान असणे आवश्यक आहे. आपल्या वर्त–मान परीस्थितीतून आपल्याला काही बोध घ्यास–याचा असेल तर सतत जागृत राहणे जरुरी आहे. क्षणभर देखील ध्येय पूर्तीचा विसर पडता कामा नये.

योगी अरविंद–

# चालु - चालु - चालु

विजय म. पाटील
११ वी कॉमर्स

डोळे उघडे ठेवुन लागा चालु
आहे जमाना कलियुगाचा चालु

चालु दुनिया, चालु भाव, चालु कायदा, चालु नाव.
चालु चालु चालु चालु
हे सारे काही चालु ॥१॥

नेता बघावा तो चालु, श्रोता बघावा तो चालु
भाषण, फॅशन चालु, राशन – शासन चालु.
कुटुंब नियोजन घरोघरी चालु

चालु दुनिया, चालु भाव, चालु कायदा, चालु नाव
चालु चालु चालु चालु
हे सारे काही चालु ॥२॥

दारु खुले आम चालु, चरस, गांजा, अफम चालु
स्मगलर, गोल्डन गॅंग चालु, काळे धंदे चालु
जुगार आणि वरळी मटका चालू
पोलीसाची लाचलुचपत चालु

चालु दुनिया – चालु भाव, चालु कायदा चालु नाव
चालु चालु चालु चालु
हे सारे काही चालु ॥३॥

मोर्चा निदर्शने चालु, नको ती, प्रदर्शने चालु
संप पुकारतात चालु, माघार घेणे ही चालु
गटबाजी आणि कटबाजी चालु
मालक युनियन बोगस बाजी चालु

चालु दुनिया, चालु भाव, चालु कायदा, चालु नाव
चालु चालु चालु चालु
हे सारे काही चालु ॥४॥

● ● ●

## - सृष्टी -

नितीन कुलकर्णी
१२ वी ( ई ) कॉमर्स

हिरव्या बनांच्या शाईतुनी
निळे पाणि धावतेय
धपापल्या बैलासारख
जणु पिस अंगात भरलय ॥१॥

कोरड्या जमिनीस भिजवूनी
तृप्त करी धरणीस
पिक चांगले येईल
अशी शेतकऱ्यास आस ॥२॥

माती ऊदकाचा वेगळा
सुसंग तो पाहुनिया
अतिहर्षाने रोमांच येती
अंगाअंगावर माझीया ॥३॥

अचानक आला वारा
माझ्या केसांना ऊडवीत
नवखळ असा हा निसर्ग
हसतो माझ्या चेष्टा करीत ॥४॥

बघती जेव्हा पाण्यात निळ्या
माझेच मी प्रतिबींब
सध्येच पाण्याचे खट्याळ तुषार
करीती मला ओले चिंब. ॥५॥

* * *

## - लोक -

शिरीष नारायण भंगाळे
टी. वाय. बी. एस्सी. (ए) केमेस्ट्री

बहारदार बहाणे करतात लोक
मोठे शहाणे असतात लोक

जिवंतपणी पाण्यात पाहतात लोक
मरणोत्तर श्रद्धांजली वाहतात लोक

वातनुकूलित बंगल्यात राहतात
आणि झोपड्याची काळजी वाहतात लोक

उपनिषदांचा डास पाडतात
भिकाऱ्यांशी घासाघीस करतात लोक

मृच्छकटिकात चारूदला घेतात
प्रत्यक्षात खाटीक असतात लोक

तोंडावर तारीफ करतात लोक
नंतर कत्तल करतात लोक

मोठ्यांचे पाय धरतात
छोट्यांची गर्दन छाटतात लोक

दफन होईल तेव्हा क्षण असा
मोठे कफन चोर असतात लोक

*

# ' बाकीबाब ' बा. भ. बोरकर

प्रसन्न देशपांडे
एफ. वाय. बी. कॉम [सी]

८ जुलै, १९८४ या दिवसाने मराठी, कोकणी व गोमंतकिय काव्यसृष्टी उदास केली. या तिन्ही भाषांना काव्याची भरघोस देणगी देणाऱ्या थोर कवींचे बा. भ. बोरकर यांचे दुःखद निधन झाले. काव्यांच्या मैफिलीतला एक आगळा वेगळा धुंद पणाच नष्ट झाला. अखेरच्या आजारापर्यंत वयाची सत्तरी उलटलेली असतांना देखील बोरकरांना कुणी वृद्ध म्हटले नसते. ते चिरतरूण होते निळा सूट घातलेला, डोक्यावर लाटालाटांनी मागे जाणारे, काळेभोर आणि भरपूर केस, त्या केसांची कपाळावर झुकलेली झुलपं, मानेला झटका देऊन मागे उडविण्याची त्यांची स्टाईल. ओठात एक तर फडर्या स्टाईलने धरलेली सिगारेट किंवा कवितांच्या ओळी, खांद्यावर शाल पांघरलेली असे त्यांचे व्यक्तीमत्व विलोभनीय होते.

त्यांचे बालपण गोव्याच्या अन् कोकणाच्या भूमीत रंगले. अंब्याच्या - नारळा - पोफणीच्या बागा, समुद्रकिनारा याच्या अंगाखांद्यावर गेले, गोव्याबद्दल त्यांना अतिशय प्रेम व अभिमान होता. किंबहुना, बोरकरांना ' गोवेकर म्हटले असते, तरी चालले असते. गोव्याचे वर्णन करतांना ते पुढे म्हणतात—

'माझ्या गोव्याच्या भूमीत गड्या नारळ मधाचे
कड्या कपारीमधोनी घट फुटती दुधाचे
माझ्या गोव्याच्या भूमीत येते चांदणे माहेरा

बोरकरांच्या कवितामधून आपल्या कोकण प्रदेशातील लहानशा खेड्याबद्दल प्रेम व्यक्त होते—

निळ्या खाडीच्या काठाला
माझा हिरवाच गांव '

त्याच प्रमाणे, त्यांच्या काही कवितामधून, कोकणातल्या ह्या-ना-त्या बंदराकाठी घालविलेल्या बालपणातल्या खुणा दिसतात—

चालसी किती जगे किती युगे मुशाफिरा
स्तब्ध मार्ग तांबडा
वळत जाय वाकडा
मोडक्या पुलाकडून तार जाय बंदरा—

बोरकरांच्या कविता विलक्षण भावपूर्ण व बोलक्या आहेत. कविता वाचताच ते विलोमनीयदृश्य डोळ्यासमोर उभे राहते.

बोरकरानी मराठी बरोबर कोकणी भाषेतही कविता केल्यात. ‘ कविता करणे’ म्हणजे कागद, पेन घेऊन लिहित बसणे, असे त्यांनी कधी केलेच नाही. ते अचानक गुणगुणू लागत व त्यातूनच, पुढे जर त्यांना कोणी अडविले नाही तर, त्याची अखंड काव्यगंगा सुरू होई. मनमुराद मुसळधार पाऊस पडत असताना ते अचानक गुणगुणत

‘ घन वरसे रे – घन वरसे रे
वरसे जलसर - आले सरसर
मल्हारचे स्वरसे रे - घन वरसे रे’ ।।

बोरकरांचे काव्य चांदण्यारात्रीची धुंदी घेऊन यायचे कविता लिहीत असतांना बोरकर तर स्वःत त्या धुंदीत हरवून बसायचे त्यांच्या अशान्त सदाबहार व धुंद गीतांचे, जीवनसंगीत, दूध, सागर, आनंदभैरवी चित्रविणा इत्यादी काव्यसंग्रह आहेत अशी धुंद व रशिली गीते लिहीणाऱ्या बोरकरांना, विनोदी लेखक श्री. पु. ल. देशपांडे यांनी, ‘ आनंदयात्री बाकीबाब ’ ही पदवी दिली.

कवितांबरोबरच कथा, कादंबऱ्या लघुनिबंध हे सुद्धा त्यांनी लिहिले आहेत. निसर्ग, मानवीमन आणि जीवन यांच्या विविधरंगी सौंदर्यरूपी कथा त्यांनी लिहिल्यात. प्रियदर्शिनी, सागरमात्र हे कथा-संग्रह, भावीण, प्रियकामा या कादंबऱ्या, कागदी होडया हा लघुनिबंध संग्रह वगैरे गद्य साहित्य त्यांच्या नांवावर आहे.

प्रथम बोरकर गोव्याला, कुठल्याशा शाळेत मास्तर होते. सुंदर व लांब केस राखणारे बोरकर मास्तर पाहणारे, कडक व सोवळ्या घराण्यातील तुळतुळीत गोटा करणारे विद्यार्थी किती भाग्यवान असतील ! दुसरे म्हणजे अस्सल बांगडे, कोळंबी सारख्या कोकणी मासळींचा स्वाद घेणारे, कोकण माडाच्या फेसळणाऱ्या ‘ फेझीत ’ रंगणारे बोर ‘ मास्तर ’ असतील हे पटतच नाही.

त्यानंतर बोरकरांनी आकाशवाणीत नोक धरली, ती देखील माहिती आणि नभोवा खात्याच्या मंत्र्यांवर मेहेरबानी म्हणूनच, असं वा डायरेक्टर जनरलच्या सभेत, आपली ती ओढून बोरकर अशा ऐटीत सिगारेट शिलगवित मंत्र्यांनीच बोरकरांना विचारावे, ‘ आमच्या का काही कसूर वाटत नाही ना साहेब ?

असे हे मराठी व कोकणी भाषेला धुंद व सदार गीते देणारे महान कवी जगाची र साहित्य मैफील अर्धवट टाकून गेलेत, ही गो मुळी मनाला पटत नाही. एका ‘ आनंदीयात्री आपली जीवन यात्रा संपविली.

बोरकरांना श्रद्धांजली वाहायची तर त्यांच्या भाषेत म्हणावे लागेल—

“ दिव्यत्वाची जेथे प्रचिती ।
तेथे कर माझे जुळती ”।।

**युवा कोण ?**

- सुखापेक्षा साहसप्रिय असतो तो युवक.
- सामाजिक अन्याय, भ्रष्टाचार, ढोंग अशा दृष्टप्रवृत्तींविरूद्ध विद्राहे करतो तो युवक.
- आंगिकृत विशिष्ट विधायक मूल्यांसाठी वि आदर्शांसाठी स्वत:च्या भविष्याची पर्वा न क ते प्राप्त करण्याची जिद्द असते ज्यात तो युवक
- व्यक्तित्त्वात तेजस्वित्ता, तपस्विता आणि त असते तो युवक.
- विधायक मूल्यांचा किंवा आदर्शांच्या संवर्धना वेळ प्रसंगी प्राणांची बाजी लावण्याची त ठेवतो तो युवक.

# थापा मारणे एक कला

संतोष दत्तात्रय झरकर
११ वी सायन्स

लहानपणी ‘ थापा मारणे ’ म्हणजे काय ? याचा अर्थ मला समजत नसे. कधी कधी एखाद्या संगीताच्या मैफलित किंवा एखाद्या ऑर्केस्ट्रात तबला बडवितांना मी अनेक वेळा पाहिले होते. त्यामुळे थापा मारणे म्हणजे तबलाच बडविणे कि काय ? असा मी माझा समज करून घेतला होता. पण नंतर ‘ थाप मारणे ’ या शब्दाला अनेक समान अर्थी शब्द आहेत असे मला कळून आलि. जसे ‘बंडल मारणे’ ‘ खिसे खाली करणे ’ ‘ पुड्या सोडणे ’ ‘ एखाद्या गोष्टीस तिखट मीठ लावणे ’ इतके असून सुद्धा या शब्दाचे अर्थ माझ्या डोक्यात लवकर बसेनात. पुढे या सर्व शब्दाचे अर्थ ‘ खोटे बोलणे ’ असा होतो हे कळल्यावर मी व्यवहारात वागतांना जरा सांभाळूनच वागू लागलो कारण माझ्याशी बोलतांना कोणी जर मला ‘ थाप मारली ’ तर हे माझ्या सहसा लक्षात येत नसे. मला थाप मारली म्हणून समजा फसवणूक झाल्यावर साहजिकच घरी तोफखाना चाले “ दुसऱ्याच्या खोटं बोलण्यावर विश्वास ठेवला आणि स्वतःच नुकसान करून घेतलस ना, लाज नाही वाटत ! मूर्खा ” सहाजिकच घरी पाय ठेवतांना आज आपण कुठ बंडल मारुन तर फसलो नाही ना, याचा आढावाच मला घ्यावा लागे. त्यामुळे माझी स्मरणशक्ती इतकी वाढली कि, जर शाळेत एकतीस पासून पन्नास पर्यंत जरी पाढे असते तर तेही माझ्या लक्षात राहिले असते. !

खरं म्हणजे मी कधी ‘ पुड्या ’ सोडत नाही. आणि सोडलीच तर ती समोरच्याला पचेलच असे नाही. कारण ‘ पुड्या ’ सोडण्यात कुशल नसल्याने मी सहसा त्या भानगडीत पडत नाही. पण इतर लोक मात्र थाप मारुन आपला फायदा करून घेतात तेव्हा मात्र माझ्या तळपायाची आग मस्तकाला जाते. पण येवढं मात्र खरं कि त्यांनी मारलेली कोणतीही थाप लोकांना पचते तरी कशी ?

माझी एक मैत्रीण, हिला पुस्तक वाचायच इतकं वेड तसच थापा मारायचं सुद्धा ! रहस्यकथा, रम्यकथा, हास्यकथा, प्रेमकथा तसेच ललित वाङमय विषयावरील सर्व पुस्तके हिला वाचायला आवडतं अडिचशे-तिनशे पानाच पुस्तक ती तीन ते चार तासात सहज संपवी कॉलेज नसल्यावर किंवा ऑफ

पिरियडला ती लायब्रीत बसून पुस्तक वाचनात इतकी गुंग होऊन जात असे कि घरी जाण्याचेही हिला भान राहात नसे. साहजिकच उशीरा गेल्या–वर ' गृह ' मंत्र्याचा पहिला प्रश्न असे ' इतक्या वेळ कुठे होतीस ? मग काहितरी थापा मारण्या–शिवाय गत्यंतर नसे. अश्या वेळेस. ' तिच्या घरी अभ्यासाला ', ' तिच्या घरी खेळायला ' ' अम–क्याच्या घरी पुस्तक आणायला ,' ' अमकिच्या वही माझ्याकडे होती तो पोचवायला ' वगैरे थापा मारल्या जात यापैकी एकही थाप लागू पडली नाही तर ' एक्स्ट्रा पिरियड ' होते. या सबबीखाली स्वतःची सुटका करून घेतली जाई.

एक दिवस एका नामांकित लेखकाचे एक प्रसिद्ध पुस्तक हिच्या हाती पडले आणि सकाळपासून ती जे पुस्तक वाचत लायब्रित बसली ते कॉलेज संपवून अर्धा तास झाला तरी हिला घरी जायचे भान नव्हते. योगायोगानेच दुसरे दिवशी काही कामानिमित्त तिच्या घरी जाण्याचा योग आला. गेल्याबरोबर तिने आई-वडिलांना ऐकूजाईन येवढ्या जोरात प्रश्नाचा भडिमार माझ्यावर सुरू केला तो काही लवकरच थांबेना, " आईची तब्येत ठिक आहे ना–रे आता ?" "आणि हे घडल कस काय ?" .... " अस घडेल अस वाटत नव्हत ना ! " येवढ्यात तिची आई बाहेर आली आणि माझ्याकडे पाहात एकदम म्हणाली " अरे हो ! कालच कळल बर का कि तुझी आई पायरी वरून घसरून पडली. जास्त लागल तर नाही ना ? काल ही तुझ्या कडून आली तेव्हाच कळल मला हे सारं, म्हणून तर म्हटल काल हि तुझ्या कडून उशीरा घरी कशी आली, कुठल्या दवाखान्यात भरती केल आईला " ?

मला काय उत्तर द्यावे हे समजेना काल घरी उशीरा येण्याच कारण तिनं अस सांगितल तर ! मघाशी मोठ्यान प्रश्न विचारण्याच कारणही आता माझ्या लक्षात आल.

शेवटी तिच्या केविलवाण्या चेहऱ्याकडे पाहून माझ्यावर सोपवण्यात आलेलं काम मी न करताच निघून आलो.

जनरल स्टोअर्समध्ये किंवा कापड दुकानात पाय ठेवतांना मी तेहतिस कोटी देवांची नावे घेतली. कारण समोरचा दुकानदार मला हमखास फसवणार हे मला माहित असूनही मी त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवतो. " अहो हा कापड किती चांगला आहे. इतर कुठल्याही दुकानांत तुम्हाला असला कापड ह्या किंमतीत तरी मिळणार नाही आणि जर मिळालाच तर माझ्या कडून फुकट घेऊन जा " दुकानदाराच्या अशा बोलण्यावर सरळ विश्वास ठेऊन कापड खरेदी करतो. दोन-चार महिन्यानी मात्र " अक्कल नाही मुर्खाला दुकानदाराच्या बोलण्यावर विश्वास ठेवला आणि असला भिक्कार कापड घेऊन आला, पैसे वाया गेले सर्व " वगैरे वाक्यांशी मुकाबला करावा लागतो.

किराणा दुकानातही कोणतीही डिटर्जंट ... इतर कोणत्याही साबणापेक्षा अधिक शुभ्र ... धूत असते. म्हणून " अहो हा साबण चांगला ... फेस भरपूर येतो याने कपडेही चांगले ... किंमत चार पैशांनी जास्त आहे म्हणून काय ... घरी आल्यावर मात्र आजीचा तोफखाना ... लागतो तो असा " कसाही साबण घेऊन ... काय धड आहे तो साबण ? साधा फेसही येत ... पैसे देऊनही कपडे निघत नाही. " अशा वेळेस ... नदाराला दोन चार थोबाडीत हाणाव्या वाटतात ...

लहानपणी माध्यमिक शाळेत बक्षिस ... भाच्या वेळी एक पाहुणा हजर राही. ...

गरिबीच्या परिस्थितीतून वर आलेला असे. जीवनात आलेल्या प्रत्येक संकटाशी ह्याने अगदी प्रामाणिक पणाने (?) तोंड दिलेले असे. हा आपल्या प्रामाणिक प्रयत्नावर येवढ्या मोठ्या पदावर पोहचलेला असतो. कारण परिचय करून देणाऱ्या अध्यक्षांना तरी कुठे माहित असते कि, हा आतून कसा आहे. आमच्या सारख्यांनी कितीही प्रामाणिक प्रयत्न केले तरी आम्ही येवढ्या मोठ्या पदावर पोहचत नाही.

माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शालांत परि–क्षेला केन्द्रातून किंवा जिल्ह्यातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्याने गाईड कधी वापरलेलेच नसते. शिवाय खाजगी शिकवणीतर नसतेच. आणखी वरतून अभ्यास करतांना रेडिओ ऐकला असतो. मग हा प्रथम क्रमांक मिळवतोच तरी कसा ? आणि सर्व सामान्य जनता ह्याच्या ' ह्या ' बोलण्यावर विश्वास ठेवते तरी कसा कुणास ठाऊक ? आमच्या सार–ख्यांनी गाईड वापरून, शिकवणी लावून, रेडिओ बंद ठेऊन किंवा मुद्दाम बिघडवून आमच्या मार्कांची भरारी ६० ते ७० टक्या पेक्षा जास्त नसते.

कोणतीही सांसारिक स्त्री आपल्या नवऱ्याचा पगार, स्वत.चे वय , नवऱ्याचे खरे वय या विषयी खरी माहिती सांगतांना मला आढळली नाही.

आता व्यवहारात इतके लोक थापा मारतात मग आपल्यालाही थापा मारायला काय हरकत अशा विचार करून मी थापा मारायच ठरवल. पण नंतर नंतर मला अस आढळून आला कि, मी मार–लेली कोणतीही थाप कोणालाच पचत नाही. म्हणून मी थाप मारायला इतका घाबरत असे कि औरंगजेब शिवाजीला घाबरत असेल तेवढाच तरी सुद्धा मनाचा धिटपणा करून अप्रत्यरितीनें थाप मारायच मी ठरवल. नातेवाईकांच्या पत्रांना उत्तर देतांना मी सहसा आळशीपणा करी साहजिकच त्यांना पत्र द्यायला उशीर होत असे. म्हणून पत्र लिहतांना मी पत्र उशिरा देण्याचे कारण ' आई आजारी होती, ' माझी तब्येत ठीक नव्हती ' ! आजोबा जीन्यावरून घसरून पडले ' यापैकी कोणतेही कारण लिहून मोकळा होई त्यामुळे थाप मारल्याचा आनंद मिळे आणि पत्र उशीरा का आले म्हणून कुणी माझ्यावर रागवत नसत. पण थोड्याच दिवसात मला याचा परिणाम दिसून आला कारण ' आई आजारी आहे ' म्हटल्यावर किंवा ' आजोबा पडलेत ' वाचल्यावर सर्वच जण आई–आजोबास पाहण्यास येत त्यामुळे घरात पाहुण्याची इतकी गर्दी व्हायला लागली कि जो–तो आम्हाला विचारी काबे कुणाच लग्न ठरल ?

अलिकडे मी ' अमक्याचं रेशन आणायचं ' ! ह्याचा निरोप पोहोचवायचाय ' ; ' एक्स्ट्रा पिरियड ' आहेत, ' प्रक्टिकल आहे ' अशा प्रकारच्या अनेक थापा मारून पिक्चरला जात असे पण घरी येण्याअगोदर पिक्चरच तिकिट फाडायच विसरे सहाजीकच कपडे धुतांना नेमक आईच्या हातात ते तिकिट लागले तर आईचे आडतांडव पाहावे लागे किंवा कधी कधी प्रसादही !

आमच्या समोरच्या पाठक वहिनी (अर्थात ह्या आमच्या मानलेल्या वहिनी) ह्यांचा पिंट्या सहा महिन्याचा होता. बाजारात जातांना सहसा मी वहिनीबरोबर असतो कारण पिंट्या आणि बाजाराच्या पिशव्या सांभाळणे याना शक्य नसे. एकदा बाजारहाट संपवून बसने जावे या विचाराने बसची वाट पाहात आम्ही बस स्टापवर थांबलो पण काही वेळाने आपण औषध घ्यायचे विसरलो आहोत हे वहिनींच्या लक्षात आल्यावर त्यानी पिंट्याला सरळ माझ्याकडे सोपवून स्वत: दुकानाचा रस्ता धरला. नंतर बस येऊनही वहिनी परत आल्या

नाहीत. शेवटी येतील मागून असा विचार करुन मी बस मध्ये चढलो.

आता बसमध्ये आमच्या जुन्या ओळखीचे कोणी काका बसले होते. मी तर ह्यांना ओळखत नव्हतो आणि त्यांनीही मला लहान असतांना पाहिले होते त्याची स्मरणशक्ती इतकी दांडगी होती कि मी 'अमक्यांचा हा' आहे हे लक्षात यायला त्यांना वेळ लागला नाही. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर त्यांनी आश्चर्याने विचारले " अरे राजू तू लग्न केव्हा केलेस ? कळवल नाही आम्हाला? "

आणि जवळच्या पिंटूला त्यांना मांडीवर घेतल आणि म्हणाले " केव्हा झाला हा ? किती महिन्याचा आहे ? अगदी 'तुझ्या'च सारखा दिसतो ह ! कुठ आहे याची 'आई' ? अरे कळवायच तरी नुसत लग्न केल मुलगा वगैरे घरी घेऊन ये बर का ह्याच्या आईला "

आता थाप मारायला चांगलाच मौका आहे हे माझ्या लक्षात आल्यावर मी त्यांना म्हटल " अहो काका लग्न तर मागच्याच वर्षी झाल आणि सहा महिन्यापूर्वीच 'हा' झाला खर सांगायच ना मी कोणालाच न कळवता लग्न केल " परंतु काका पुढच्या स्टापवर उतरुन गेल्यामुळे जास्त थापा काही मारता आल्या नाहीत.

दुर्दैवाने पंधरा दिवसात ते काका आमच्या घरी आले. त्यांना पाहिल्यावर आपली मात्र काही खैर नाही हे कळल्यावर मी जी मान खाली घातली ती पुन्हा वर केलीच नाही. बराच वेळ काकानी, वडिलांशी आणि आजोबांशी गोष्टी केल्यात पण ! ती 'गोष्ट मात्र काढली नाही, हे माझ भाग्यच !

या नंतर मी, थाप मारल्याचे मला आठवत नाही.

• • •

# मंत्र्यांची लक्षणे

विभाकर कुरंभट्टी
१२वी आर्ट्स

भगवान श्रीकृष्णाने गितेत स्थितप्रज्ञाची काही लक्षणे सांगितलि आहेत. पण आता स्थितप्रज्ञाची लक्षणे सांगण्याचा काळ गेला. आता सांगावी लागतात मंत्र्यांची लक्षणे ती मी सांगतो.

सद्विचार मनातला । सोडून जो आला ।।
गल्ली सोडूनी दिल्लीला । जो खाण्यासाठी गेला ।।
नसे टिकेचे वावडे । फक्त सत्ताच आवडे ।।
दुसऱ्याचे काढतो वाभाडे । तो मंत्री अनुभवी ।।
कोणाविरुद्ध केले बंड । जोराने थोपटले दंड ।।
दुसऱ्याला म्हणती षंढ । केवळ सत्तेसाठी ।।
गरिबांसाठी प्रतिष्ठान । देणग्या घेतल्या दान ।।
इमले बांधले छान । तो मंत्री प्रसिद्ध ।।
उडविले विमान । मदिरेचे पान ।।
झाले दुर्वर्तन । हवाई सुंदरीशी ।।
पाळले दोन पत्रकार । प्रतिमा झुंजार ।।
जाहिरात केलि फार । त्याला मंत्री म्हणावा ।।

* * *

# - पणतीची ज्योत -

लेखिका-सौ. प्रतिभा आडगावकर भडंग
एम. ए. [ ज्यु. ]

गुलाबाच्या ताटव्यातून पाऊल वाटेने चालतांना मिलिंदने त्या बहरलेल्या फुलांच्या मंदमधुर फुलांचा सुवास घेत म्हटलं

" निरु...., ए ऽ निरू...., वाटतं.... वाटतं.... असाच सुगंध आपल्या सहजीवनात भरून राहिला तर काय बहार होईल.... नाही ? "

थंडीच्या त्या दिवसात सगळीकडे धुकं पसरलं होतं. त्या धूसर चंद्रप्रकाशात गुलाबी गुलाब जांभळट रंगाचे दिसत होते तर लाल गुलाब काळपट रंगाचे दिसत होते. निसर्गाने केलेल्या रंग बदलाच्या त्या फुलांचंही रुप नुसतं न्याहाळत राहावं असं मिलिंदला वाटत होतं. पण निरू बरोबर असल्याने त्या फुलांकडे आपोआपच दुर्लक्ष होत होतं. त्या निसर्ग सौंदर्याला दुय्यम स्थान मिळत होतं.

चार दिवसाने मिलिंदच्या नाटकाचा पहिला प्रयोग होता. स्वतः लिहिलेल्या नाटकाचा,.... निरुला आज त्यान खास आमंत्रण दिलं होतं. अगदी वचन दिल्यासारखं हातात हात देऊन तिने ते आमंत्रण स्विकारलं होतं.

पण आजही निवेदिताला त्याच्या स्कूटर वरुन कॉलेजच्या फाटकाबाहेर उतरतांना तिने पाहिलं ! झालं. पुन्हा तिच्या डोक्यात तिडिक उठली. काहीच न बोलता, न विचारता तिने मिलिंदशी पुन्हा अबोला धरला ती त्याला टाळू लागली.

रंगमंचावर नाटकाचा प्रयोग सुरु झाला. खास आमंत्रित लोकांमध्ये निरू असणार म्हणून मिलिंदने गृहित धरलं होतं. " माणसाच्या कलेचं यशापयश हे त्याच्या अंत:स्फूर्ती इतकंच त्याला कुणाकडून तरी मिळणाऱ्या प्रेरणेवर अवलंबून असतं. " " उमललेली कळी " नाटकाचा प्रयोग अतिशय यशस्वी झाला. 'अभिनय सम्राट' म्हणून मिलिंदचं सगळ्यांनी अभिनंदन केलं. वाहवा केली. मिलिंदचं लक्ष मात्र तिकडे नव्हतं. त्याची नजर शोधीत होती ती निरुला ती त्याला कुठेच दिसली नाही. निवेदिता आली तसं त्याने घर गाठलं. भरधाव वेगाने स्कूटर जात

होती. मन स्वत:शीच विचार करीत होतं. कां आली नसेल निरू ? की असेल पण आपल्याला दिसली नसेल ? पोर्चमध्ये स्कूटर थांबवल्याबरोबर त्याने निवेदिताला विचारलं–

" आज निरू नव्हती आली वाटतं, तुझी मैत्रीण ?"

" तुझी की माझी ?"

माझा इकडे जीव व्याकूळ होतोय अन् हिला थट्टा सुचतेय ' मिलिंद मनातल्या मनात पुटपुटला, त्याच्या मौनातच निवेदिता म्हणाली

" आजकाल काय झालंय कोण जाणे पण माझ्याशी निरू धड बोलत नाही. कालतर माझ्या जवळची खुर्ची नाटकासाठी राखून ठेव म्हणून म्हणाली पण आज नाटकाला आलीच नाही. " बोलणं तेवढ्यावरच थांबलं.

दुसऱ्या दिवशी कॉलेजच्या दुतर्फा, मेंदी असलेल्या रस्त्यामधून निरू जात होती. लक्ष असून तिने मिलिंदकडे दुर्लक्ष केलं.

" निरू, काय झालय गं तुला आजकाल ? "

तिने नुसतं ' हुं ' केलं

" निरू, सगळ्यांनी माझं अभिनंदन केलं, वाहवा केली.... तू शिव्यांची लाखोली वाहिली असतीस तरी चालली असती.... सगळ्यांनी 'अभिनय सम्राट'म्हटलं, तू ' अभिनय-शून्य ' म्हटलं असतं तरी माझ्या कानांना ते गोड वाटलं असतं. पण, तू का आली नाहीस नाटकाला ? " मिलिंद एका भारावलेल्या अवस्थेत सारं बोलत होता. निरूने मात्र आपले सुंदर टपोरे डोळे त्याच्यावर रोखले होते. एक शब्दही तिच्या तोंडून निघेना.

" कशाकरता यायला हवंय दोघांमध्ये तिसरं ? की स्कूटरवर फिरवायला एक अन् पायी सोबत चालायला एक अशा मैत्रिणी हव्यात ? "

तिचं हे वाक्य ऐकून मिलिंद स्तंभितच झाला

" काय ?.... कुणाबद्दल ? " मिलिंद म्हणाला

" आणखी कुणाला माझ्या स्कूटरवर मी लिफ्ट दिलेलीच नाही. "

" म्हणजे ? "

" म्हणजे निवेदिता माझी सख्खी लहान बहिण आहे अन् तिच्याशिवाय मी अजून कुणाला लिफ्ट दिलेली नाही " मिलिंद सहजतेने म्हणाला.

निरू अवाक् होऊन त्याच्याकडे काहीक्षण पहातच राहिली '' पण निवेदिता किंवा तुम्ही तसं कधीच बोलला नाहीत !" ती म्हणाली.

" तसं बहीणभाऊ नातं सांगायची कधी वेळच आली नाही. अन् गरजही पडली नाही " मिलिंद म्हणाला.

आपल्या कोत्या मनाची कीव येऊन निरू शरमिंदी झाली अन् मिलींदची तिच्यावर खिळलेली हसरी नजर पाहून लाजेने ती चूर झाली.

थोड्याच दिवसाने........मैत्रीचे रूपांतर प्रीतीत अन् प्रीतीचं रूपांतर लग्नात झाले. निरू कॉलेज कन्यकेची सुगृहिणी झाली अगदी भारतीय संस्कृतीची सारी तत्त्व जपणारी.... सकाळी सडा रांगोळी करण्यापासून ते रात्री देवाजवळ समई अन् तुळशी जवळ दिवा नित्य नेमाने लावणारी अन् सारे शास्त्र पाळणारी.

त्या दिवशी तुळशी जवळ पणती ठेवून त्यातल्या ज्योतीला तिने नमस्कार केला. पणतीच्या मिण-मिणत्या प्रकाशात तिच्या चेहऱ्यावरचे सात्विक, सोज्वळ भाव मिलिंद न्याहाळीत होता. उष:काल अन् सायंकाळ ह्या दोन्ही दिवस-रात्रींना जोडणाऱ्या वेळा मोठ्या मनोहारी निसर्गसौंदर्याची उधळण करीत होत्या. पण मिलिंदचं लक्ष मात्र निरू कडेच होतं. त्याला कुठे माहित होतं की आजची ही संध्याकाळ एवढी रम्य आहे पण रात्र मात्र ह्याच्या उलट असणार !

एवढ्यात, मिलिंदची आई-लिलाकाकू बाहेरून आल्या अन् त्यांनी एक चिठोरं मिलिंदच्या अंगावर फेकलं, ' अडीचशे रूपये एक साडी ' असं ते बिल होतं. आईला कुठेतरी ते सापडलं होतं.

" आम्ही नव्हतो आमच्या वेळेला एवढा पैसा ह्या चिंध्यांमध्ये खर्च करीत तुम्हाला काही खर्चाला ताळमेळच नाही " काकू गरजल्या.

" अगं आई, पण.... तिनं नाही, मीच आणलीय ती साडी माझ्या पसंतीने " मिलिंदने तरफदारी केली.

" काही एवढी बायकोची कड घ्यायला नको " काकू पुन्हा गरजल्या. " असं असेल तर करा वाट्टेल तसा खर्च अन् मांडा राजाराणीचा संसार ! "

मिलिंदचा चेहरा खाडकन् पडला. लग्नानंतरचा हा काळ मुलांच्या जीवनात मोठा आणिबाणीचा असतो एकीकडे आईने आपल्यासाठी सोसलेल्या खस्तांची जाणीव असते तर दुसरीकडे पत्नीच्या साहचर्यामध्ये मन रममाण होते. आईला वाटत असतं ' मुलगा आपल्या सारखं वागत नाही ' तर पत्नीला वाटतं ' नवरा आपलं काहीच ऐकत नाही. ह्यातून सावरायला जेमतेम वर्ष जात नाही तर मुलांचे प्रश्न अन् नेमक्या ह्याच अवस्थेत मिलिंद होता.

" आई, तसं काही आम्ही करणार नाही. तुझा काहीतरी गैरसमज होतोय गं ! "

त्या दिवशी कुणीच काही बोललं नाही निरूही स्फुंदून स्फुंदून रडत होती. तिचे हुंदक्याचे आवाज तेवढे मिलिंदला ऐकू येत होते. आपल्या नवऱ्याला साधा एवढासा खर्च स्वत:च्या मनाने करण्याचा या घरात हक्क नाही का ? असाही विचार कदाचित तिच्या मनात डोकावून गेला असेल. पण कुणाच्याच मनातलं कुणाला काही समजत नव्हतं. देवाने सगळ्यात चांगली गोष्ट कुठली केली असेल तर ' अपारदर्शक मन '

बरेच दिवस असे गंभीर अन शांत वातावरण घरात होते. सर्व व्यवहार सुरळीत चालले होते. मन मात्र कुणाचंच स्थिर नव्हतं. मिलिंद जरी श्रीमंत आई-बापाचा मुलगा असला तरी त्याच्यावर दोन भावंडांची जबाबदारी होती. अन् तो चांगला पगारदार असला तरी संसाराची जबाबदारी त्याच्यावर आता पडली होती. त्याची जाणीव आई आपल्या बोलण्यातून त्याला करून देत होती अन् ते अमान्य करून चालणार नव्हतं.शेवटी येते ती तडजोड! प्रेमाच्या स्वप्नसृष्टीतून जागं होऊन व्यवहाराच्या सत्यसृष्टीत मिलिंदला यावं लागलं. पुन्हा कुठल्याच बाबतीत त्याला काही ऐकून घ्यावं लागलं नाही.

" निरू, तुला काही कमी पडतंय का ? एक दिवस मिलिंदने विचारले.

अंऽहं मुळीच नाही. मलाही संसारच करायचाय, नुसता उथळमाणकेपणा नाही. ज्यात सगळ्याचं कल्याण आहे असं वागण्यातच मला स्वारस्य वाटेल"

अर्थपूर्ण समर्पक उत्तर ऐकून मिलींद स्तिमित झाला. शांतपणे दिव्याच्या ज्योती तेवत असतात त्यांच्या तेजात डोळे अधिकच तेजस्वी दिसतांना. तशी निरूच्या डोळ्याकडे पाहून त्याच्या डोळ्यात एक वेगळी चमक आली ती निराळीच.

• • •

## वेदना झाली सखी

अलका देशपांडे
टी. वाय. बी. ए.

काळ्या डोहात आता
किरण कशाला ?........

अंधाराशी मैत्री झाली
प्रकाश कशाला ?........

आता थोड चालायच
सोबत कशाला ?........

शिशिर माझा सखा
आता वसंत कशाला ?........

वेदनांच गाठोड
माझ मीच सांभाळते

वेदना झाली सखी
कुणाशी दोस्ती कशाला ?........

## - कॉलेज -

प्रिती तीत[illegible]
एस. वाय. बि. कॉम [[illegible]

आम्ही विद्यार्थी एम. जे. कॉलेजचे,
सहकारी सगळे एक दुसऱ्यांचे;
'कॉमर्स' आहे आमची शाखा
टिंगल याची करू नका.
"अकौन्टस् इको; एस. पी; ओ. सी."
शिकतो सारे हौसाहौशी,
'अकौन्टस्' आहे फार कठीण
परवडेल त्यापेक्षा लॅटिन"
"इको" हा तर फारच बोअर
तास चुकवतो बनुन चोर,
"एस. पी." विषय फारच सोपा
ह्याच तासाला काढतो झोपा.
"ओ. सी." म्हणजे मध्यस्थी ठिकाण
व्यापारातले ठोक दुकान,
शिपायाला फारच काम
"मामा" म्हणताच त्याला घाम.
शिक्षक सगळे प्रिय आम्हांस
मिळवुन चालवितात कॉलेजास
कॉलेजची इमारत फारच छान
तुम्हां सर्वांना आमचा प्रणाम

# मी मुलगी आहे म्हणून....

कु. विजया वि. जोशी
१२ वी कॉमर्स [ब]

'मित्रा, तुला हे जग आहे फुलवायचे........'

असे मी गुणगुणत असतांनाच तेव्हा रेडिओने सांगितले, "आताच आपण 'उगवतीचे रंग' हा कार्यक्रम ऐकलात. लेखक आणि सादरकर्ते श्री. भय्या उपासनी" लागलीच माझ्या डोक्यात विचारचक्र सुरू झाले.

खरंच ! त्या गाण्याचा अर्थ असा होता. हे मित्रा, आजच्या नवयुवका, तुला हे जग फुलवायचे आहे. त्याची प्रगती करणे सर्वस्वी तुझ्याच हाती आहे. हो, पण हे काम फक्त पुरूषांनीच करायचे का? स्त्रियांनी चूल आणि मूल यातच गुंतून पडावे का? नाही.

हा विचार माझ्या मनात येतो आहे कारण मी एक मुलगी आहे म्हणून मी जेव्हा पेपरमध्ये बातम्या वाचते तेव्हा पुरुषांचेच [मुलांचे] कर्तृत्व छापून येते. क्वचितच मुलींचे यश पेपरात झळकते, 'हे मिलीटरी ऑफीसर झाले, यानी रशियाला भेट दिली' इ.

इतिहासात आपण अनेकदा अहिल्याबाई होळकर, झाशीची राणी यासारख्या थोर स्त्रियांच्या गोष्ठी वाचतो. राणी लक्ष्मीबाई एक स्त्री असून सुद्धा तान्हया मुलाला पाठीशी बांधून इंग्रजांबरोबर लढली. अहिल्याबाई होळकरांनी पतिनिधनानंतर राज्य मिळवले. राणी येसूबाईनी लहानग्या राजारामला गादीवर बसवून राज्यकारभार चालविला; तर मेवाडच्या पद्मिनीसारख्या अनेक शूर स्त्रियांनी स्वराज्यासाठी आत्मबलिदान केले. अशा या भारताच्या वीरांगना की ज्यांचे गुण पिढ्यान् पिढ्या गावे. श्रीमती इंदिरागांधी एक स्त्री असून सुद्धा भारतासारख्या महान देशाच्या यशस्वी पंतप्रधान ठरल्या.

अशा साऱ्या गुणी शूर व शीलवान स्त्रियांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवूनच मी भारताची नागरिक होणार आहे. हल्ली स्त्रिया पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून नोकऱ्या करतांना दिसतात. अभिमान वाटतो; पण याहीपेक्षा काहीतरी वेगळ करून दाखविण्याची व देशाचे भवितव्य उज्वल करण्याची

माझी मनीषा आहे. त्यासाठी प्रसंगी सैनिक होऊन देशासाठी माझ्या प्राणाची आहुती मी देणार आहे.

माझे एवढे प्रचंड ध्येय आहे खरे. पण ते मी खरोखरच पूर्ण करु शकेन का? आता हेच पहाना; दादाची गोष्ट ठीक आहे. पण माझा लहान भाऊ अवघा सातवीत असूससुद्धा त्याला रात्री घरी यायला कितीही उशीर झाला तरी कुणी मुळीच काहीच कसं बोलत नाही ? रात्री एकटा मित्राच्या कॉलनीत व्हिडिओवर चित्रपट बघायला जाण्यासाठी त्याला परवानगी मिळते. पण मी मात्र रात्री आठच्यापुढे बाहेर राहिलेले आईबाबांना मुळीच खपत नाही. परवाच मी मैत्रिणीकडे महा-लक्ष्म्यांच्या हळदी कुंकवाला गेले होते. तिची वहिनी वगैरे आलेली असल्यामुळे गप्पांमध्ये मला घरी यायला साडेसात वाजले. तर आई म्हणते कशी, " अगं, मी किती घाबरून गेले होते ! तुला शोधायला दादाला सायकलवर पाठवलं आहे. " तशी मी चिडून म्हणाले " तुझं आपलं काहीतरीच ! हरवायला किंवा रस्ता चुकायला मी काय लहान आहे. ?" मग आई म्हणाली, " तसं नाही गं ! पण मुलीच्या जातीनं एकटदुकटं बाहेर राहू नये संध्या-काळचं !" तेव्हा इतका तीळपापड झाला होता की त्याला उपमाच नाही. पण करणार काय ? मुलगी पडले ना ? शेवटी अबला ती अबलाच ! सगळीकडे आपलं, तू मुलगी आहेस मुलीच्या जातीनं जरा जपूनच वागावं !" असे उपदेशाचे डोस काही लोक पाजत असतात. मग लाही होते अंगाची. असं वाटतं, मुलीच्या जन्मात आले हा काय माझा गुन्हा आहे.? मुलांनाच सगळीमुभा आहे काय? मुलगी म्हणून मला येणाऱ्या अडयळयांची उदाहरणे किती देऊम्हणतात. ?

आता हेच पाहा ना ! मागल्या वर्षी आमच्या कनिष्ठ महाविद्यालयाची सहल उत्तर भारतात गेली होती. त्या सहलीला मला आईबाबांकडून परवानगी मिळाली असेल असे तुम्हाला वाटते काय ? ... वाटत असेल तर ते निव्वळ चूक आहे. काय ... म्हणे एवढ्या लांबची सहल तुला झेपणार ना... मुलांची गोष्ट ठीक आहे. सांगा बरं, यापुढे मी ... बोलणार ? तरीसुद्धा मी हट्टाने बाईबाबांची ... वानगी मिळविलीच, पण माझे नशीब मला ... देईल तर शपथ ! एवढ्या कष्टाने परवान... मिळवण्यावर दुसऱ्या दिवशी समजले की सहली... मुलींना प्रवेश नाही. असा संताप आला होता ... वेळी . . . ! पण करणार काय ? समाजाने ... आम्हाला. 'अबला' ठरविले ना ? आम्हीही '... किसीसे कम नही' हे यावर्षी उत्तर प्रदेशा... सहलीला जाऊन सिद्ध करणार आहोत. पाहू ... आमचा बेत कितपत यशस्वी होतो ! स्त्रिया... समानता आहे' असे सर्वत्र वर्तविले जाते. ... वरील उदाहरणावरुन ही गोष्ट कोण बरे ... करील ?

तसेच स्त्रियांना योग्य न्याय मिळत नाही ... स्पष्ट मत आहे. बिचारी एवढी बी. एस. ... झालेली मंजूश्री सारडा ! पण तिच्या ... कोर्टाने चक्क निर्दोष ठरविले अजूनही ... हजारो स्त्रिया सापडतील की ज्यांच्यावर ... कोर्टाने अन्याय केले आहेत. स्त्रियांनी अशा ... संघटित झाले तरच समाजाचे डोळे उघडतील ... स्त्रीला समान हक्क प्राप्त होईल.

मला खेळण्याची, पोहण्याची तसेच सहलीला ... जाऊन विविध स्थळे पाहण्याची व अभ्यासाची ... फार आवड आहे. पण माझी शारीरिक प्रकृती ... नाजुक असल्यामुळे मला लांबच्या सहलींना जाण्याची ... आईबाप परवानगी देत नाहीत. तसेच 'खेळा... सामन्यात भाग घेणे म्हणजे अभ्यासावर ... फिरविणे' असे त्यांचे स्पष्ट मत आहे. परंतु ... फारच हट्टाला पेटल्याने बारावीनंतर खेळात ... घेण्यास त्यांची संमती मिळाली आहे.

नाशिकला दिवाळीत 'भोसला' चा कोर्स असतो. त्यात पोहणे, घोड्यावर बसणे, बंदूक चालविणे वगैरे शिकविले जाते. मला त्या कोर्ससाठी परवानगी मिळाली असेल म्हणता ? छे! नाही मुळीच नाही ! उलट बाबांनी केलेले वक्तव्य नमुद केल्या-वाचून राहावत नाही, " नाशिक हे शहर [मुलीच्या दृष्टीने] तितकेसे चांगले नाही. शिवाय हे तुझे महत्वाचे वर्ष आहे. तेव्हा अभ्यासातच काय लावावचे ते दिवे लावा. " म्हणजे माझ्या मुलीचा जन्मच मला येथे अडला ना ? आता माझी, ते काहीतरी म्हणतात ना, 'एक डोळा हसतो तर दुसरा डोळा रडतो.' तशी गत झालेली आहे कारण एकीकडे खेळात भाग बारावी नंतर का होईना घ्यायला मिळणार, तर भोसलाच्या कोर्सचे मनातून अगदी काढून टाकावे लागणार. खेळण्याने जरी माझा विकास होणार असला तरी पोहणे, घोड्यावर बसणे, बंदूक चालविणे या इच्छा मी माझ्या मनातच ठेवावयच्या का ? मग त्यांचा विकास कधी होणार ?

मी जर मुलगा असते ना तर मी मला हवे ते केले असते. मग मी कोणत्याच बंधनात अडकले नसते. माझा मामा पुढारी आहे. गावोगावी दौरे काढून मस्तपैकी भाषण ठोकतो. मला त्यांचा खूप हेवा वाटती. बऱ्याचदा मी सैनिक होऊन देशासाठी बलिदान करण्याचे व देशाचे ऋण फेडण्याचे मनोरथ आईला बोलून दाखवते.

माझ्या अशा मोठमोठ्या गप्पा ऐकल्या की लोक आईला म्हणतात, " अहो विमलताई, तुमची विजया किनई मुलगाच हवा होता ! "

तेवढ्यात स्वयंपाक घरातून आईची हाक आली, " अगं ! भाजी आणावयाचा विचार आहे की नाही आज ? का स्वयंपाकाला सुट्टी ? " मी खाड्कन समाधीतून जागी झाले. आता रेडिओ सांगत होता, " ये आकाशवाणी है ! अब आप.... " मी खट्टाक-दिशी रेडिओ बंद केला आणि भाजीसाटी पैसे व पिशवी घेण्यास स्वयंपाक घरात धूम ठोकली.

● ● ●

# आठवण

सपकाळे विजय मंगा
१२ वी सायन्स

माझ्या स्वप्नाची राणी
सांगतो एक कहाणी
कर माझ्या स्वप्नाची पहाणी
अनेक फुलांची केलीस तू पहाणी
ती फुल होती फुललेली
पण कोमलत्या फुलांचा वास घे
टीकवून राहीन याची तू जाणीव घे
विचार करू नको संधी जाईल
पण तुझ्या स्वप्नाची आठवण गाईल
कविता आहेस ग प्रेमळ जिवाची
कहानी आहे फक्त दोन प्रेमळांची
आठवणींचा पाऊस पडतो माझ्या स्वप्नाशी
तश्यात कविता लिहतो आठवणींची
हीच आकांक्षा माझ्या कोमलत्या फुलाची

# " अन्याय "

मोरे बि. के.
१२ वी सायन्स

अन्यायाचा प्रतिकार करणे हे मज ठाऊक नाही.
परि, लाचारिने जीणे मज रुचत नाही.
दुसऱ्यांना मदत करणे हे मी कर्तव्य मानतो.
दु:खात समरस होऊनी मी सेवा करितो.
परि, त्याज कडुनो शद्ध गोड मज मिळत नाही.
बोलणे दुसऱ्यांचे ऐकुनीया मी मनात जळतो.
परि, अन्यायाचा प्रतिकार मी करू शकत नाही
मनुष्य लाचार होतो हा परिस्थितीने.
परि, त्यातूनही मार्ग सुचतो हा चिकाटीने.
मनात आलेया की मी असेच करावे.
हीन, दीन, दु:खियांमध्ये सामावून जावे.
जीवनातील कटूसत्य हे समजावून घ्यावे.
परि, दुसऱ्यांना हिणवणे हे व्यर्थ मानावे.

# गुपीत

मधु-किरण
एस. वाय. बी. एस्सी.

कितीतरी दिवसातून
आज बोललीस माझ्याशी

तुझ्या वाक्यातील प्रत्येक शब्द
माझ्या मनातील आग विझवू लागला

अशी कशी ग तू ?
थोडाच वेळ येतेस
किंचीतशी बोलतेस

जणू काही—
सूर्य उदयाला आल्यावर
चंद्र किंचितसा दिसतो मग तो
लुप्त होतो

पण नाही-गं
तो पुन्हा उदयास येतो
पुन्हा तेच प्रेम देतो

आजच माझ्या स्वप्नात आलीस
पण जीवनात येऊ शकत नाहीस
कारण तू
पूर्व दिशेला केव्हा उदयास आलीस
पश्चिमेला केव्हा मावळलीस
मला कळलेच नाही.

मी वेड्यासारखा पुन्हा पूर्वेला पहात राहीलो
तू दिसलीच नाही

आणि अचानक तुलाच माझी काळजी वाटली.
स्वप्नातही हसली

माझ्या मनातही थोडी जागृती निर्माण झाली
अगं आज मी किती आनंदी
स्वच्छंदी वावरतोय
केवळ तुझ्याच त्या प्रेमळ सल्ल्यानी
माझी प्रतिमा वाईटातून चांगली झाली

कसा विसरू मी तुला—
प्रिये, येत जा येत जा
निदान स्वप्नातल्या सुर्याला
पूर्वेला उदयोन्मुख होत जा
असेच सल्ले मला देत जा
कदाचित मी मोठा होईन.
नाव कमवीन

येत जा अशीच तू येत रहा
मी आपले गुपीत नेहमीच
अबोल ठेवीन.

*

# डिस्को पुराण

जयराज छपरीबंद
एफ. वाय. बी. ए.

एरव्ही शांत आणि प्रसन्न असलेल्या पुण्यनगरी-वर अचानक पानशेतची कळा आली, भूकंपाची उध्वस्तता आली, बॉंब हल्याची परिस्थिती निर्माण झाली आणि याला कारण एक नाटक ! त्या नाट-कामुळे एवढा अपघात होईल याची कुणालाच कल्पना नव्हती. संत तुकारामावरचे भक्तिपूर्ण, सोज्वळ नाटक असेल म्हणून प्रेषक आदि अनवधा-नाने बालगंधर्व रंगमंदिरात गेले आणि अचानक पानशेत धरण फुटल्या सारखे झाले.

" तुकाराम-मस्तवाल " या नाटकाच्या सुरु-वातीलाच तुकारामाचे दर्शन झाले आणि धर्मपरायण बाया-बापड्यांनी हात जोडले. पण रंगमंचावरचा हा तुकाराम भजन करण्या ऐवजी गांजा मळू लागला ! त्यांच्याकडे एक 'चालू बाई' आली. ती कामुक चाळे करीत म्हणाली, " तुकारामराव घाईत का ?"

तिचा तो थाटमाट निरखून पाहात तुकाराम म्हणाले, " बाई, तुमचा मार्ग चुकला बरं .... ! "

ती बाई फणकाऱ्याने म्हणाली, " आता काय करावं ? नवऱ्यानं टाकलेल्या बाया तुमच्याकडं येतात; अशी किर्ती पसरली तुमची, म्हणून आले मी आणि माझा मार्ग चूकला ? "

" होय बाई, तुमच्यासारख्या बायांनी मागच्या दारानं यायचं असं पुढच्या दारानं नाही. बरं आलात तशा आत जा आणि चहा करा मगच अफूची गोळी चढवू "

तुकारामाचं हे अपूर्व दर्शन पाहून समस्त प्रेक्षक वर्ग चाट पडला. पण तुकारामांच्या वर्तनाचा दुस-ऱ्याच क्षणी उलगडा झाला. कारण एक दाढीवाला अब्दुला आला आणि म्हणाला, " काय तुकाराम बाईंडर, ये नया पंछी पकडा क्या ? "

हात्तिच्या ! म्हणजे हा संत तुकाराम नव्हे तर ! हा आहे तुकाराम बाईंडर ! बरं चालायच, ह्या बाईंडर लोकांची इतकी मौज असते याची पूर्वी लेखकांना व प्रकाशकांना कल्पना नव्हती. ती असती

तर अनेक लेखक व प्रकाशक आपले व्यवसाय सोडून बुक बाईंडींग मध्येच शिरले असते.

नाटकाचा पहिल्या प्रवेशात अब्दुला जातो व तुकाराम बाईंडर बाई जवळ जाता जाताच रंगभूमीवर अंधार होतो. पुन्हा उजेड होतो. तेव्हा अचानक राघोबादादा आणि आनंदीबाई प्रवेश करतात. आनंदीबाईच्या हातात एक कागद असतो. तो वाचतांना आनंदीबाई म्हणतात, " हा पहा तुकारामाच्या अश्लील लिखाणाचा पुरावा ! "

" रूप पाहता लोचनी। सुख झाले हो साजनी ॥ अहो, शेजारणीला उद्देशून असं लिहणं म्हणजे भारतीय संस्कृतीचा अपमान आहे. आपण ताबडतोड ह्या तुकारामाला रोखलं पाहिजे.

राघोबा :- ( एका कागदावर सही करीत ) बरं हा घ्या हुकूम ! ' तुकारामाला रोखा ' झालं आता आपल्या मनासारखं ?

आनंदीबाई :- ( उल्हसित होऊन ) हो. आता आपण साखरभात खाऊन अंमळ विश्रांती घ्यावी. [ राघोबा जातो ] कोण आहे रे तिकडे ? [ दोन सेवक येऊन उभे राहतात ] जा आणि त्या घाशिराम कोतवालाला आत्ताच्या आत्ता माझ्या पुढे आणून उभा करा. [सेवक जातात]

घाशीराम :- ( विनेतून ) नाही, नाही मी येणार नाही [ दोन सेवक घाशीरामला धरून आणतात, आनंदीबाईला मुजरा करून ] श्रीमंत, मी या नाटकात कसा येणार, माझा जन्म आपल्या मृत्यूनंतर झाला आहे.

आनंदीबाई :- घाश्या, तुला अक्कल आहे कां ? अरे, हे अनैतिहासिक नाटक आहे. या नाटकात कोणीही केव्हाही येऊ शकतं आणि काहीही घडवू शकतं ! [ राघोबांच्या हुकूमात खाडाखोड करून घाशीरामला देते ] जा, हा पेशव्यांचा हुकूम ' तुकारामला ठोका ' असा स्पष्ट हुकूम त्यानी दिलेला आहे.

घाशीराम :- ( हुकूम बारकाईने पाहात ) बाईसाहेब, आपण फक्त ' र ' चा ' ठ ' करायचा आहे. इथं ' रोखा ' शब्द खोडून ' ठोका ' असा बदल केलेला ओळखू येतो.

आनंदीबाई :- मूर्खा, तुला एकदा सांगितले ना ? अनैतिहासिक नाटक आहे म्हणून ? आणि तुकारामाला ठोकून काढ.

घाशीराम :- गुस्ताखी माफ असावी श्रीमंत, पण तुकाराम कोण, कुठला, काय करतो, कुठं रहातो याचा काहीच उल्लेख नाही. नुसतं ' तुकारामला ठोका ' म्हटल्यावर मी कोणत्या तुकारामाला ठोकायचं ? श्रीमंत कुठं आहेत ?

आनंदीबाई :- श्रीमंत साखरभात खाऊन अंमळ विश्रांती घेत आहेत. पण एवढ्या किरकोळ कारणासाठी श्रीमंतांची झोपमोड करणं इष्ट नाही. तू असं कर, ' देहू ते पुण्यापर्यंतच्या सर्व तुकारामांना ठोकून काढ ' श्रीमंतांच्या हुकूमाचं तंतोतंत पालन झालचं पाहिजे.

( त्यानंतरच्या दृष्यात संत तुकाराम भजन करीत बसले आहेत. हातात चाबूक घेऊन घाशीराम येतो. )

घाशीराम :- नाव ?

तुकाराम :- तुकाराम !

घाशीराम :- ( चाबूक उगारतो ) मग फडके !

तुकाराम :- थांब, थांब, घाशा, अरे ' परचक्र काय हरदासाचे माथा ? ' अरे घाशा, तू आपली जागा सोडून दीड-दोनशे वर्षे आधीच कसा कडमडलास !

घाशीराम :- म्हणजे तुकाराम महाराज ते आपणच कां ? मग तुम्हाला ठोकण्यापूर्वी तुमच्या पाया पडू द्या. [ पाया पडतो व तुकाराम आशिर्वाद देतो ] महाराज हे अनैतिहासिक नाटक आहे. इथं काहपण घडतं [ विचार करून ] हो, एक मात्र हाय महाराज. तुम्ही मला मटक्याची शुभराशी सांगा म्हणजे मी तुम्हाला ठोकणार नाही. आनंदीबाईना मारीन थाप, सगळे तुकाराम ठोकूल काढले म्हणून !

तुकाराम :- वरली मटका का कल्याण ?

घाशीराम :- दोन्हीबी सांगा ' अधिकस्य अधिकम् फलम् ' असं कायसं नाना म्हणत होते.

तुकाराम :- ठीक तर, वरलीचा रतन खत्री मटका एक्कयाला मेंढी येईल बघ आणि कल्याण मटका डबल सात लंगडाघोडा क्लोज टू ओपन.

घाशीराम :- ( नमस्कार करून ) लई उपकार झाला महाराज. आता बसा भजन करीत (जाता जाता थांबतो ) अरंऽऽ रंऽ रंऽ विसरलोच बघा. अहो महाराज, उठा, जरा नाचायला पाहिजे.

तुकाराम :- मी नाच करू ? घाश्या, तुला काय लाज लज्जा ? अरे मी काय .... आहे की गोपीकृष्ण ? नाच कसा करणार मी ?

घाशीराम :- अहो महाराज, हे म्युझिक नाटक हाय, इथं समद्यास्नी नाचायला लागतयं

तुकाराम :- [ उभा राहून ] खरचं की रं घाश्या; चला तर जरा नाचू या. [ दोघेही नाचतात ]

[ या दृष्यानंतर रंगमंचावर अंधार पडतो, उजेड होतो तेव्हा दशरथ आणि कैकेयी रंगमंचावर दिसतात ]

दशरथ – कैकेयी, मी रघुकुलाची शपथ घेऊन सांगतो, तू मागशील ते दोन वर देईल असे मी तुला वचन दिले आहे ते मी आज पाळीन

कैकेयी :- महाराज, पहिल्या वराने उद्या माझ्या भरताला युवराज म्हणून राज्याभिषेक करावा दुसरा वर मी मागते की रामाने चौदा वर्षे वनवास करावा.

दशरथ :-[ अंगावर वीज कोसळल्या सारखा करून ] काय हे कैकेयी ? हे वर तुला दिले तर मी जगू शकणार नाही.

कैकेयी :- ते मी जाणत नाही. ऐन युद्धात मी तुमचे प्राण वाचविले. तुम्ही मला वर दिलेत ते मी आज मागीतले. सत्यवचनी राजाप्रमाणे ते तुम्ही मला दिलेच पाहिजेत.

दशरथ :- कैकेयी ! हा भयंकर अपराध आहे [ अचानक रामशास्त्री रागारागाने प्रवेश करतात [

रामशास्त्री :- या अपराधाला एकच प्रायश्चित्त ! कैकेयी मी तुला देहान्त प्रायश्चित्ताची शिक्षा देतो.

कैकेयी :- ( थक्क होऊन ) अहो रामशास्त्री तुम्ही मराठ्यांच्या इतिहासातून इथं रामायणात कसे घुसलात ?

रामशास्त्री :- कैकेयी, नाटकं जशी अनैतिहासिक असतात तशी अपौराणिकही असतात. अशा नाटकात कुणीही केव्हाही,

येऊ शकतो. माझा डायलॉग मी बरोबर म्हटला आहे. कैकेयी! मी तुला एकच प्रायश्चित देतो .... देहान्त प्रायश्चित! पण थांबा ! देहान्त प्रायश्चित्त घेण्या-पूर्वी आपल्याला काही काळ संगीताच्या तालावर नर्तन केले पाहिजे. चला तर आपण नाचू या !

( रामशास्त्री, दशरथ आणि कैकेयी नाचतात अंधार. पुन्हा उजेड पडतो तेव्हा नेपोलियन आणि हिटलर हातात हात घालून हसत प्रवेश करतात. मराठी नाटकातील हा आंतरराष्ट्रीय टच होय )

नेपोलियन :– काय हिटलरराव? तुम्ही आज मराठी मुलखात कसे ?

हिटलर :– काही नाही, जरा मिशांचा कट करून घ्यायचा होता रामनगरकर कडनं. पण नेपोलियन साहेब, तुम्हीसुद्धा पुण्यात ?

नेपोलियन :– नाना फडणिसांना भेटायला आलो होतो.

हिटलर :– कशासाठी ? मुत्सद्दीगिरीचे धडे घेण्यासाठी ?

नेपोलियन :– छे ! छे ! ! नानांनी पुण्यात ‘ डान्सिंग क्लास ’ काढला आहे म्हणून ऐकलं. नानांची ख्याती पॅरिसपर्यंत पोचली म्हणून नाच शिकण्यासाठी आलो. पण नाना कुठं आहेत ?

( तेवढ्यात नाना नाचत नाचत येतात. मागे ब्राम्हण कोरसने नाचत गात येतात)

नाना :– ( नाचत ) गौरी बोले, नाना डोले–

ब्राम्हण :– डोले ऽ ऽ ले

नाना :– गौरी नाचे, नाना नाचे–

ब्राम्हण :– नाचे ऽ ऽ चे

नाना ;– नाना डोले, घाशीरामचा कारभार चाले–

ब्राम्हण :– चाले ऽ ऽ ले.

नेपोलियन :– ( पुढे होऊन ) नमस्कार नानासाहेब मी नेपोलियन बोनापार्ट. मला आपल्या नाचाच्या कोचिंग क्लासमध्ये नाव घालायचं आहे.

नाना :– ( नाचत ) घाश्याकडे फी द्या सध्याकाळी क्लासला या.

हिटलर :– ( नेपोलियनला ) अहो हे नाना दिवसभर नाचतात मग राज्याचा कार-भार केव्हा करतात ?

नाना :– ( मध्येचगात ) तो बावन खणी... चालतो.

नेपोलियन :-- नाना, मला बॉलडान्स शिकायचा आहे

नाना :-- भारतीय नृत्य शनिवारवाडा शाखे... टोपीवाल्यांसाठी कॅम्पात ब्रांच काढली आहे.

( एवढ्यात घाशीराम घाईघाईने येतो

घाशीराम :-- श्रीमंत, बाहेर एक माणूस आपणा... भेटू इच्छितो. पण अगदी गबाळ... माठ्या दिसतो.

नाना :– ( नाचत ) असं ! मग पाठव... दे. आंत. ( घाशीराम जातो... ढगला शर्ट, भली मोठी हाफ... गुडघ्यापर्यंत लटकलेली नाडी... वेशात दादा कोंडके प्रवेश करतो )

नाना :– ( दादा कोंडकेला बघताच दचकून ) अरे तू आपली फिल्म इंडस्ट्री सोडून... कसा तडफडलास ?

दादा कोंडके:– ( एकदम आवेशाने ) च्या आयला... तुम्हाला एवढीपण अक्कल नाही... अनैतिहासिक नाटक आहे म्हणून... हे काय? राज्याचं सगळं नाटोळं... लय आणि तुम्ही इथे डान्स करत... निघालात, च्या आयला !

नाना :– अहो, पण दादा तुमच्या येण्याचं काही कारण वगैरे ....

दादा कोंडके:– अरे ! च्या आयला म्हंजे तुमच्या त्याच्यात अजून ते घुसलच नाही वाटतंय !

नाना :– ( थोडयाशा शंखेने ) त्याच्यात म्हणजे नेमक कशात हो ?

दादा :– तेच ते ! अरे तुम्हारे पास ‘ वो ’ ही नही हैं, तो तुम्हारे उसमे ‘ वो ’ कैसे क्या घुसेंगा ?

नाना :– पुन्हा तेच, अहो दाद, हे घुसेंगा ‘वो’ म्हणजे नेमकं काय ?

दादा :– अहो अक्कल ! च्या आयला तुमच्या जवळ अक्कल आहे कां ? ( तेवढ्यात घाशीराम दोन जणांना पकडून आणतो)

घाशीराम :– श्रीमंत, या दोघांनी दरोडा घातला आहे. काल रात्रीच. ( नाना बोलणार पण तेवढ्यात एकदम राजाच्या आवेशात )

दादा :– चले जाओ ! लेके जाओ ! आणि दोघांचे हात छाटून द्या.

नाना :-- अहो, पण ....

दादा :-- खामोश ! हुकुमकीतालिम हो ।
( घाशा घाबरून निघून जातो )

नाना :-- ( थोडेसे रागावून ) दादा, श्रीमंत आम्ही की तुम्ही ? राज्य कोण चालवतोय ?

दादा :-- हे पहा नाना, राज्य तर तुम्ही फक्त नावाला चालवता; खरं म्हणजे तर तुम्ही ‘ डान्सींग क्लास ’ चालवतात.
( नंतर हिटलर नेपोलियनकडे वळून )

ऐ, ऽ, ! तुमच्या आयला ! तिकडे असे कुत्र्यासारखे कान टवकारून कां बसलात चला आपण सगळे डान्स करु या.

( सगळे डान्स करायला लागतात आणि हळू हळू पडदा पडतो )

● ● ●

## भारताचे भविष्य–

जगाच्या नकाशावर भारताचे स्थान कोणते ? केवळ आमचा भूतकाळ मोठा होता, एवढी फुशारकी मारून भविष्यकाळ घडविता येईल का ? आधुनिक जागतिक चताओढीत आपल्या पुराणपद्धतीने आपली प्रगती कितपत होईल ? आपण अगदी मागासलेले आहोत, हे विसरून आम्ही सर्व राष्ट्रात अव्वल आहोत, अशी प्रौढी मारण्यात स्वतःची फसवणूक तर होत नाही ना ? तुम्ही तरुण आहांत, स्वतंत्र आहांत. राष्ट्राचे भवितव्य घडविण्याची जबाबदारी तुमच्यावर आहे. तुमचे चारित्र्य, तुमची नीतिमत्ता, तुमचे सद्-गुण जितक्या उंच थराला पोहोचतील, तितके राष्ट्र उंच होईल. हार मूर्खांच्यामुळे काही लोकशाही स्थापन होत नाही. लोकशाहीतही शहाण्यांनाच कार्य आणि कर्तव्य असते. आपल्या विज्ञान शाळातून व लष्करातून उत्साहाने व नवउमेदीने काम करणारे तरुण मी जेव्हा पाहतो, तेव्हा माझे हृदय आनंदाने अभिमानाने भरुन येते हिंदुस्थानचे भविष्य माझ्या हातात नाही, ते तुम्हा तरुणांच्या हातात आहे.

– पंडित जवाहरलाल नेहरू

# वाटले होते एकदा

कु. कल्पना सांगोरे
१२ वी कॉमर्स

वाटले होते एकदा,
मनातील गाणं पक्ष्यांना शिकवावं
निरभ्र आकाशी चांदणं वेचीत जावं
वाटले होते एकदा,
बागेतील फुल गुफीत जावं
धुंद होऊन त्यांना कवटाळावं
वाटले होते एकदा,
भल्या पहाटे प्राजक्तानं न्हाऊन निघावं
सागरामध्ये मनाला झोकून द्यावं
शेवटी वाटलं,
अस्मानी सोबतीपेक्षा इतकं व्हावं
तुझ्या प्रीतीत माझं विश्व फुलून जावं.

* * *

## विरश्री चे आश्रयस्थान

वीरवृत्तीचे आश्रयस्थान कोणते ? माणसाचे हृदय ? त्याचे हात ? की त्याची हत्यारे ? यापैकी हत्यारे केवळ साधन मात्र आहेत. साधन कितीही तीक्ष्ण, कार्यक्षम आणि कुशल असले, तरी अखेर साधनच ! साधन वापरणारे हात जर मजबूत नसतील तर उपयोग काय ? हाच न्याय माणसांच्या हातांनाही लागू आहे. ते हात कितीही बळकट असले तरी त्यांना प्रेरित करणारे हृदय जर दुबळे असेल, तर ते हातही काही कामाचे नाहीत. तात्पर्य, वीरतेचे आश्रयस्थान हत्यारे किंवा हात नाहीत, माणसाचे हृदय आहे. वीरवृत्तीच्या विकासासाठी माणसांच्या हृदयांचा विकास होणे जरूर आहे. वीरतेचा विकास म्हणजे शस्त्रबलाचा विकास होय.

दादा धर्माधिकारी–

---

# जीवन माझे

सुनिल मधुकर गुरव
एस. वाय. बी. ए.

माझ जीवन म्हणजे विहीर आहे
तिच्यात सुखाचं पाणी फारच थोडं
आणि दुःखाची कोरड मात्र भरपूर आहे
दुबळ शरीर विहीरीच्या काठावर
तोल सावरून राहाटासारखं उभं आहे
मनाच्या दोराला आशेची बादली लावून
सुखाचं पाणि ओढण्याचा प्रयत्न करतो

पण........
राहाटावरुन सोडलेला दोर
पाण्यापर्यंत पोहोतच नाही
आणि पोहोचला तरी पाण्याने भरलेली बादली
दुबळ्या राहाटाला पेलवत नाही
त्यामुळे दोरी ओढणारा माझा आत्मा
तृषार्तच राहतो....... अतृप्तच राहतो.

*

# ' सुंदरीचे ध्यान

अनिल पा…
बी. कॉम.

सुंदरीचे ध्यान उभे खिडकीमध्ये ।
कर गजावरी ठेवोनिया
गळा नेकलेस कासे गोल साडी ।
कापले केस कानावरी
ईअरिंग वा टॉप्स तळपती श्रवणी ।
कंठी तन मनी – विराजित
तु का म्हणे ? माझे ह्यात सर्व सुख !
पाहीन सी मुख आवडीने

*

---

# आघात !

ज्योती रमेश शिंपी
११ वी कॉमर्स (एफ)

फोनची बेल कडाडली शांताबाईने फोन हातात घेतला व म्हणाली " हॅलो कोण बोलतय? " पलिकडून आवाज आला की फोन हेमंत जवळ द्या. तो आवाज कोणा एका स्त्रीचा होता. दोन मिनिट थांबा म्हणून शांताबाईने फोन खाली ठेवला व त्यांनी आपल्या मुलाला ( हेमंतला ) आवाज दिला की हेमंत तुझा फोन आलाय. हेमंत आंघोळ करून बाहेर आला. फोन कानाशी लावताचम्हणाला " हलो " पलिकडून आवाज आला " हेमंत तुम्ही मला ओळखले नाही. अहो आज आपल्या लग्नाचा वाढ दिवस " पलिकडचा असा पहिला आवाज ऐकताच हेमंतने फोन खाली ठेवला व म्हणाला. म्हणजे आज माझा काळा दिवस, तेव्हा हेमंतला आपल्या स्वतःचा भूतकाळ आठवला.

हेमंत हा आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा तो लहान असतांना त्यांचे वडील देवाघरी गेले मग आईने मोल मजुरी करुन हेमंतला मोठे केले. हेमंत सुद्धा लहानपणापासून हुशार होता. दिसावयास तो काळा होता तो सी ए ( C. A. ) झाला होता. महिन्याला २००० रु. तो कमवत होत. त्याच्या आईला वाटले की आपण आता हेमंताचे लग्न करावयास पाहिजे. हेमंताच्या चुलत मावशीने निरोप आणला की आपल्याच गावात राहणारी गंगूबाई हिची मुलगी सुरेखा ही दिसावयास खुप सुंदर आहे.लांबसडक केस,बोलकेडोळे धारदार नाक,सडपातळ देह, सावळी कांती हे तिचे वर्णन आहे. तिचा हा निरोप ऐकताच शांताबाईला असे झाले की आपण त्या मुलीला केव्हा पाहू आणि आणि केव्हा नको ! त्यांनी गंगुबाईला निरोप पाठविला की आम्ही तुमची मुलगी पाहावयास उद्या संध्याकाळी येणार आहोत. गंगुबाईला आनंद झाला. ठरल्याप्रमाणे शांताबाई, हेमंत आणि मावशी हे मुलीला पाहावयास गेले सुरेखा चहा, पोहे, घेवून आली. ती इतकी काही सुंदर होती की हेमंतला वाटले की आपण एखाद्या परीचे स्वप्न तर पाहत नाही ना? हेमंताच्या आईला व स्वत.ला हेमंतलासुद्धा मुलगी आवडली.त्यांचे लग्न ठरले आपल्या आवडत्या सुनेसाठी शांताबाईने खूप दागिने केले. भरपूर साड्या घेतल्या त्याचे लग्न झाले. लग्नात सुरेखाच्या मैत्रिणी

आल्या होत्या. त्या हेमंत समोर सुरेखाला म्हणाल्या "सुरेखा तू एकटीच आमच्याकडे चहा, पोहचाला ये. ह्या काळचाला आणू नको" हेमंतला खूप वाईट वाटले.त्याला वाटले की सुरेखा आता त्यांची चांगली काढेल. पण उलटचं झालं ती मैत्रिणोला म्हणाली "हो ग मी एकटीच येईल." असे म्हणून तिने हसत हसत हेमंतकडे पाहिले. तितक्यातच आणखी एक तरुण मुलगा म्हणाला. ही जोडी विजोड आहे. पण ही याला पेलवली गेली तर चागलेच आहे. नाही तर लागेल दुसऱ्याच्या किंवा तिसऱ्याच्याहाती तो तरुण ऐवढे बोलून निघून गेला. तो गेल्यावर हेमंताचे त्याकडे लक्ष गेले पण त्याचा चेहरा पाहा-वयास भेटला नाही. त्याची आकृती फक्त पाठमोरी दिसली.

लग्नाच्या पहिल्या रात्रीसुद्धा सुरेखा हेमंताजवळ गेली नाही. पाणी प्यायचे नाव करून ती कोठे तरी निघून गेली. तिने कधीही कोणत्याच कामाला हात लावला नाही. आणि सतत ती गॅलेरीतच उभी राहत असे. रोज नविन, नविन साड्या घालून हेमंत बाहेर पडला की ती बाहेर पडायची व हेमंत घरी येण्याच्या पाच मिनिट अगोदर यायची तिचे हे वागणे पाहून हेमंतची आई म्हणाली, अग सुरेखा तू कधी स्वयंपाक करीत नाही. शिवाय रोजच्या रोज नविन नविन साड्या घालून सकाळची जाते तर संध्याकाळीच येते. हे तुझे वागणे चांगले नाही लोक नाव ठेवतील. तेव्हा सुरेखा म्हणाली "मला लोकांशी काय करायचे ? आणि हे पहा सासुबाई मी स्वयंपाक करणार नाही. मी माझं सौंदर्य नष्ट करणार नाही. हेमंतला भरपूर पगार आहे. तुम्ही सर्व कामाला बाई लावा आणि हे पण ऐकून घ्या की मी कोठेही जाईल. आता बोलले या पुढे मला बोलायचे नाही सांगून ठेवते."

सुरेखा ही हेमंत बरोबर कधी फिरावयास गेली नाही. हेमंतला वाईट वाटले की, सुरेखा आईचे काही ऐकत नाही. तसेच ती तर माझ्याशी बोलत नाही. सुरेखाच्या अशा वागण्यामुळे आ[illegible] देखील माझ्याशी बोलत नाही. कधी सुरे[illegible] हेमंतला पाणी प्यायावयास आणून दिले नाही. [illegible] चहा आणून दिला नाही. सुट्टीच्या दिवशीसुद्धा [illegible] एकटाच असे. तो एकदा विचार करीत ब[illegible] होता. तेवढ्यातच शेजारची पिंकी पळत आ[illegible] आणि हेमंतला म्हणाली, काका, काका आज [illegible] नाही. काकूने नविन साडी घातली. शिवाय [illegible] मेकअप केला आणि दुसऱ्याच काकाच्या हातात [illegible] घालून आमच्या शाळेच्या बगिच्यात गप्पा [illegible] उभे होते. तेव्हा मीच तिला म्हणालो की, तो [illegible] काळा आहे का गोरा. तेव्हा ती म्हणाली "[illegible] काका काळा काळा नसुन खूप गोरा, गोरा [illegible] आहे व उंच आहे.तेव्हा हेमंत पिंकीला म्हण[illegible] अग तो तिचा भाऊ होता. पिंकी गेल्यावर हेमं[illegible] मन मस्तच किलबिचिल झाले.

तोच हा तरुण असावा की लग्न मंड[illegible] बोलला होता. "पेलवणाराला हे पेलले तर [illegible] नाहीतर लागेल दुसऱ्याच्या किंवा तिसऱ्याच्या हा[illegible] काही वेळाने सुरेखा घरी आली. तिच्या कपड[illegible] तिने आवर सावर केली. आणि सासूबाईला म्ह[illegible] की, "मी माझ्या मैत्रिणीकडे मंगळागौरीला [illegible] आहे" दोन तीन दिवसांनी परत येईल. पण [illegible] तीन दिवस झाले तरी सुरेखा परत आली [illegible] लग्न मंडपात बोलणाऱ्या तरुणाबरोबरच ती [illegible] गेली. आणि तिथूनच फोन केला. "हॅलो [illegible] सुरेखा बोलत आहे. आपल्या लग्नाचा आज [illegible] दिवस आहे. आठवल का तुला ?

"पण आता जखमेवर मीठ का [illegible] सुरेखा ? तुझ्या विश्वासघाताच्या वर्तमान[illegible] जातीला खाली मान घालावी लागेल" असे [illegible] बसे म्हणून हेमंतच्या हातातून रिसिवर [illegible] पडला ! त्याचे डोळे गरगरू लागले व तो [illegible] खाली बसला. !

# कविवर्य कामचलाऊ

रविंद्र मोराणकर
एफ. वाय. बी. ए.

कवी 'कामचलाऊ' म्हणजे आमच्या 'भामटे' गावचं भूषण होतं. एक लेणं होतं. त्यांचं पूर्ण नांव दगडोबा कामकरु पोटभरू असं असलं तरी दगडोबा हे एखाद्या नाजूक, भावस्पर्शी, हळव्या कवीचं नाव होऊ शकत नाही आणि पोटभरू हे सुद्धा काव्यमय वाटत नाही. त्यामुळे दगडोबांनी स्वतःला 'कामच-लाऊ' हे टोपण नाव घेतलं होतं

आमचे कविराज औदार्याबद्दल प्रसिद्ध नव्हते, पण त्यांचा एक गुण होता; तो म्हणजे ते इतरांना औदार्य दाखवायला प्रवृत्त करीत असत. कारण कविराज स्वतः नोकरी, धंदा वगैरे काही करीत नसत. कवितेवर मिळणारा पैसा आणि मित्र, नातेवाईक यांचं औदार्य यावरच ते विसंबून असत जगाची उलथापालथ करणाऱ्या, वैश्विक क्रांती करणाऱ्या महाकवीने 'रोहयो' खाली काम करणं किंवा कुणाची दोन पैशाची नोकरी करणं म्हणजे कवित्वाला काळिमा आणणारे आहे असं 'कामचलाऊ' चे प्रामाणिक आणि प्रांजळ मत होते.

त्यांचं जीवनचक्र तर असं होतं कीं, कुठेही अन्याय झाला तरीही ते तुटून पडत असत. कोण-त्याही देशात गरीब जनतेची पिळवणूक झाली; अन्याय झाला तर ताडकन त्याचा निषेध करणारे काव्य रचून ते 'दैनिक भामटे' या वृत्तपत्रात देत असत. गाव जरी लहान असल तरी त्या गावचं स्वतःचं दैनिक वृत्तपत्र आहे आणि त्याचे संपादक ज. रा. शहाणे यांना काव्याची फार आवड आहे. 'कामचलाऊं'च्या कवितेला ते नियमितपणे साडे बारा रुपये पन्नास पैसे आणि दोन अंक मोबदला म्हणून देत असत आपल्याला त्याऐवजी साडेपंधरा रु. आणि चार अंक असा मोबदला मिळावा म्हणून कवीराजांनी 'दैनिक भामटे'च्या कार्यालयासमोर आमरण उपोषण केले. तत्पूर्वी संपादक ज. रा. शहाण्यांनी त्यांची मागणी मान्य केली. आमरण उपोषण सुरू करताच अवघ्या ५ पांच सेकंदाच्या आंतच ते संपविण्याची तडजोड झाली. संपादकाच्या हातून गूळ-पाणी घेऊन कामचलाऊंनी उपोषण समाप्त केले.

फुकट मिळालेले काहीही सोडायचे नाही असा कविराजांचा जीवनक्रम होता. ते समोरच्या उपहार गृहात शिरले तिथे त्यांनी वडा, भजे, समोसा वगैरे खाऊन उपोषणाची सांगता केली.

तसं पाहिलं असता कविराजांचा गावात फार गाजावाजा कुठल्याही दुकानात गेल्यावर माल खरेदी करून कविराज म्हणायचे, " नांवावर मांडून ठेवा " म्हणून पुढची वाट धरत. त्यामुळे सर्वच दुकानदारांनी त्यांचा धसका घेतला होता. आपल्या गावाचं नाव ' भामटे ' असं असू नये म्हणून कविराजांनी गावकऱ्यांना नाव बदलण्यासंबंधी धाडसी कल्पना दिली. ' उतावळा नवरा गुडघ्याला बाशिंग ' या प्रमाणे कविराजांची स्थिती कविराजांनी गावात एक जाहीर सभा घेतली. आणि सर्व नागरिकांना आवाहन केले, "आपल्या गावाच्या नावामुळे आपली बदनामी होत आहे, म्हणून ' भामटे ' हे नाव बदलून त्याऐवजी काही तरी चांगलं ठेवावं, असा मी ठराव करतो. कोणतं नाव ठेवावं याबद्दलच्या सूचना आमजनतेने करावयाच्या आहेत. या सूचना पऊणे आठ दिवसाच्या आंत " दैनिक भामटे " ह्या वृत्तपत्राकडे पाठवाव्यात.

या आवाहनाला प्रतिसाद म्हणून भगवानपूर देवगाव अशा अनेक नावाच्या सूचना आल्या. अखेर सर्वानुमते गावाचे नाव ' रामपूर ' असे सज्जनांची वस्ती असल्यासारखे ठेवावयाचे ठरले. खुद्द कवींनीच त्या अजब मोहिमेत पुढाकार घेतला होता. म्हणून त्यांनीच मुंबईला जाऊन मंत्रालयात खटपट करावी असं ठरलं. पण त्यासाठी खुद्द कविराजांकडे नेहमी प्रमाणे पैसे नसल्याने गावाने वर्गणी काढून दोनशे रुपये जमा केले आणि मोठ्या समारंभपूर्वक निरोप देऊन त्यांना मुंबईला पाठविले.

कविराज मुंबईला गेले, पण सोबत आण… पैसे त्यांच्याच खाण्या-पिण्याला पुरण्यासारखे न… तीन दिवस जिवाची मुंबई करून त्यांनी गाव… ऱ्यांचा सहीचा अर्ज आपल्या भागातील आमदार… दिला. आणि ते विजयी मुद्रेने परतले. कामा… गावकऱ्यांनी चोकशी केली असता कविराज आ… विश्वासाने म्हणाले, " अहो काय विचारता, … झालं नाही पण नाव बदलून देईन " असे म्ह… आहे त्यांनी.

याच कामासाठी दोन वेळा गावाने कवींना … जमवून मुंबईला पाठवलं पण कामचलाऊंनी प्र… वेळी गावाचं मूळ नावच सार्थ केल्याने आता … नाव बदललेच पाहिजे कां असा नवाच प्रश्न गाव… ऱ्यांना पडला. कविराज केवळ काव्यावरच … असल्याने त्यांना अनेकदा गावकऱ्यांच्या औदार्य… विसंबून रहावे लागे. ते गावात परिचित असल्या… कुणाच्या घरी लग्नकार्य किंवा बारात्रं असल… मात्र कविराज त्या शुभअशुभ कार्याप्रित्यर्थ ए… कविता किंवा मंगलाष्टक करीत व मिळवि… रक्कम त्या पोटी फिटली असा प्रेमळ संदेशही … पैसे उसने मागण्याचे गावातील सारे झरे … आले होते. आता इथंपासून आपले कसे हो… असा प्रश्न कविराजांना पडला.

अशा बिकट अवस्थेत अचानक ' दैनिक भा… च्या पहिल्या पानावर [ फ्रंट पेज ] आनंदाचा … देणारी बातमी प्रसिद्ध झाली.

" भामटे गावचे सुपुत्र कविवर्य काम… उर्फ द. का. पोटभरु यांना एक हजार आणि… रूपयांचे ज्ञानपीठ पारितोषिक "मिळाले असे … होतं. त्यामुळे भामटे गावचे नाव चतुर्खंडात … पारितोषिक मिळविल्याबद्दल कविवर्य का…

यांचा जाहीर सत्कार गावचे नगराध्यक्ष स. दा. खादाडे यांच्या अध्यक्षतेखाली सायंकाळी ठीक सहा वाजता पूज्य साने गुरुजी चौकात होणार आहे " एवढा मोठा मान गावाला प्रथमच मिळाला होता त्यानिमित्त न. पा. ने कविराजांना पाचशे एक रुपयाचे पारितोषिक जाहीर केले. मग ती वार्ता वाऱ्यासारखी पसरली शंभर, दोनशे, तिनशे अशी विविध रोख पारितोषिके निरनिराळ्या संस्था आणि श्रीमंत मंडळी यांनी जाहीर केली. त्यादिवशी संध्याकाळी महाकवी कामचलाऊ यांना एकंदर १११ रुपयांची थैली त्यांना अर्पण करण्यात आली. अनेक वक्त्यांनी त्यांची स्तुती केली, " कविराज लवकरच नोबेल पारितोषिक मिळवून भामटे गावाचे नाव जगभर उज्ज्वल करतील !" असा आत्मविश्वास भाषणातून व्यक्त करण्यात आला. उत्तरादाखल भाषण करतांना महाकवि कामचलाऊ नम्रपणे म्हणाले. " या सन्मानाला मी पात्र नाही हे मला माहित आहे. पण आपल्या प्रेमाचे प्रतिक म्हणून मी या थैलीचा स्विकार करतो ! " त्यांच्या नम्रतेची साधे आणि सरळ पणाची छाप सर्वांच्यावर पडली.

तीन आठवड्यांनी दिल्लीला ज्ञानपीठ पारितोषिकांचे वितरण होणार होते. पण खान्देशातही आपले सत्कार समारंभ आहेत आणि तेथील चाहत्यांचे मन मोडवत नाही म्हणून कविराज भामटे गावातील सत्काराच्या दुसऱ्याच दिवशी पहिल्या वर्गाने खान्देशात आले. त्यांना निरोप देण्यासाठी नगराध्यक्ष, जि प. अध्यक्ष वगैरे प्रतिष्ठित मंडळी स्टेशनवर उपस्थित होती. तेथून कविराज परभारे दिल्लीस जाणार होते.

पारितोषिक वितरणाचा दिवस जवळ येत चालला तरी बाहेरील वृत्तपत्रांमधून या बातमीबद्दल संपूर्ण गुप्तता का पाळली जात आहे हे आम्हास कळेना. सकाळ-संध्याकाळच्या पुणे-मुंबई आकाशवाणीवरील बातम्यांना कान देऊन ऐकू लागलो. तरी सुद्धा तेथे या विषयावर सामसूम. पारितोषिक वितरणाचा दिवसही उलटून गेला तरी कुठे काही अक्षर ऐकू येईना. आमचा निरोप घेऊन गेलेल्या कविकडून तर एकबोटभरही चिठ्ठी नाही.

पारितोषिक घ्यायला कवी महाशय जाऊन साडे तीन आठवडे झाले. तरी देखील ते किंवा पारितोषिक आलं नाही. तत्पूर्वी सर्व गावकऱ्यांनी ज्ञानपीठ पारितोषिक समितीच्या कचेरीकडे पत्रे लिहिली त्यांची उत्तरे आलीत ती अशा प्रकारे

" या वर्षीच्या ज्ञानपीठ पारितोषिकाच्या परिक्षकांची अजून पर्यंत बैठकही झालेली नाही. निर्णय लागायला किमान काही महिने लागतील. आपण उल्लेखलेल्या कवींना कुठलेही पारितोषिक वगैरे काही मिळालेलं नाही ! "

ती पत्रे वाचून आम्ही थक्कच झालो. सत्कार समारंभाच्या वेळी महाकवी, पण आता कसलं ' महा ' म्हणाव ? नुसतेच कवी कामचलाऊ म्हणाले होते, " या सन्मानाला मी लायक नाही " हे त्यांचे भाषण नम्रतेचे प्रतिक नसून सत्याला ते किती जवळचे होते हे स्पष्ट होते.

अखेर एके दिवशी कविराजांचं आगमन झालं. ते ही एकटे नव्हे तर सपत्निक ! तिला घेऊनच ते दैनिक भामटेच्या कार्यालयात गेले. संपादकांनी विचारलं, " काय कविराज आज आगळं वेगळं मॅटर आणलं वाटतं. ? "

" ऑफ कोर्स ! " हसत कविराज उत्तरले. पण महाशय [ संपादक ] हे मॅटर थोडबाशा

जागेत बसणार नाही. बरं कां ! आणि दिल्लीला जाण्यापूर्वी मी एक डुप्लीकेट तार दाखवून फसवलं. याबद्दल क्षमा करा. गावाचं नाव बदलायला मी दिल्लीला गेलो तेव्हा हिच्या प्रेमात पडलो. हिचं नाव प्रतिमा प्रतिष्ठानकर उत्कृष्ठ कवयित्री आहेत. लग्न ठरलं पण त्यासाठी जवळ पैसे नव्हते, म्हणून तिला म्हटलं मी गावी गेल्यावर टेलिग्राम कर की, " कविवर्य कामचलाऊ यांना एक हजार आणि एक रुपयाचे पारितोषिक मिळालं म्हणून ! " असा चमत्कार दाखविल्या शिवाय आज-काल कोण पैसा देतो ?

" लग्नाबद्दल अभिनंदन! फोटो छापूया दोघांचा उद्याच्या अंकात " संपादक उत्तरले.

" त्याहीपेक्षा आनंदाची बातमी म्हणजे आमच्या सौ. बँकेत रखडतात ( पेन बरं का ! ) दिल्लीहून तिची भामटे गावाला बदली करायचा अर्जदेखील दिला आहे. ही नोकरी करणार आणि मी कविता लिहिणार ".

त्यावर त्यांच्या 'ह्या' लाडानें म्हणाल्या, " फार चांगल्या कविता करतात, हो हे केव्हा ना केव्हा ह्यांना ज्ञानपीठ पारितोषिक मिळाल्याशिवाय राहणार नाही. "

त्यावर संपादक नम्रपणे म्हणाले, " नको नको बाई, तुमच्या ह्यांना एकदा ज्ञानपीठ पारितोषिक मिळाले, तेरढं पुरं झालं. त्यासाठी पुन्हा फंड गोळा करायची आमची ताकद नाही "

कामचलाऊ नेहमी सारखच रंगात येऊन म्हणाले " पारितोषिकाचे राहू दे. पण आमच्या शुभविवाहा-साठी तरी गावातर्फे थैली अर्पण करा की नाही ? "

कलेक्शन मात्र करावचं लागलं गावकऱ्यांनी ५०१ रू. ची थैली नूतन वधूवरांना जाहीरपणे दिली. थैली देतांना अध्यक्ष म्हणाले, " गावाचं नाव बदलायला आम्ही कविराजांना पाठवलं, तर त्यांनी एका मुलीचचं नाव बदललं आणि यापुढे त्यांना कोणतेही पारितोषिक मिळू नये एवढीच सगळ्यांच्या वतीने मी सदिच्छा व्यक्त करतो ! "

• • •

## नववर्षदिन

कु. माधुरी नाईक
एस. वाय बीएस्सी.

दिन आला हा भाग्याचा
एक नवीन वर्षाचा
मन नाचे थुई थुई माझे
वर्ष हे युवकांचे आहे
नवीन आशा नवीन प्रेरणा
आहे कार्य हाती आपणा
दाखवून देऊ सर्व जगाला
लाज चाडं आहे आम्हाला
म्हणूनच पुढे कार्य घडीता
वाहवा वाहवा सर्व करीता
आनंद होईल खूप मनाला
लागू आपण आताच कार्याला

*

# स्त्री आणि सौंदर्य

संजय भिमराव पाटील
एफ. वाय. बी. ए.

आजच्या आधुनिक युगामध्ये आपल्याला बरा-चश्या चित्रविचीत्र अशा घटना ऐकावयास मिळतात व कळत नकळत आपण म्हणतो ऐकावे ते नवलच. अशीच एक विचित्र घटना ऐकावयास मिळाली व ती म्हणजे अमेरिकेसारख्या पाश्चात देशात नग्न क्लब निघाल्याची त्यामुळे या देशामध्ये या बिकनी वरील स्त्रियाकडे पाहून त्या देशातील पुरुषांना काहीच विशेष वाटत नसेल यात शंका नाही. व कांही काळानंतर अगदी नखशिखांत नग्न स्त्रियांकडे सुद्धा कोणीही विशेष पहाणार नाही.

परंतु ही नग्नता दिवसें दिवस वाढत का चालली आहे ? तर म्हणे सौंदर्य दाखविण्यासाठी काय खरोखरच जास्तीत जास्त शरीर प्रदर्शनामुळे सौंदर्य खुलून दिसते ? माझ्या मते तरी प्रत्येक गोष्टीला काही विशिष्ट मर्यादा असाव्या लागतात. मात्र मर्यादेच्या पलीकडे गेले तर अती तिथं माती असे होते व असे झाल्यास सौंदर्यही उरणार नाही.

कोणी अशी शंका घेईल की ही घटना परदेशात घडली आहे. त्याबद्दल आपल्याला काय ? पण आपला त्याच्याशी अप्रत्यक्ष संबंध आहे. कारण आपल्याला अनुकरण करण्याची थोडीफार सवय आहे. आपल्या देशातसुद्धा नग्नतेचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. आजकाल आपल्या देशात काढल्या जाणाऱ्या चित्रपटामध्ये कमीत कमी कपड्यांवर केवळ व्याव-सायीक दृष्टीकोण ठेवून नग्नता ही दाखविली जाते. या कमीत कमी कपड्यांवरही आता मातकरून अनेक चित्रपटामध्ये संपूर्ण नग्न दृश्य दाखविली जातात व या चित्रपटातील दृश्यांचा पेहरावाचा परिणाम तरुण मुला-मुलींवर दिसून येतो. व अशी एक भितीची शंका मनाला चाटून जाते की, आपल्या देशातसुद्धा असा नग्न क्लब निघेल काय ?

आपला भारत देश हा संस्कृतीप्रिय असा पवित्र देश मानला जातो. परंतू हळूहळू ही संस्कृती लोप पावतांना आपल्याला दिसत आहे. प्रथम आपल्या भारतामध्ये घुंगटामध्ये चेहरा ठेवण्याची प्रथा होती ती गेली. नंतर आली डोक्यावरून पदर घेण्याची प्रथा. मग तो पदर डोक्यावरून घसरून खांद्यावर आला. या घटना बद्दल नविन नविन खूप विशेष वाटत

होते. परंतु नंतर खांद्यावर पदर घेतलेली स्त्री पाहून विशेष वाटेनासे झाले. म्हणून त्याच्यावर मात म्हणून मोठ्या गळ्याचे ब्लाऊज, बिनवा ह्याचे ब्लाऊज व बेंबीच्या खाली सरकणाऱ्या साड्या इत्यादी अनेक प्रकारचे पारदर्शक जास्त अंग प्रदर्शन करणारे कपडे निघत गेले. या सर्व कपडे घालण्याचा मुख्य उद्देश अंगप्रदर्शन करुन सौंदर्य वाढविणे परंतु यामुळे सौंदर्या बरोबर अश्लीलता येते. पहाणाऱ्यांचा दृष्टीकोण बदलतो. कोणी म्हणेल कीं त्यामुळे आकर्षण वाढते. परंतु तेही काही काळापूरचे. काही काळ नंतर अशा कपड्यात पुढे पाहून काहीच विशेष वाटणार नाही. मग आपण हे सौंदर्य दाखविण्यासाठी अजून किती अंग प्रदर्शन करणार ?

आजकाल बरेचसे बलात्काराचे प्रमाण वाढत आहे. माझ्या मते याला काही वेळेस बऱ्याच प्रमाणात स्त्रियांसुद्धा जबाबदार असू शकतात. कारण त्यांचे ते अंगप्रदर्शन करणारे कपडे, चेहऱ्यावरील हावभाव. बलात्कारासाठी स्त्री हीच जबाबदार आहे असेही माझे म्हणणे नाही. तर काही विकृत पुरूष सुद्धा समाजात आहेत. व काही सामाजिक दोषसुद्धा यासाठी कारणीभूत आहेत.

आज आपल्या देशात फारच कमी स्त्रिया आदर्श विचारी दिसतात. माझे असे मुळीच म्हणणे नाही की, स्त्रिने सौंदर्य दाखवू नये. परंतु माझे एवढेच सांगणे की सौंदर्याला अश्लीलतेचे स्वरूप आणून त्याचा विनाश करू नये. आज आपल्या देशात हा स्त्रियांच्या व्यक्तीगत विकासासाठी सतत झटत आहे व त्यासाठी त्यांनी काही पुरूषां समान हक्काच्या प्रमाणात थोडे झुकतेच माप देत आहे. परंतू काही स्त्रिया ह्या स्वातंत्र्याचा फायदा घेऊन आपले कर्तृत्व न दाखविता स्वातंत्र्याच्या गैरउपयोग केल्यामुळे स्वातंत्र्य असूनही स्वतंत्र नाहीत.व स्वातंत्र्य दया, समानहक्क दया या प्रकारचे ढोल पिटण्यातच आपला वेळ घालवित आहे.

आपल्या भारतदेशाचे पंतप्रधान ही एक स्त्री होत्या. एवढा पुरावा या स्त्रियांना स्वातंत्र्य व समान हक्क आहे हे सांगणेस पुरे नव्हे काय ? परंतु कर्तृत्व हीन स्त्रियांना त्याचे काय ! नाचता येईना अंगण वाकडे.

• • •

# देवा मला दे !

राजेंद्र चौधरी
एफ. वाय. बी.कॉम

देवा मला दे
अशी बुद्धी
जिच्यायोगे होईल माझ्या जीवनाची सु...

देवा मला दे
असे वि...
ज्याच्या प्रभावामुळे मी होणार नाही ला...

देवा मला दे
असा अ...
ज्याच्यामुळे दूर होईल माझा अहं...

देवा मला दे
असे ...
जे माझ्या निर्जीव बांधवास ठरेल ...

देवा मला दे
अस ...
ज्या मुळे माझ्या वंशाच, माझ्या
राहील ...
निरंतर ...

*

---

# अशी झाली वधूपरीक्षा

कु. सुजाता शा. पेटारे
टी. वाय. बी. कॉम

---

पक्षांच्या मंजूळ चिवचिवाटा ऐवजी नेहमी प्रमाणे बादल्यांच्या ठणठणाटाने जाग आली. जरा बाहेर डोकावून बघितले तर दिगुनानांचे नेहमीचे सूर्य नमस्कार चालले होते. बर्वेअण्णा झाडांना पाणी घालत होते. अहो! झाड म्हणजे आमच्या चाळीच्या पुढे दोऱ्या बांधून लावलेल्या कुंड्यातील रोप बरका नाही तर तुमच्या डोळापुढे मोठी बाग येणार ! हे सर्व नेहमीचेच दृष्य, अहो! पण हे काय?मी झोपेत तर नाही ना? आधी समोर पूर्वेकडे पाहिले. सूर्य उगवला आहे ना एवढा उजेड माझ्या समोर होता, तरी आमच्या चाळीतले एकमेव बिऱ्हाड सूर्यवंशी, आडनावाने नाही. बरका ? तर उठण्याचे बाबत. आज सकाळी सहावाजताच उठलेले होते. बरं फक्त दादासाहेब जोशीच नाही तर त्यांचे कुटुंब, पोरे, मोठी मुलगी अॅनी, पण हिचं खर नाव अनिता, ही सर्व मंडळी पण उठलेली होती.

काय गडबड असावी गडे! हाच विचार मनाशी करत होते. पण म्हटलं कशाला विचारून वाकडे करून घ्या. ती चाळ आहे, नाही विचारले तरी ऐकू येणार व कारण समजणारच. कारण माझे बिऱ्हाड जरी दोन घरं पलीकडे होते जोशांच्या, तरी दादासाहेब जोशांचे कुटुंब सावित्रीबाई यांचा आवाज अगदी मोठा, मोठा म्हणजे अगदी आगीच्या बंबाचे इथे घंटेऐवजी यांना उभे करा. हा विचार करुन परत आत येवून पलंगावर लोळले. बस अगदी कॉमेंन्ट्री ऐकत असल्यासारखे सर्व संवाद ऐकू येवू लागले. फक्त दृष्य डोळ्यापुढे आणावे लागत होते. बंड्या! ते पोस्टाच्या पेटीसारखे तोंड आधी बंद कर, व नारू शेट वाण्याकडून आधी सामान घेवून ये. आणि त्याला सांग रवा चांगला दे उठ पटकन सावित्रीबाईचा आवाज कडाडला.बंड्या पळतच वाण्याच्या दुकानात गेला असणार हे सवयीने मी ओळखले. मला आवाज फक्त सावित्रीबाईचाच ऐकू येत होता. आहाहा.... काय ही बैठक आहे एक उशी अन लोड गळयात गळा घालून पडलेले. पलंगावरची गादी ही पलंग व जमीन यांच्याशी मध्यस्ती करत आहे. अन् धन्य! अहो! ही काय दाढी करायची वेळ आहे का ? तुम्हाला कोणी नाही बघणार. उठा आधी, बैठक आवरा ती, माझं मेलं स्वयंपाक घरातच चालणार. कुंदा, जा त्या बर्वेकाकूंकडून कपबशा घेवून ये, मला जरा अंदाज आला. बहुतेक अॅनी करता बघण्याचा कार्यक्रम असणार, " आजा.... आई बहार.... दिल है बेकरार.... रेडिओने तान मारली हे काम बहुतेक अॅनीच अस-

णार, अग बाई अग ही रेडिओ लावायची का वेळ आहे. अन् तुझं तर काहीच आवरल नाही अजून १० च्या ठोक्याला ते लोक येणार आहेत. अन् बघ अनिता हे बेलबॉटम पॅंट वगैरे चालणार नाही. बघ ती माझी जरीची साडी आहे न लाल रंगाची ती नेस. हार घाल तो माझा गळयात. ते दामल्या-कडचे लोक जरा जुन्या मताचे आहेत. हे बघ मम्मी ते लोक जुन्या मताचे आहेत म्हणून मी काही नऊवार साडी, आंबाडा त्यावर मोठा गजरा लावून डोक्यावर पदर घेऊन उभी राहणार नाही. अन तो सुरेश तर किती मॉडर्न रहातो. अग.... अग.... अनिता मुलाला असे नावाने नसते हाक मारायचे. जा पटकन तयार हो. आता सावित्रीबाईंचा मोर्चा बहुतेक स्वयंपाक घरात असणार कारण त्यांच्या बोलण्याचा आवाज बंद होता व भांड्यांचा आवाज येत होता. लगेच बंड्या खालूनच ओरडत आला, " आई हे लोक आलेत " लगेच सावित्रीबाईंचा गोंधळ सुरू झाला. बंड्या वेड्या, वर काय आलास जा त्यांना घर दाखव. अहो जाता ना त्यांच्या स्वाग-ताला, अग पण माझी.... मध्येच दादासाहेबांनी बोलण्याचा प्रयत्न केला. अहो जा पटकन मग बोला माझ्याशी काय ते अहो थांबा, टोपी घाला असे काय चाललात तुम्ही, मी तेच म्हणत होतो. कुठे आहे टोपी माझी ? ही घ्या टोपी जा पटकन. थोड्याच वेळात खुर्च्यांचा आवाज झाला, त्यावरुन लोक आल्याचे समजले. आता मात्र दादासाहेबांचा आवाज येवू लागला. अहो ! जरा मुलीला पाठवा. पाहुणे खोळंबलेत बाहेर, 'अनिता बाहेर आलेली असावी कारण दादासाहेब ओळख करुन देत होते. हे बघ अनिता हे सुरेशचे वडिल. दे यांना पोहे, हचा सुरेशच्या आई, हे सुरेशचे मित्र, आणि हे सुरेश हे शब्द संपताच दणकन बशी फुटण्याचा आवाज आला. थोड्या वेळात दामले मंडळी निघून गेली व आता फक्त सावित्रीबाई व भांडी यांचाच आवाज येत होता. यावरुन घरात काय चालले असेल याचा अंदाज तुम्हाला पण आला असणारच !

• • •

## "अशीच एक सायंकाळ"

कु. तिलोत्तमा रा[...]
एम्. कॉम. ( सीनियर )

एके दिनी सायंकाळी
अशीच सजली एक सजनी

रुप तिचे आगळे
मजला पडले साकडे

नंतर गुंतली नजरेत
जीव अडकला ललनेत

भाळली ती मजवरती
हरवून ध्यान बसली

भाग्य नव्हते परी माझे
नशिबाने साथ न दिली

झालीस तू अर्धांगिनी
सोडून मजला गेली

विसरलीस मजला तू
रंगून आपल्या संसारी

जिवात आहे प्राण जोवरी
मूर्ती तुझीच गे हृदयी !

*

# नाटककार गडकरी

चंदा जोशी
टी. वाय. बी. ए.

नाटक हे रंगभूमीवर घडण्याआधी नटाच्या मनात घडत असते. नाटकातिल ती संकल्पित दृश्ये लेखकाला नाटक लिहितांनाच डोळ्यासमोर दिसत असतात. त्यातील संवाद-स्वगते त्याला ऐकायला येत असतात. आणि त्यामुळे लेखकच त्याच्या नाटकाचा पहिला प्रेक्षक असतो. पण हे सगळे असले तरी प्रेक्षकांचा विचार करूनच लेखक नाटक लिहित असतो. ह्याची खत नाही कारण.... गडकऱ्यांचे प्रेक्षक मग्न असतात त्यांचे त्यांचे पल्लेदार संवाद ऐकण्यात कोटीबाज भाषा समजावून घेण्यात.

त्याकाळात व त्यापूर्वी जे नाटककार होते त्यांच्यापेक्षा वेगळेच असे नाट्यलेखन गडकऱ्यांनी केलेले आहे. त्यांची अचाट कल्पना शक्ती, विलक्षण विनोद बुद्धी, सुंदरशा कोट्या यातूनच त्यांचे वेगळेपण सिद्ध होते. म्हणूनं तर भाषाप्रभू असे गडकऱ्यांचे वर्णन सार्थच ठरते. आणि गडकऱ्यांची प्रेक्षकांत इतकी नाट्य वाचकांवरही जबर छाप पडली.

अशा या जन्मजात प्रतिभा असणाऱ्या गडकऱ्यांचे व्यक्तीचित्र जेव्हा " बहुरूपी " त कोल्हटकर चितारतात, तेव्हा कळतं की चिंतामण-रावांच्या भावकोशात गडकऱ्यांना अग्रस्थान होते.

गडकरी बोलतही अफाट. नाटक हे माध्यम गडकऱ्यांना सापडल्याने तो अफाटपणा धबधब्या प्रमाणे अविरत कोसळत राहिला. त्यांची नाटके त्यांच्या प्रतिभेच्या अफाटपणाची पुरेपूर साक्ष देतात. " प्रेमसंन्यास " पासून " भावबंधन " वा " राजसंन्यास " पर्यंत गडकरी, गडकऱ्यांची भाषा, गडकऱ्यांची प्रतिमा, प्रत्येक पात्राच्या माध्यमातून ठायी - ठायी सारखा आपला मोरपिसाराच फुलवित राहते व मोराप्रमाणे नृत्य करीत राहाते.

गडकऱ्यांचे लांबलचक संवाद कोणा बोजड वाटतात. पण यावर कोल्हटकर म्हणतात की, " हल्ली हलकी-फुलकी वस्त्रे नेसतात पण म्हणून काही घरातल्या पैठण्या महावस्त्रे यांची किंमत कमी होणार आहे का ? तुम्हाला ही वस्त्रे

परवडत नसतील तर नेसू नका पण ती जतन करून ठेवा. कारण ती मराठी भाषेची महावस्त्र आहेत"

गडकऱ्यांच्या नाटकातील कोटीक्रम कळायला नटाची नि, गडकऱ्यांची नाटके पाहाणाऱ्यांची बुद्धीमत्ता तल्लख आणि जागृत असणे आवश्यक आहे. त्यांची भाषा अलंकारिक असली तरी संस्कृत प्रचुर नाही. त्यामुळे तिच्यात नादमाधुर्य आणि ललित्य आहे. गडकऱ्यांची प्रतिभा, काव्यमय, भावनाविष्कार, मोहक, कल्पनाचित्रे प्रेक्षकाला अक्षरशः दिपवून सोडतात. भावनिक प्रसंग हळूवारपणे गडकरी रंगवितात. संस्कृती समृद्ध करणारी मानवी मूल्ये आपल्या नाटकांतून मांडून गडकऱ्यांनी मानवी जीवनाचा गाभा बळकट केला. उदा. " धुंडिराज " हे पात्र तर महामानवाची आदर्श मूर्ती म्हणावे लागेल.

गडकऱ्यांवर तसा थोडाफार श्री. कृ. कोल्हटकरांच्या भाषेचा प्रभाव असेल पण गडकरी स्वतःच भाषेची जन्मजात देणगी घेऊन आले होते त्यांची स्वतःचीच नाटका संबंधीची धारणा होती.

गडकरी काव्य, नाट्य, आणि विनोद ह्या तिनही क्षेत्रात सारख्याच वैभवाने तेजाने तळपले. त्यापकी केवळ एखाद्याच क्षेत्रात ते वावरले असते. तरीही त्यांना तेवढेच " यश " मिळाले असते. पण साहित्यातल्या अत्यंत अवघड समजल्या जाणाऱ्या या तिनही क्षेत्रात एकाचवेळी त्यांनी असामान्य प्रभुत्व मिळवले. म्हणूच त्यांच्या व्यक्तीमत्वाभोवती अद्भुततेचे विलक्षण वलय निर्माण झाले. त्यांच्या काव्याने नाट्याने आणि विनोदाने महाराष्ट्राला अक्षरशः वेड लावले. त्यातल्या त्यात त्यांच्या नाटकाने मराठी मन उत्कृष्ट प्रतिभेच्या आस्वादात न्हाऊन निघाले. गडकऱ्यांच्या लेखनात लालित्य होत, कलात्मकता होती, म्हणून मराठी भाषेला ते सौंद[illegible] देऊ शकले.

त्यांना काव्यापेक्षाही नाटकाचं आकर्षण हो[illegible] तशीच नाटकाची जाणही होती नाटक " यशस्वी [illegible] व परिणामकारक कसे करावे हे त्यांना कळले हो[illegible] हंशा कसा निर्माण करावयाचा, नि प्रेक्षकांच्[illegible] काळजाला कसा हात घालावयाचा, व त्यांच्[illegible] चित्तवृत्ती कशा भारुन टाकायच्या हे शास्[illegible] त्या[illegible] आवगत होते.

प्रेमसंन्यास ह्या नाटकात विधवा विवाहाच्[illegible] जोडीला बाल विवाह, विषमविवाह, प्रेमविवाह हे ह[illegible] प्रश्न गडकऱ्यांनी हाताळलेले आहेत. सुशिला ति[illegible] बालपतीराजांच्या आठवणीत निमग्न आहे तर वि[illegible] तिच्या पातिव्रत्याची परीक्षा घेत असतो. [illegible] लिला जयंतसाठी झुरत असते. तर जयंत [illegible] च्या भितीने लीलेला प्रेमभावनेपासून परा[illegible] करीत असतो.

पहिल्या अंकातील तिसऱ्या प्रवेशातील ज[illegible] स्वगत अतिशय भावपूर्ण आहे. तर गोकु[illegible] विसराळू पणाच्या आधारे अतिशय चांगला वि[illegible] गडकरी साधतात. कमलाकर हा सापाच्या जा[illegible] खलपुरुष आहे. पहिल्या अंकाच्या चवथ्या प्रवे[illegible] तो मनोरमेला जयंत विरुद्ध चिथवतो. आणि म[illegible] रमेला बाहेर काढून तिच्यावर बलात्कार कर[illegible] मूर्ख प्रयत्न करतो.

प्रेमसंन्याच्या लोकप्रियतेचे कारण त्या[illegible] निर्भेळ विनोद गोकुळ हा वेगळाच विनो[illegible] नमुना आहे. बायकोला घाबरणारा नवरा [illegible] शेवटी तिलाच वठणीवर आणतो तेव्हा आपो[illegible] विनोद निर्माण होतो हे विनोदाचे रहस्य गडक[illegible] उत्तम ओळखले होते

बालविधवांचा प्रश्न अतिशय चांगल्या रितीने गडकरी ह्या नाटकात मांडतात, " ताई प्रकाश काय असतो असे ज्या प्रमाणे आंधळा मुलगा विचारतो, त्याप्रमाणे सुख काय असते सुद्धा बालविधवेला दुसऱ्याच्या सांगीवरुन समजते " हे लिलेचे उद्‌गार प्रेक्षकांचे काळीज कापीत जातात पण विधवा द्रुमन जेव्हा भ्रूणहत्या करते तेव्हा सनातनी बाबासाहेबांचे डोळे खाडकन उघडतात बालविवाहाच्या पुर्नविवाहाला प्रतिबंध करणाऱ्या प्रतिगामी धर्माला उद्देशून ते म्हणतात " धिक्कार असो अशा या धर्माला अशा समाजाला नि रूढीला. भूतदया हाच साऱ्या धर्माचा धर्म. भूतदयेला थारा देत नाही, पतितांचे समाधान करीत नाही दुःखीतांचे दुःख जाणीत नाही, तो धर्म कशाचा ? " सनातनी समाजाच्या पश्चातापाचे नि जागृतिचे हे एक प्रातिनिधिक चित्रच नाही काय ? गडकऱ्यांच्या नाटकात स्त्रीच्या पावित्र्याची, नि मांगल्याची विटंबना होईल असे एक अक्षरही सापडणार नाही आणि म्हणूनच सर्वसामान्य मानसालाही गडकऱ्यांचे आकर्षण वाटते.

गडकऱ्यांना " प्रेमसंन्यास " नाटकानेच 'पुण्यप्रभावचा' मार्ग दाखविला असावा. कारण तेच आपल्या 'पुण्यप्रभाव' नाटकात 'ईश्वर' ह्या पात्राच्या माध्यमातून सांगतात की " माझ्या 'प्रेमसंन्यासाने' मला हा पुण्यप्रभावाचा मार्ग अचूक दाखवला नसता तर अजूनही मन त्या वेड्यांच्या बाजारातच रमत राहिले असते.

कोल्हटकरांच्या 'प्रेमशोधन नाटकाचा 'पुण्यभाव' वर थोडा परिणाम आहे. कमालिच्या प्रभावी असलेल्या ह्या नाटकाने महाराष्ट्रात लोकप्रियतेचा उच्चांक गाठला होता. आणि ह्याचे मुख्य कारण 'ईश्वराचे' अस्तित्व आणि स्त्रियांचे पातिव्रत्य हे भारतीय संस्कृतिचे दोन प्राणबिंदु आहेत हे गडकऱ्यांनी ताडल होतं.

या नाटकात गडकऱ्यांचा प्रकट झालेला वाग्वैभवाचा दिमाख डोळे दिपवतो. शेवटच्या अंकातल्या अखेरच्या प्रवेशात तर गडकरी प्रेक्षकांना खूष करुन टाकतात. स्त्री जातीचे महात्म्य पटवितांना वसुंधरा म्हणते " वृन्दावन, स्त्रीजातीची किंमत इतकी कमी समजू नका. विश्वातल्या प्रेमाच्या, मांगल्याच्या, कोमलतेच्या, सौंदर्याच्या आणि पावित्र्याच्या सारभूत सर्वस्वाची स्त्री ही एकरूप विजय पताका आहे. स्त्रीने तेजाला कोमलतेची जोड दिलेली आहे, आणि स्त्रीनेच सत्यावर सौंदर्याचा साज चढविलेला आहे. स्त्रीयांसाठी पर्वत समुद्राच्या पाठीवर नाचलेले आहेत. साक्षात परमेश्वराने स्त्रियांसाठी स्त्रीरूप घेतले आहे. वृन्दावन, भक्तभगवंताच्या उच्चत्तम भावनांचा स्त्रीच्या ठायी प्रितीसंगम झालेला आहे एका व्दिदेहात पुरुष आणि परमेश्वर आपापल्या उत्कृष्ट गुणांच्या एकरुपाने वास करतात. पुरुष परमेश्वराची किर्ती आहे पण स्त्री परमेश्वराची मुर्ती आहे. " हे असे संवाद ऐकल्यावर भारतीय संस्कृतित वावरलेल्या समाजाच्या भावना उचंबळून येणं अगदि सहाजीक आहे. असेच भाषेच्या असामान्य सामर्थ्यावर गडकऱ्यांनी नाट्यसृष्टीत एकापेक्षाही एक विलक्षण चमत्कार करून दाखविले आणि मराठी नाटककारांमध्ये अभूतपूर्व स्थान मिळविले.

गडकऱ्यांची वैशिष्ट्यपूर्ण भाषा हे त्यांच्या सर्वच नाटकांचे सौंदर्य नि सामर्थ्य आहे. पण त्यांच्या सर्व नाटकांत " राजसंन्यास " मधली जोमदार मराठमोळ्या घाटाची आणि बोलघाटी थाटाची शाहीरी भाषा म्हणजे मराठी भाषेला एक भावभेरीचे अद्वैत लेणेच होय. राजसंन्यास मधील पात्रे त्यांचा स्वभाव परिपोष, त्यांची भाषा, " राजा हा जगाचा उपभोगशून्य स्वामी आहे. " ह्या तत्वज्ञानानुसार त्यांपैकी प्रत्येकिनें केलेला पराकाष्ठेचा आत्मयज्ञ, आणि नाटकातील प्रत्येक प्रवेशाची रचना ह्या सर्व गोष्टी अतिशय कलासुंदर अशा आहेत.

परवडत नसतील तर नेसू नका पण ती जतन करुन ठेवा. कारण ती मराठी भाषेची महावस्त्र आहेत"

गडकऱ्यांच्या नाटकातील कोटीक्रम कळायला नटाची नि, गडकऱ्यांची नाटके पाहाणाऱ्यांची बुद्धी-मत्ता तल्लख आणि जागृत असणे आवश्यक आहे. त्यांची भाषा अलंकारिक असली तरी संस्कृत प्रचुर नाही. त्यामुळे तिच्यात नादमाधुर्य आणि ललित्य आहे. गडकऱ्यांची प्रतिभा, काव्यमय, भावनाविष्कार, मोहक, कल्पनाचित्रे प्रेक्षकाला अक्षरशः दिपवून सोडतात. भावनिक प्रसंग हळूवारपणे गडकरी रंगवितात. संस्कृती समृद्ध करणारी मानवी मूल्ये आपल्या नाटकांतून मांडून गडकऱ्यांनी मानवी जीवनाचा गाभा बळकट केला. उदा. " धुंडिराज " हे पात्र तर महामानवाची आदर्श मूर्ती म्हणावे लागेल.

गडकऱ्यांवर तसा थोडाफार श्री. कृ. कोल्हट-करांच्या भाषेचा प्रभाव असेल पण गडकरी स्वतःच भाषेची जन्मजात देणगी घेऊन आले होते त्यांची स्वतःचीच नाटका संबंधीची धारणा होती.

गडकरी काव्य, नाट्य, आणि विनोद ह्या तिनही क्षेत्रात सारख्याच वैभवाने तेजाने तळपले. त्यापकी केवळ एखाद्याच क्षेत्रात ते वावरले असते. तरीही त्यांना तेवढेच " यश " मिळाले असते. पण साहित्यातल्या अत्यंत अवघड समजल्या जाणाऱ्या या तिनही क्षेत्रात एकाचवेळी त्यांनी असामान्य प्रभुत्व मिळवले. म्हणूच त्यांच्या व्यक्तीमत्वा-भोवती अदभुततेचे विलक्षण वलय निर्माण झाले. त्यांच्या काव्याने नाट्याने आणि विनोदाने महारा-ष्ट्राला अक्षरशः वेड लावले. त्यातल्या त्यात त्यांच्या नाटकाने मराठी मन उत्कृष्ट प्रतिभेच्या आस्वादात न्हाऊन निघाले. गडकऱ्यांच्या लेखनात लालित्य होत, कलात्मकता होती, म्हणून मराठी भाषेला ते सौंद[...] देऊ शकले.

त्यांना काव्यापेक्षाही नाटकाचं आकर्षण हो[...] तशीच नाटकाची जाणही होती नाटक " यशस्वी " व परिणामकारक कसे करावे हे त्यांना कळले हो[...] हंशा कसा निर्माण करावयाचा, नि प्रेक्षकाच्या काळजाला कसा हात घालावयाचा, व त्यांच्या चित्तवृत्ती कशा भारुन टाकायच्या हे शास्त्र त्यां[...] आवगत होते.

प्रेमसंन्यास ह्या नाटकात विधवा विवाहाच्या जोडीला बाल विवाह, विषमविवाह, प्रेमविवाह हे ही प्रश्न गडकऱ्यांनी हाताळलेले आहेत. सुशिला [...] बालपतीराजांच्या आठवणीत निमग्न आहे तर विद्या[...] तिच्या पातिव्रत्याची परीक्षा घेत असतो. [...] लिला जयंतसाठी झुरत असते. तर जयंत [...] च्या भितीने लीलेला प्रेमभावनेपासून पराङ्[...] करीत असतो.

पहिल्या अंकातील तिसऱ्या प्रवेशातील जयं[...] स्वगत अतिशय भावपूर्ण आहे. तर गोकु[...] विसराळू पणाच्या आधारे अतिशय चांगला वि[...] गडकरी साधतात. कमलाकर हा सापाच्या जाती[...] खलपुरुष आहे. पहिल्या अंकाच्या चवथ्या प्रवे[...] तो मनोरमेला जयंत विरुद्ध चिथवतो. आणि [...] रमेला बाहेर काढून तिच्यावर बलात्कार कर[...] मूर्ख प्रयत्न करतो.

प्रेमसंन्याच्या लोकप्रियतेचे कारण त्यां[...] निर्भेळ विनोद गोकुळ हा वेगळाच विनो[...] नमुना आहे. बायकोला घाबरणारा नवरा [...] शेवटी तिलाच वठणीवर आणतो तेव्हा आपो[...] विनोद निर्माण होतो हे विनोदाचे रहस्य गडक[...] उत्तम ओळखले होते

बालविधवांचा प्रश्न अतिशय चांगल्या रितीने गडकरी ह्या नाटकात मांडतात, " ताई प्रकाश काय असतो असे ज्या प्रमाणे आंधळा मुलगा विचारतो, त्याप्रमाणे सुख काय असते सुद्धा बालविधवेला दुसऱ्याच्या सांगीवरुन समजते " हे लिलेचे उद्गार प्रेक्षकांचे काळीज कापीत जातात पण विधवा द्रुमन जेव्हा भ्रूणहत्या करते तेव्हा सनातनी बाबासाहेबांचे डोळे खाडकन उघडतात बालविवाहाच्या पुर्नविवाहाला प्रतिबंध करणाऱ्या प्रतिगामी धर्माला उद्देशून ते म्हणतात " धिक्कार असो अशा या धर्माला अशा समाजाला नि रूढीला. भूतदया हाच साऱ्या धर्माचा धर्म. भूतदयेला थारा देत नाही, पतितांचे समाधान करीत नाही दुःखीतांचे दुःख जाणीत नाही, तो धर्म कशाचा ? " सनातनी समाजाच्या पश्चातापाचे नि जागृतिचे हे एक प्रातिनिधिक चित्रच नाही काय ? गडकऱ्यांच्या नाटकात स्त्रीच्या पावित्र्याची, नि मांगल्याची विटंबना होईल असे एक अक्षरही सापडणार नाही आणि म्हणूनच सर्वसामान्य मानसालाही गडकऱ्यांचे आकर्षण वाटते.

गडकऱ्यांना " प्रेमसंन्यास " नाटकानेच 'पुण्यप्रभावचा' मार्ग दाखविला असावा. कारण तेच आपल्या 'पुण्यप्रभाव' नाटकात 'ईश्वर' ह्या पात्राच्या माध्यमातून सांगतात की " माझ्या 'प्रेमसंन्यासाने' मला हा पुण्यप्रभावाचा मार्ग अचूक दाखवला नसता तर अजूनही मन त्या वेड्यांच्या बाजारातच रमत राहिले असते.

कोल्हटकरांच्या 'प्रेमशोधन नाटकाचा 'पुण्य-भाव' वर थोडा परिणाम आहे. कमालिच्या प्रभावी असलेल्या ह्या नाटकाने महाराष्ट्रात लोकप्रियतेचा उच्चांक गाठला होता. आणि ह्याचे मुख्य कारण 'ईश्वराचे' अस्तित्व आणि स्त्रियांचे पातिव्रत्य हे भारतीय संस्कृतिचे दोन प्राणबिंदु आहेत हे गडकऱ्यांनी ताडलं होतं.

या नाटकात गडकऱ्यांचा प्रकट झालेला वाग्वैभवाचा दिमाख डोळे दिपवतो. शेवटच्या अंकातच्या अखेरच्या प्रवेशात तर गडकरी प्रेक्षकांना खूष करुन टाकतात. स्त्री जातीचे महात्म्य पटवितांना वसुंधरा म्हणते " वृन्दावन, स्त्रीजातीची किंमत इतकी कमी समजू नका. विश्वातल्या प्रेमाच्या, मांगल्याच्या, कोमलतेच्या, सौंदर्याचा आणि पावि-त्र्याच्या सारभूत सर्वस्वाची स्त्री ही एकरूप विजय पताका आहे. स्त्रीने तेजाला कोमलतेची जोड दिलेली आहे, आणि स्त्रीनेच सत्यावर सौंदर्याचा साज चढविलेला आहे. स्त्रीयांसाठी पर्वत समुद्राच्या पाठीवर नाचलेले आहेत. साक्षात परमेश्वराने स्त्रियांसाठी स्त्रीरूप घेतले आहे. वृन्दावन, भक्त-भगवंताच्या उच्चत्तम भावनांचा स्त्रीच्या ठायी प्रीतीसंगम झालेला आहे एका खिदेहात पुरुष आणि परमेश्वर आपापल्या उत्कृष्ट गुणांच्या एकरुपाने वास करतात. पुरुष परमेश्वराची किर्ती आहे पण स्त्री परमेश्वराची मुर्ती आहे. " हे असे संवाद ऐकल्यावर भारतीय संस्कृतित वावरलेल्या समाजाच्या भावना उचंबळून येणं अगदि सहाजीक आहे. असेच भाषेच्या असामान्य सामर्थ्यावर गडकऱ्यांनी नाट्यसृष्टीत एकापेक्षाही एक विलक्षण चमत्कार करुन दाखविले आणि मराठी नाटककारांमध्ये अभूतपूर्व स्थान मिळविले.

गडकऱ्यांची वैशिष्ट्यपूर्ण भाषा हे त्यांच्या सर्वच नाटकांचे सौंदर्य नि सामर्थ्य आहे. पण त्यांच्या सर्व नाटकांत " राजसंन्यास " मधली जोमदार मराठमोळ्या घाटाची आणि बोलघाटी थाटाची शाहीरी भाषा म्हणजे मराठी भाषेला एक भावभे-रीचे अद्वेत लेणेच होय. राजसंन्यास मधील पात्रे त्यांचा स्वभाव परिपोष, त्यांची भाषा, " राजा हा जगाचा उपभोगशून्य स्वामी आहे. " ह्या तत्वज्ञा-नानुसार त्यांपैकी प्रत्येकिनें केलेला पराकाष्ठेचा आत्मयज्ञ, आणि नाटकातील प्रत्येक प्रवेशाची रचना ह्या सर्व गोष्टी अतिशय कलासुंदर अशा आहेत.

पण ह्या सगळ्या नाटकापेक्षा वरचढ असणारे नेमाच्या भाषेच्या नि परिणामकारकतेच्या दृष्टीने वेगळेअसणारे " एकच प्याला " ह्या नाटकाने लोक–प्रियतेचा उच्चांक गाठला. आणि आपल्या अलौकिक सामर्थ्याने सिंधूला अजरामर करणारे बालगंधर्व त्यांचाही ह्या नाटकाच्या यशस्वितेला फार मोठा हातभार लागलेला आहे. मराठी भाषेच्या अत्यंत सुबोध, सोज्वळ, आणि सात्विक स्वरुपाचे ह्या नाटकात सर्वत्र दर्शन होते. सुधाकर सारखा बुद्धी–मान, स्वाभिमानी माणूस दारूमुळे आपल्या संसाराचा कसा नाश करून घेतो ही भयानक गोष्ट अत्यंत प्रभावी भाषेतून नि रोमांचकारी घटनांमधून परि–णामकारक रितीने गडकऱ्यांनी सांगितलेली आहे. पातिव्रत्य हा विषय ह्या नाटकातही गडकरी मांड–तात, पण जरा निराळ्या रितीने. " पुण्यप्रभावात " पतिव्रतेस पुण्याईचे दर्शन होते तर " एकच प्यालात " पतिव्रतेला त्यागाचे दर्शन होते. अतिरेकी दारूबाजी आणि अतिरेकी पातिव्रत्य ह्यांच्या संघर्षातून " एकच प्याला " चे भिषण नाट्य निर्माण झालेले आहे सुधाकर व सिंधू ह्यांचे काळजाला हात घालणारे संवादही नाटकाला ' यश ' देतात.

गडकऱ्यांच्या इतर नाटकात विषयाला विनो–दाची झालर आहे पण " भावबंधन " ह्या नाटकात विनोदालाच करण्याची झालर आहे ' इंदू– बिंदू ' च्या माध्यमातून गडकरी ह्या पण विचार करता याला कासण्याची झालर आहे हे लक्षात येते. महेश्वर उर्फ कामण्णा हे पात्र ही विनोद निर्माण करण्या करीताच आहे. पण जास्तीचे काम नसल्यानें हे पात्र नाटकात खूप वेळा नुसते लोंबकळत राहते. (पैंश) धुंडिराज हे नाटकातील महत्वाचे पात्र आहे. बोलता बोलता दुसऱ्याच विषयावर नि दुसऱ्यातून तिसऱ्याच विषयावर घसरणे हा त्या पात्राचा स्थायीभाव आहे जणू घनश्याम त्याच्या बरोबर मालतिला मागणी घालायला येतो, तेव्हा धुंडिराज त्याला सांगतो " हां घनश्याम घाला मागणी. ही मालती आमची फुल परमिशन आहे हां, आमचा संकोच वाटेल नाही कां तुंम्हाला? आता जो कण्वासारखा इष्टिली म्हणून जातो, तो एकदम पाविणेचेवेळी ' आशी–र्वादाला ' हजर अण्णा किर्लोस्करांच्या शाकुंतलातली गंमत बरं का ही ! अण्णाला बघितले नसेल तुंम्ही जबर पुण्याईचा मनुष्य आणि हा एकेक दंड " अशा धुंडीराजच्या बोलण्यातील अनेक गंमती आहेत पण मालती धनेश्वराला देण्यासाठी जेंव्हा, घनश्याम धुंडीराजाकडून चोरीच्या कबुली जबाबाच्या काग–दाची धमकी दाखवतो तेव्हा धुंडिराजचा नाईलाज होतो. आणि येथून पुढे धुंडिराजचे भोळे भाबडे व शब्द वेल्हाळ व्यक्तीमत्व अमूलाग्र बदलून जाते मूर्तीमंत करूण रसंच जणू कांही त्याच्या रूपाने नाटकात वावरू लागतो. ह्या नाटकातील करूण रसाची दुसरी अधिष्ठात्री देवता म्हणजे मालती. तर ह्या नाटकातील नायिका मालती अगदी विरुद्ध फटकळ अशी आहे. भावनाप्रधान आहे, बोलता बोलता भांडते तर कधी खुदकन हसते. तर तिच्या–वर प्रेम करणारा प्रभाकर रसिक नि रंगेल आहे. अशी ही नाटकांतील एकेक पात्रे प्रेक्षकांना रंगवून टाकतात.

गडकऱ्यांचे नाटके काळाबरोबर जुनी वाटतील पण त्यांच्या भाषेचा लखलखाट, त्यांच्या काव्यमय कल्पनांचा उत्पेक्षांचा झगझगाट आजही पहिल्या प्रमाणेच वाचकांचे डोळे दिपवतो. हास्यरसाचे नि करूण रसाचे परिपोष करण्याचे गडकऱ्यांच्या भाषेचे सामर्थ्य आजही प्रभावी आहे. आणि म्हणूनच नि नाटचसृष्टीतले गडकऱ्यांचे कार्य युग प्रवर्तकाचे मराठी रंगभूमीवरील त्यांचे स्थान अढळ आहे.

• • •

# प्रेमपुजारी बंड्या


चारुशिला पि. देशमुख
एस. वाय. बी. ए.


तसं पाहिलं तर त्यांच नांव होतं, ' बंडू देशपाडे ' परंतु त्याला सगळेजण बंडू हवालदार म्हणायचे, म्हणजे त्याचं असं झालं की त्याने दादा कोंडकेचा ' पांडू हवलदार ' हा सिनेमा बघितला आणि त्याला त्यातल्या हवलदारावर जाम खूष झाला. आणि त्या दिवसापासून त्याने आपले नाव ' बंडू हवलदार ' ठेवले व त्याने आपल्या मित्रांनाही सांगितले की, आजपासून मला ' बंडू हवालदार ' म्हणायचे. अशा ह्या बंडूने ऑक्टोबर–मार्चच्या वाऱ्या करून सरते शेवटी कॉलेजमध्ये प्रवेश मिळविला.

तर, ह्या बंड्याला चित्रपटसृष्टी खूप आवड–याची. आपणही चित्रपटसृष्टीत प्रवेश करावा आणि हिरोसारखे साहस करावे असे त्याला वाटत असे. पण त्याला साहसाला कुठे स्कोपच नव्हता. निदान आपल्या स्वत:च्या जीवनात तरी साहस करून दाख–वावे असे त्याला राहून राहून वाटे. साहस म्हणजे कसं ! तर एखाद्या मुलीशी प्रेम करावे. त्याला कडा–हून विरोध व्हावा मग दोघांनी गुप्तपणे विवाह करावा वगैरे गोष्टी. सिनेमात घडतात तशाच ! रस्त्याने जाताता एखादी मुलगी दिसली की, तो शिट्टी फुंकायचा परंतु तो सिनेमातील हिरो नसल्या मुळे आणि मुलगीही हिरॉईन नसल्यामुळे त्याला दाद मिळत नसे त्यामुळे धाडसाचा हा मार्ग निरूप–योगी ठरायचा.

एकदा मात्र बंड्याने ठरविलेच की, आपण एखाद्या मुलीवर प्रेम करायचेच आणि मस्तपैकी ' प्रेम बंधन ' मधलं ' मैं तेरे प्यार में पागल ' असे गायचे आणि लग्नाला संमती मिळाली नाही की; ' बॉबी ' टाईप स्कूटरवरून पळून जायचे व ' आरा–धना ' तल्या सारखे लग्न करायचे. बंड्याचीच प्रतिज्ञा ती ! त्याने ती अंमलात आणायला सुरुवात केली पण प्रेम म्हणजे नक्की काय करायला हवं हे त्याला सुचेना आणि ते समजावून घेण्यासाठी त्याने " प्रेम नगर, प्रेम पुजारी, प्रेमशास्त्र, प्रेम पर्वत, प्रीत तुझी माझी रे चित्रपट पाहचले." आणि त्या बरोबरच ' प्रीती संगम ' हे नाटक पाहिले. परंतु त्यातूनही ह्या ' बंडू हवलदाराला ' प्रेमाची व्याख्या समजली नाही !

तरीही बंड्याने हिंमत सोडलीनाही. सोयी-स्कर म्हणून त्याने वर्गातलीच मुलगी निवडली. सावळीच पण तरतरीत केसांचा बॉबकट, फॅशनच्या बाबतीत एकदम पुढे.... एकदम स्मार्ट.... (त्याच्या म्हणण्यानुसार) बस्स् प्रेम करायचे तर हिच्याशीच !

एकदा क्लासमध्ये त्याने कागदाचा बाण केला. अर्जुनाला आठवून नेम धरून.... पण इथेही दुर्दैव आड आले ! बाण तिला न लागता शेजारणीला लागला.... 'नालायक कुठला' असें म्हणतच ती ताडकन उभी राहिली. सारा वर्ग स्तब्ध.... सर डिस्टर्ब झाल्याने वैतागले. बंड्याची करामत सरांना कळली, भरवर्गात व मग प्राचार्यांपुढे त्याला बराच 'अहेर' मिळाला. २-४ दिवस मग बंड्याने कॉले-जला दांडीच मारली. आल्यावर आठवडाभर तो एकदम 'जंटलमन' सारखं वागला.... परंतु त्याला आपल्या भीष्म प्रतिज्ञेची पुनः पुनः आठवण येऊ लागली.

त्यानंतर काही दिवसांचीच गोष्ट कॉलेज सुटलं होतं; ती (बंडूची पहिली प्रेयसी) मैत्रिणीकडे पाहून हसली आणि हात केला. बंडूला वाटले की तिने आपल्यालाच हात केला. आपलं काम पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक झालं. (कारण आपली पन्नास टक्केची बाजू फिक्स आहे असे तो समजत असे) त्याने केसांवरून हात फिरवला कॉलर ताठ केली. तिच्याजवळ जाऊन उभा राहिला. तशी ती बाजूला सटकली. तरी बंड्या जवळच, शेवटी तिने त्रासून विचारलं "काऽऽय हवंय आपल्याला ?" तसं इंप्रे-शन मारण्यासाठी बंड्या चक्क इंग्रजीत म्हणाला. "आय वांट टू टेल यू समथींग" एका दमात इंग्रजी वाक्य बोलण्याने त्याला दम भरला. तसं तिनं वैता-गून विचारलं, "पण कशाबद्दल? " शेवटी बंड्याने इंग्रजीचा हाव करूनच आपल्या 'आईच्या भाषेत' विचारले (कारण त्यावेळी कोण इंग्रजीत बोले [illegible] म्हणे, " अरे आईच्या भाषेत बोल " पण.... म्हण[illegible] मला.... नाही म्हणजे तुम्ही माझ्यावर प्रेम कर[illegible] ना ?' तोच त्याला आपल्या समोर काजवे च[illegible] कल्या सारखे वाटले आणि समोर ती सँडल पा[illegible] घालत असलेली दिसली. तिच्या जवळ बऱ्याच [illegible] थावल्या व तिने एक्सप्लेशन दिले की " अग ! प[illegible] पण तिला भाव मारला आणि आज अडवून विचा[illegible] तोय तुम्ही माझ्यावर प्रेम करताय ना म्हणून? [illegible] छाप मजनू कुठला ! "

बंड्याला आज बराच अपमान झाल्यासा[illegible] वाटले कारण कॉलेजातील मुलींमध्ये डिसक्रेडिट [illegible] फेमस होऊन गेला हेच त्याला सँडलच्या मारा[illegible] वाईट वाटले कारण आता तू नहीं तो और [illegible] नहीं, तो और सही ! याला आता [illegible] राहिला नव्हता.

अचानक एके दिवशी बंड्याच्या जीव[illegible] कलाटली मिळाली. बंड्याच्या वर्गात एक नवीन मु[illegible] आली. तिला पाहताक्षणीच बंड्याचे तिच्यावर [illegible] बसले आणि बंड्याने पुन्हा तीच नवीन चूक ([illegible] पडण्याची) केली. कारण " अपयश ही [illegible] पहिली पायरी आहे " असे कोणी तरी [illegible] प्रकरणानंतर त्याला म्हणाले होते. नवीन [illegible] मुलगी केसांचा बॉब केलेली, गोरी फॅशनेबल [illegible] हातात वह्या ऐवजी सुतळीची पर्स आणि [illegible] हातात सुगंधी सेंटने दरवळणारा रुमाल काय[illegible] यामुळे बंड्या पहिल्या केसपेक्षा पुरता पागल [illegible] त्याला स्वप्नात तीच दिसू लागली. " ती [illegible] बाला ! कलिजा खलास झाला ".

शेवटी तिच्याशी ओळख काढण्या[illegible] प्रश्न- ती निवडणूकीला उभी राहणार [illegible] कळल्यावर तिच्या विरुद्ध उभे रहाण्याचा सल्ला त्याच्या मित्रांनी बंड्याला दिला. त्यामुळे वर्ग प्रतिनिधी नाही तर निदान ओळख तरी होईल या कल्पनेने बंड्या मनोमन सुखावला. सामना दोघांचा होऊन तो अपेक्षितरित्या साफ कोलमडला.... पण बंड्याने आपले ठरलेले सुरु केले (स्टेप्स) पार्टी मागितली. तिनेही कँटीनमध्ये वडा वगैरे, (त्याच्या दृष्टीने पार्टी) दिली. बंड्याला वाटले आपले काम झाले. याने मग पार्टी, चिठ्ठ्या....पत्रे.... देण्यास सुरूवात केली. तिने पण दिली. त्यामुळे त्याला स्वर्ग दोन बोटेच उरला असे वाटले.

एका संध्याकाळी रकाळ्यावर 'बंड्या' फूल फॉर्मात होता. तो म्हणाला 'देखो मैं तुम्हारे लिये क्या लाया हूँ'? 'देखू तो क्या लाये हो'? 'ओळख तो सही' बॅलबॉटम ?' 'नही' मॅक्सी, इंपोर्टेड साडी, सेंट ?' प्रत्येक वेळी बंड्याचा वाढता नकार ती वैतागली. शेवटी बंड्याने फुलांची वेणी काढली. ती लालबुंद.... अरे, बॉबकटवाल्या मुली कधी वेणी घालतात ? आणि ही झिपऱ्या शेवंतीची वेणी.... शी शी 'धिस इज टू मच इन्सल्टिंग'.... बंड्या अवाक् 'हे बघ, आता परीक्षा जवळ आल्यानं भेटणं-फिरणं बंद आणि तू यावर्षी क्लिअर पास झाला पाहिजेस' बंड्या सुखावला इतकी बुद्धीमान स्मार्ट मैत्रिण आपल्यावर जीव टाकते-खुदासे और कुछ नहीं चहिये.

जाताना तिने जून महिन्यातच भेटण्याचे कबूल केले होते. त्यानंतर परीक्षा झाली. रिझल्ट लागला आणि बंडोपंतांचा क्लिन बोल्ड आणि ती पास झाली होती. परंतु तो सर्वांना सांगायचा " माझे विषय राहिले आहेत नापास झालो नाही मी, " आणि तिची वाट बघत होता. काही दिवसात बंड्याला तिने मामाच्या गावाहून पाठविलेले पत्र मिळाले.

बंड्या पत्र पाहून खुष झाला आणि त्याने पाकीट उघडले.

प्रिय, बंडू महाशय,
स. न. वि. वि.

तुला कसं काय सांगू हेच कळत नाही. माझं लग्न नुकतच झालंय मी तुझ्यावर खरेखुरे प्रेम कधी केलेच नव्हते ते एक ढोंग होते. तू मुलींना खुप त्रास द्यायचास चिडवायचा असे त्यांनी मला सांगितल्या-वर मीच एक आयडीया काढली होती. मला तुझी म्हणजे एका टारगेट पोराची खोड मोडायची होती. प्रेम करणं इतकं सोपं नाही राजा ! चित्रपटात वास्तविकता कुठेच नसते. ते जेवण करण्याइतके सोपे नाही. ती एक कला आहे हे तुला समजले असेलच. माझे प्रेम 'एप्रिल फुल' समज आणि मला तू विसरुन जा, मी तुला केव्हाच विसरले आहे. तुझ्या जीवनप्रवाहात मला एक बुडबुडा समज.

तुझी (नाही ती)
सौ. XXX

बिच्चारा ! बंड्या हातचोळण्यापलिकडे काही करू शकत नव्हता. तरी पण कॉलेजची नवीन टर्म कधी सुरू होते याच्याकडे त्याचे लक्ष होते. कारण यावर्षीही कोणी तरी नवीन मुलगी कॉलेजात येईलच याची त्याला खात्री होती.

• • •

**टेक्समो** [ कोईमतूर ]

३४५३ दुकान
३२२४ घर

मोनोब्लॉक, डोमेस्टीक सबमर्सीबल पंपस्

हेड ऑफिस



## रुरल सप्लायर्स

पोलन पेठ, जळगाव.

ब्रँच -:
नया मोटार स्टॅन्ड
**बुऱ्हानपूर** ( म. प्र. )
२८५९

पंपसेट प्रत्यक्ष वर्कींग पहावे व
खात्री झाल्यावरच खरेदी करा.

एस्क्वायर हॉनवेल जम्बो, एम्पायर, लिओ,
व्ही व्ही. पी., सूर्यभारती, कॅपरी,
बॉम्बिनोच्या ओरिजीनल प्री रेकॉर्डेड
व्हिडिओ कॅसेटस्
व
कॉस्मिक कलर टेलिव्हीजन साठी



## लाठी इलेक्ट्रानिक्स

७, पोलन पेठ, चित्रा चौक
जळगाव- ४२५००१
फोन नं. ४८०२, ४८०१ पी. पी.

# मनुष्य अमर झाला तर...

**विजयकुमार हरी पाटील**
एफ. वाय. बीएस्सी (बी)

जून महिन्याचे दिवस भारताचे लोकनायक जयप्रकाश नारायण याची प्रकृती अत्यंत खालावली होती. जसलोक रूग्णालयात अत्यवस्थ होते. इतक्यात रेडिओवरून जयप्रकाशजींच्या निधनाची वार्ता आली आणि हजारो अंतःकरणे विव्हल झाली. परंतु थोड्याच वेळात ही बातमी चुकीची असल्याचे जाहीर झाले. जयप्रकाशजींची मृत्युवर मिळवलेला हा विजय म्हणजे विज्ञानाचा अभूतपूर्व विजय मानावा लागेल.

अमरत्व प्राप्त होणे ही गोष्ट विज्ञानाच्या दृष्टीने काही अवास्तव नाही. देवदानवांमधले भांडण तरी काय मृत्युवर विजय प्राप्त करण्यासाठीच, चंद्र, मंगळ, उपग्रह यांवर जाणारी माणसे मृत्युवर विजय मिळवू शकली तर त्यात नवल आहे असे मला वाटत वाटत नाही.

पण खरंच मृत्यु नाहीसा झाला तर.... मनुष्याला 'मृत्यु' हा शब्द्च काल्पनिक वाटू लागेल. मृत्युचे भय राहणार नाही. या वैज्ञानिक जगात मृत्यु आहे म्हणूनच जीवनाला अर्थ आहे. गोठेपणा हा माणसांच्या जीवनामुळे मिळतो, परंतु तो मरणामुळे अधिक मिळतो. मृत्युमुळे प्रियजनांच्या विरहाचे जे अनावर दुःख सहन करावे लागते त्यातून सुटका होईल. पण विरहाचे जे अनावर दुःख नसेल तर मैत्रीचा आनंद नाहीसा होईल. अनेक पिढ्या एकत्र राहतील आजच आपण पिढीपिढीतला संघर्ष पाहात आहोत, मग ! तेव्हा तर किती संघर्ष होईल. मृत्यु नाहीसा झाल्यानं मनुष्य अमर होईल परंतु अ-जर होणार नाही अस नाही. त्याला ठराविक वयाला वार्धक्यावस्था प्राप्त होईल, व मग ते म्हातारपण न संपणारे ठरेल. मनुष्य अमर झाला तरी तो दुःखी होणार नाही असे नाही. जस जसे वय वाढेल तसतशी त्याची कामे थकतील, त्यांचे हात पाय काहीच काम करू शकणार नाही. मग माणसाच्या तोंडून उद्गार निघतील, "विठ्ठला सोडव रे बाबा यातून" "नको ह्या हालअपेष्ठा आपल्याला" मरण यावे यासाठी तो मृत्यु देवाला विनविल. त्याला आपला संप मागे घ्यावा लागेल पण त्यातुन कधीच मुक्तता होणार नाही, मरणाचा शोध करीत तो हिंडू लागेल.

मरण नाही असे एकदा कळल्यावर माणसातील साहसी वृत्तीला जोर येईल रणांगणावर जाण्यास कोणीच उरणार नाही. धाडशी स्पर्धाला उत येईल. पण येथे एक धोका ही संभवतो मरण नाही म्हणजे पुनर्जन्म नाही, पापपुण्याचा निवाडा नाही. मग मनुष्य पाप करतांना कचरणार नाही. मग मानवी जीवन ' क्षुद्र ' बनेल आज मृत्यु आहे म्हणून आपली ईश्वरावर श्रद्धा आहे विश्वास आहे. मनुष्य अमर झाला तर परमेश्वराचे अस्तित्व धोक्यात येईल व जीवन श्रद्धाहीन होईल. जीवन हे मरणापेक्षा ही अधिक कष्टाचे होईल. जीवन म्हणजे मैत्रिणींना व मित्रांना भेटणे, माहेरी जायचे, खेळ खेळायचे बाबा आमटे याचे जीवनापेक्षा मरणावर जास्त प्रेम आहे परंतु अमरत्वाचे काही फायदेही होतील थोर पुरुषांना स्वतःच्या कार्याचे सुफलता पाहता येईल धोंडू केशव कर्वे यांनी महिलांच्या विकासासाठी किती महान कार्य केले ह्याचे फल त्यांना पाहता आले नाही. भूतकाळात चाचपडण्यांना गवसलेल्या सत्याचा मिळून इतिहास तयार करावा लागणार नाही. शंभर वर्षापूर्वी घडलेल्या एखाद्या गोष्टीची सत्यता पाहण्यासाठी कागद पत्रें चाळावी लागणार नाही. मृत्यू नंतर होणारी शिक्षा मनुष्याला आज सत्कर्म करावयास भाग पडते.

परंतु ही परिस्थिती अशीच राहीली तर लोकसंख्या सतत वाढत राहील वाढत्या बेकारीचा प्रश्न येणार आजही आपल्या देशापुढे बेकारीची समस्या आहे जीवनावश्यक वस्तुंची तीव्र टंचाई भासेल. माणसांना माणसे नकोशी होतील. हे असेच सुरू राहले तर जीवनाची नव्हे तर माणसाचीच उपाययोजना करण्यासाठी संशोधन करावे लागेल. आल्म्याने नवीन देह परिधान करणे म्हणजे मृत्यु. पण माणसाचे अमरत्व अवलंबुन आहे ते त्याच्या जीवनावर ! म्हणूनच मी म्हणेन की माणसा शारीरिक अमरत्व प्राप्त होऊ नये तो त्या कार्यानेंच अमर व्हावा-

• • •

# मन-हे गहिवरते

कु. संजीवनी पु. गाय...
तृतीय वर्ष ( वाणि...

निरोप द्याया या विश्वाला
मन हे गहिवरते ॥१॥

सहवासाचे चार दिसांचे
प्रेम मनी उरते

ज्ञान, विज्ञान, कलेचा
येथे विकास व्हावा, ॥२॥

संस्कृती नि सदाचार
घरोघरी पसरावा

घेता येथून निरोप
वाटे पुन्हा येथे यावे ॥३॥

बनुनि विद्येचे अभिभावे
येथे मुक्तपणे विहरावे

*

# ' नशीब '

टि. जे. लोखंडे
तृतीय वर्ष वाणिज्य.

दिलीपला सर्व तऱ्हेच्या गाण्यांची आवड होती. सिनेमासंगीत, नाट्य संगीत; वाद्यसंगीत हे सारं त्याला आवडायचं. कारण संगीताच्या सुरात दुःख बुडवळ जायचं हे त्याला कळून चुकलं होतं, त्याने रेकॉर्डर सुरू केला, ' तुम न जाने किसी जहाँ मे खो गये ' हे गाणे ऐकत असतांनाच स्नेहलचा चेहरा त्याच्या डोळ्यांसमोर नको असतांना सुद्धा येऊन उभा राहिला, स्नेहलशी आता त्याला काही एक कर्तव्य नव्हतं, तिचं प्रेमच मुळी खोट होतं, ती बी. ए. ला होती. स्नेहल दिसायला नक्षत्राची म्हणण्यापेक्षा नक्षत्रे तिच्या सारखी दिसत, असे म्हणणेच जास्त योग्य ठरले असते. पण तिला आपल्या सौंदर्याची क्षींग होती. दिलीप गोरापान, कुठल्याही मुलीला भुरळ पडेल असं त्याच व्यक्तिमत्व होतं. त्यातल्या-त्यात सुंदर मुली इंजिनीयर व डॉक्टर यांच्यावर लवकर फिदा होतात. त्यामुळे दिलीपवर स्नेहल भाळली यात नवल असं काही नाही.पण हे प्रेम वास्त वाच्या विस्तवावर भाजून जळून गेल होतं. दिलीपला राजस्थान मधील एका ओसाड भागात पूल बाधण्याच्या कामावर चीफ इंजिनीयर म्हणून नोकरी लागली होती, परंतु स्नेहलची इच्छा दिलीपनं हो अशी नोकरी पत्करू नये अशी होती. तिची इच्छा दिलीपनं नोकरी पुण्या-मुंबईत करावी अशी होती. कारण लग्नानंतर दिलीपनं नोकरी वरून घरी आल्यावर त्या दोघांनी हातात हात घालून फिरायला जावं, सिनेमाला जावं. मौजमजा करावी असं तिला वाटत होतं. ह्या अपेक्षा तिला ओसाड प्रदेशात राहून पूर्ण करता आल्या नसत्या. परंतु दिलीपला बी. ई. होऊन कुठल्यातरी ऑफीसात कागद कुरवडत बसणं पसंत नव्हतं. अनुभवाच्या दृष्टीने चांगली कामेच करणं योग्य होत. ही त्याची व्यक्तिगत धारणा होती. त्याच्या दृष्टीने ती तऱ्हेवाईक होती. म्हणून त्याच बिनसल होत.

दिलीप आता त्या ओसाड भागात ब्रीज बनवायच्या कामावर रूजू होता. त्याच्या मनात लग्न करण्याची इच्छा नव्हती. परंतू आई-वडीलांच्या इच्छे विरुद्ध तो जाऊ शकला नाही. शेवटी वडिलांच्या इच्छेविरुद्ध तो जाऊ शकला नाही. शेवटी वडिलांच्या पसंतीच्या भावना नावाच्या मुलीशी त्याचे लग्न झाले. भावना स्मार्ट होती. तुलनेनं

स्नेहलपेक्षा सावळी होती. पण निःसंशय आकर्षक होती. दिलीपला ती खूप आवडली. दिलीप आणि भावना त्या ओसाड प्रदेशात एकमेकांच्या सहवासात आनंदात रमत होते. दिलीपच्या जीवनाला बहर आला. स्नेहलची कमी भावनाने पूर्ण केली होती. दिलीपच्या मिठीत जगातली सारी सुखं समावलेली आहेत. असं भावनाला वाटत असे. भावनेच्या सहवासात दिवस भराभर निघून जात होते. माणूस तोच आनंदी असतो स्वतः आनंदी असला की त्याला सारं जग चांगल दिसतं पण निराशेन दुर्दैवानं त्याला ग्रासल की जीवन असह्य होऊन सारं जग कसं भकास वाटायला लागतं, अगदी तसच माणसाचं दैव बलवत्तर असलं तर त्याचे सर्व दिवस आनंदात जातात. परंतु दैव खट्ट असलं की एकामागून एक दुःखाने तो उदास बनतो. अगदी अशीच परिस्थिती दिलीपच्या जीवनात घडली. भावनेला सारखं ब्लडींग व्हायला लागलं होतं. प्रथम दिलीपनं दुर्लक्ष केलं. पण जास्त झाल्यानंतर तो तिला पुण्याच्या चांगल्या डॉक्टरांकडे घेऊन गेला. भावनेची तपासणी झाल्यावर डॉक्टरांनी दिलीपला एका बाजूला नेऊन भावनेला गर्भाशयाचा कॅन्सर असल्याचे सांगितले. उपाय कोणताही होऊ शकणार नव्हता. दिलीपचं अवसान गळलं. आपण काय एकलं यावर त्याचा विश्वासच बसेना, दिलीपच्या जीवनाला पुन्हा खिळ बसणार होती. त्याची प्रेमळ भावना त्याला सोडून जाणार होती. ओसाड प्रदेशातील इतर स्त्रियांना कधी काही झालं नव्हतं. मग नेमकं हे दिलीपच्याच वाटेला कां याव ? हे त्याच्या नशि–बात होतं हेच खंर ! आणि एके दिवशी भावना दिलीपला सोडून गेली. दिलीपच्या जीवनातील सारं चैतन्य नष्ट झालं होतं दिलीपनं नोकरीचा राजीनामा दिला, उध्वस्त मनान दिलीप फिरत होता. त्याला कशातच रस वाटत नव्हता आणि अशीच एक दिवस स्नेहल त्याला भेटली, त्याचा अवतार पाहुन तिला धक्का बसला. ती दिलीपला म्हणाली, ' दिलीप, काय झालं रे तुला' ? तो म्हणाला, " माझ्या नशिबानं मला दगा दिला, माझी भावना मला सोडून गेली. " स्नेहल का ? 'काय झालं होतं तिला? दिलीप– ' कॅन्सर, उशिरा लक्षात आला. स्नेहल– ' मी तुला म्हणत होते त्या भागात जाऊ नकोस म्हणून ? दिलीप– जाऊदे, पण हे सारं माझ्याच वाट्याला का ' ? स्नेहल त्याच्याजवळ बसली तीनं त्याला धिर दिला. नंतर ती म्हणाली, नोकरीवर परत कधी रुजू होणार आहेस. ?

असं घरी बसू नको. कामात असलं की दुःख हलक होत ? दिलीप म्हणाला. ' आता कसलीच इच्छा उरलं। नाही, मी नोकरी सोडून दिली. ' ती काही बोलली नाही. थोड्या अवधीनंतर तो म्हणाला ' माझ्या दुःखाचा कोठा परमेश्वराने ठरवून दिला आहे, तझं कस चाललय ? ' ' मला काय वाईट आहे ? तुझी फार आठवण यायची, दिलीप मी सुद्धा खुप सोसलय.' तो म्हणाला, ' मी काय करू स्नेहल ? दैवाचे फासे असे उलटे पडणार होते. आपलं लग्न होणं माझ्या नशिबात नव्हत ' तेव्हा स्नेहल म्हणाली, ' अजूनही नाही. ' दिलीप म्हणाला म्हणजे, तेव्हा ती म्हणाली, ' माझं लग्न ठरलं आहे. ' दिलीप उठला. त्यानं तिचा निरोप घेतला. आपल्या उजाड जिवनात पुन्हा बहार आणण्याची त्याची इच्छा साफ धूळीला मिळाली होती. आपलं जिवन अधारान भरलयं असं त्याला वाटलं, त्याच्या साठी दाही दिशातच अंधार भरला होता. तो उदास मनान घरी आला तेव्हा त्याच्या वडिलांनी सांगितलं की, मुंबईहून तार आली आहे. त्याने तार वाचली त्याच्या साहेबांनी त्याचा राजीनामा मंजूर केला नव्हता. आसाम मधील अशाच एका मोठ्या पुलाचं काम त्याच्या कंपनीला मिळाल होतं, आणि ते काम त्याच्या शिवाय कुणीही करु शकणार नव्हते. त्याला ओसाड प्रदेशातच काय पण कुठल्याही प्रदेशात काम मिळालं तरी जायच होतं. कारण ज्या नशिबाने त्याच्याशी असा दुर्दैवी खेळ खेळला होता, ते नशीब आणखी किती दिवस आपल्याला जिवंत ठेवणार होते हे त्याला पहायचं आहे.

असं असतं कुणा–कुणाचं नशीब ! ●

# एका नटाची मुलाखत

**दिलीप शिरसाट**
**टि. वाय. बीएस्सी**

कलामंडळाचा सेक्रेटरी या नात्याने मला एखाद्या चित्रपट हिरोची मुलाखत घेण्याचे काम सोपवले होते. मी धर्मेन्द्र यांची निवड केली. त्यांच्या घराच्या पत्यापासून सर्व माहिती मिळवावी लागली माझे बरोबर माझा पी. ए. कम् सेक्रेटरी ' टोन्या ' होता. या मुलाखत प्रकारात टोन्या अनुभवी होता. यापुर्वी त्यानें सात वेळा १२ वी नापास झालेल्या गाढवेची मुलाखत घेतली होती हा त्याचा फार मोठा अनुभव होता.

धर्मेन्द्रची मुलाखत घ्यावयास जायचे म्हणून मी व टोन्या खुष होतो. आपला आवडता हिरो धर्मेन्द्र त्याची मुलाखत आपणास घ्यायची म्हणून खुष होतो.

मोठा प्रॉब्लेम म्हणजे आमचेकडे धर्मेन्द्ररावांच्या घराचा पत्ता नव्हता. टोन्या मोठा ग्रेट त्याने तो नाना लटपटी खटपटी करून मिळविला आणि धर्मेन्द्रला तसे कळवून त्याची अपॉंईटमेंट घेतली.

रविवारला सकाळी साडेनऊला आम्हाला बोलविले होते. धर्मेंद्रच्या सेक्रेटरीचे पत्र आल्या पासून आम्हाला दुसऱ्या कुठल्याच विषयावर बोलणे नव्हते. एकच विषय तो म्हणजे धर्मेन्द्र

मला तर दिवास्वप्ने पडू लागलीत. मी, टोन्या आणि धर्मेन्द्र बसलेलो आहोत प्रश्न उत्तर चालली आहेत आणि तेवढ्यात हेमाभाभी कॉफी–बिस्कीट घेऊन येते आणि अग्रह करून बिस्कीट देते. दुपारी त्यांचे समवेत आणि हेमाने बनविलेले जेवण घ्यायचा त्यांचा आग्रह.ती खास दक्षिणात्य पदार्थ बनविणार होती. सोबत नेहमी चित्रपट हीरो चित्रपटातले खाऊन पोसला गेलेला असतो असा सुप्रसिद्ध गाजर हलवा होताच. आग्रह करवून हेमाभाभी आम्हाला वाढते. धर्मेन्द्रचा अग्रह चालला आहे आणि हास्य विनोदात आमचे जेवण चालले आहे.

मित्रांमध्ये, कॉलेजला आमचे महत्व वाढले होते. धर्मेन्द्रची मुलाखत घ्यायला जाणार म्हणून मित्रांमध्ये आमचा भाव होता.

टोन्या २-४ कॅमेरे घेऊन त्यांचेशी काहीतरी खेळत असतो. का ? तर म्हणे त्याला धर्मेन्द्रच्या काही ॲक्शन्स घ्यायच्या असतात.

दोन डझन पेन्स होतात पण एकही त्याच्या पसंतीस उतरत नाही. धर्मेन्द्रची मुलाखत घेण्यासाठी काय साधा पेन हवा ? खास इंपोर्टेड पेन बघितले जातात. स्पेशल डायरी घेतली जाते. कपडे कोणते करायचे हा यक्षप्रश्न. शेवटी मित्रमंडळींकडून कपडे आणले जातात. ३-४ वेळा धुवून प्रेस केले जातात. शर्टची घडी शेवटपर्यंत मनासारखी होत नाही. बो मिळविला जातो. बुट मिळवला जातो.

तो रविवार कधी येतो असे झालेले. कोणते प्रश्न विचारायचे याची रिव्हीजन होते. गेल्याबरोबर अभिवादन करायचे, मुलाखत संपल्यावर 'थँक्स' म्हणायचे मधे - मधे येस वगैरे म्हणायचे असे सर्व लक्षात ठेवले जाते.

दोन दिवस आधी पासूनच टोन्याचा माझ्या रूमवर मुक्काम होता.

शेवटी तो दिवस उगवतो आम्ही सर्व विधी आटोपून धर्मेंद्र कडे जाण्यासाठी निघतो. पत्त्याची डायरी, अपॉईंटमेंट लेटर, स्पेशल डायरी, इंपोर्टेड पेन वगैरे सर्व साहित्य घेऊन आम्ही घरा बाहेर पडतो. कंगवा वारंवार डोक्यातून फिरवला जातो.

आम्ही नऊ वाजेलाच धर्मेंद्रच्या बंगल्याजवळ हजर होतो. द्वारपाल आम्हाला दारा जवळ थांबण्यासाठी सांगतो. आम्ही बाहेर उभे असतांनाच कुणीतरी ट्रंकसुट मधे धावत येतांना दिसतो. द्वारपाल त्याला सलाम करतो. मी टोन्याला कोण म्हणून विचारतो. टोन्या, अरे हेच ते धर्मेंद्र, नुकतेच जॉगींग करून येत आहे.

साडेनऊला आम्हाला आत सोडण्यात येते. दिवाणखान्यात आम्ही जातो तिथल्या गालीचाला आमच्या बुटांची घाण नको लागायला म्हणून मी कडेने चालतो आहे तर टोन्या एखाद्या गल्लीत चालावे अशा बेदरकार रितीने चालत आहे.

आम्ही एका कोचावर बसतो. माझे लक्ष दिवाणखान्यातील सजावटीकडे होते. तर टोन्या मस्तपैकी सिगारेट ओढत होता.

धर्मेंद्र बरोबर साडेनऊला आत आला.

"हॅलो, फ्रेन्डस्" धर्मेन्द्र, "प्रवास कसा झाला?"

" उत्तम " टोन्या

" तुम्ही थोडा वेळ बसा मी जरा बाहेर उभे असलेल्या निर्मात्याशी बोलून येतो. हे निर्माते एकही दिवस सुटी घेऊ देत नाहीत " असे पुटपुटत तो बाहेर जातो.

सुमारे एका तासानंतर आत आल्यावर तो दिलगिरी प्रदर्शित करतो, " सॉरी, माझी आपणास फार वेळ वाट पहावी लागली, नाही का ?" घेतल्या निर्माता फार चिकट तो फाईटींगचा शॉट गुंडाचा शिवाय परतूच देत नव्हता, मग आलो २-४ समाचार घेऊन. "

आम्ही अश्चर्यचकीत होऊन त्याचेकडे पहातच राहिलो. टोन्या त्याला १-२ प्रश्न विचारतो. ते फायटींग वरतीच असतात

धर्मेंद्र घाईतच असतो. तो म्हणतो " मी तुम्हाला काही फाईटींगचे शॉट्स कसे असतात ते समजावून सांगतो " असे सांगून तो उठतो व सरळ एक ठोसा माझ्या दिशेने व एक ठोसा टोन्याला देतो. काय होतय हे समजायच्या आत आम्ही खाली कोसळतो. उठून बसण्यास धर्मेन्द्रची मदत. तो म्हणतो " आता हा अगदी **quick action** चा प्रकार" वाक्य पुर्ण व्हायच्या आत माझ्या नाकावर जोरदार ठोसा मी विव्हळतो " आई ग " अजून १-२ ठोसे बसतात.

मला जाग येते तर टोन्या माझ्या शेजारी झोपला आहे. आणि त्याचा हात माझ्या नाकावर आहे. टोन्या माझ्या आवाजाने उठून म्हणतो " काय झोप नाही लागली काय? स्वप्नात सुद्धा मध्ये पिक्चर येतोय काय? धर्मेंद्रच्या ॲक्शन्स आठवताहेत काय? फायटींग आठवतेय ?

# स्वरसम्राज्ञी लता


प्रमोद दत्तात्रय भंगाळे
१२ बी कॉमर्स (सी)


" गेल्या शतकात तीन जगज्जेते झाले हिटलर, आईन्स्टाईन आणि लता मंगेशकर " असे सुप्रसिद्ध संगीतकार कल्याणजी आनंदजी म्हणतात तर वि. स. खांडेकरांच्या मते लताही हिंदुस्थानची कल्पलता होय. तर काहींच्या मते लता ही " जगद्रत्न " आहे. लता मंगेशकरच्या कंठातील रंगीत आणि गंधीत शब्द फुलांनी अपूतमय भावविश्व निर्माण केले. गायनाला पाचवा वेद म्हणतात. तसेच गायनाला देवांची भाषाही म्हणतात. लतामंगेशकरच्या गाण्यावरून हे सत्य असल्याचा खात्री पटते. वयाच्या मर्यादा सामान्यांना असतात असामान्यांना नाही. म्हणूनच वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षीच गाणारी लता आणि वयाच्या १९ व्या वर्षी स्वरसम्राज्ञी झालेली लता सामान्य नाही. ज्ञानेश्वर, बालकवी आणि लता मंगेशकर लहान वयातच मोठे झाले लहान पणीच महान यश मिळविणाऱ्यांच्या मालिकेत बसविले तर अतिशयोक्ती होणार नाही.

लता मंगेशकर ही दिनानाथ मंगेशकरांची कन्या. दीनानाथ मंगेशकर त्यावेळचे श्रेष्ठ गायक. ते गोव्याचे राहणारे. जातीने ब्राम्हण. गोव्यातल्या मंगेशांची उपासना करणारे. थाळनेरच्या हरीदास रामदास नावाच्या ब्राम्हण सावकाऱ्याच्या नर्मदा नावाच्या मुलीबरोबर पहिला विवाह झाला. ही पहिली पत्नी मेल्यानंतर पुन्हा शुद्धमती नावाच्या तिच्या बहिणीबरोबर थाळनेरला दुसरा विवाह केला. मग त्याना पाच आपत्ये झाली. सर्वात मोठी, लता, मीना, आशा. उषा, हृदयनाथ, २८ सप्टेंबर १९२९ साली शनिवारी रात्री साडेदहा वाजता इंदूर येथे लताचा जन्म झाला तिचे जन्मपत्रिकेतील नाव हेमा आहे. लताचे पहिले गुरु दीनानाथ मंगेशकर वयाच्या ७ व्या वर्षी स्टेजवर सांगलीला तिने " शूर मी वंदीले " हे नाट्यगीत म्हटले. ९ वर्षाची असतांना खजांचीच्या गाण्याच्या स्पर्धेत भाग घेतला. त्यात लताचा प्रथम क्रमांक आला. तिला बक्षीस देण्यात आले.. ती त्या बक्षिसाला कुणालाच हात लावू देत नसे तिच्या वडिलांनी तो कोपऱ्यात भिरकावून दिला होता आणि तिला म्हटले " कलावंता जवळ नम्रता असावी. " लता हा संदेश आयुष्यभर पाळत आहे. वयाच्या दहाव्या वर्षी लताने रेडीओवर पहिले गाणे म्हटले. तेही मराठी नाट्यपद होते. लताने 'भावबंधन' नाटकात ललितेचे काम अनेक वेळा केले. तसेच "मंगळागौर"या मराठी चित्रपटात आठ-दहा वर्षाच्या मुलीचे काम केले.

लता मंगेशकरची बहीण मीना लहानपणच्या आठवणी सांगतांना म्हणते, " सांगलीला आम्ही दहा वर्षे होतो. त्यावेळी 'संत तुकाराम' हा चित्रपट आम्ही सर्वांनी पाहिला " दुसऱ्या दिवसापासून लता

“ आधी बीज ” हा तुकारामाचा अभंग म्हणायची आम्ही भावंडे जमीनीवरती रोपा प्रमाणे आडवे पडायचे. लताने अभंग म्हणायला सुरूवात केली म्हणजे हळूहळू बीज आंकुरते आणि उभे राहते त्याप्रमाणे आम्ही उभे राहायचो. आम्हाला रोपे बनवण्याची कल्पना दीदीची ( लताची ) असायची. वडीलवारल्यावर कुटुंबाचा भार लता मंगेशकरने सांभाळला. त्यावेळी ती फक्त १२ वर्षाची होती. १९६२ संरक्षणनिधीसाठी लताने “ ए मेरे वतन के लोग़ो ” हे गाणे म्हटले. ते गाणे ऐकून नेहरूंचे डोळे पाणावले. लता मंगेशकरने अत्यंत कठीण परिस्थितीत दिवस काढले. एक कप चहा पिऊन पहाटे ४ वाजता मुंबईसारख्या शहरात लोकलने, बसने, तासन तास पोटात अन्न नसतांना प्रवास केला आहे. तिच्या पडत्याकाळात तिला मास्टर विनायक ह्यांनी आश्रय दिला.

वयाच्या १९ व्या वर्षी लताने “ हिलमन ” नावाची पहिली गाडी घेतली. आणि आजच्या शेव्हरलॅक गाडीत फिरणारी लता मंगेशकर ह्यांच्यात कोणताही बदल झाला नाही. तिचो राहाणी कमालीची साधी आहे. तिची पांढरी साडी आणि दोन वेण्या ह्यात कोणताही फरक झालेलं नाही. मेकअप तिला माहीत नाही. शरदचंद्र चटर्जी, वि. स. खांडकर हे तिचे आवडते लेखक. आणि सावरकर तिचे आवडते कवी. ‘महल’ या चित्रपटात “ आयेगा आनेवाला ” ह्या गाण्याने लता मंगेशकर भारताची स्वर सम्राज्ञी झाली. त्यानंतर ‘बरसात’ ह्या चित्रपटाने लता जगविख्यात झाली. अनारकली मधील “ ये जिंदगी उसी की है ” गाण्यातील दर्द सर्वांच्या अंतःकरणा पर्यंत पोहचला. मदरइंडिया या चित्रपटातील “ ओ मेरे लाल आजा ” ह्या गाण्याचे रेकॉर्डींग होतांना ती अक्षरशा रडली. नरगीसचे सर्वात आवडते गाणे “ आग ” या चित्रपटातील लताने गायीलेले “ राजा की आयेगी बारात, रंगीली होगी ओ रात ” हे आहे. तसेच अदालत मधील “ तुमको ये शिकायत है कि हम कुछ नही कहते.” ही लताची प्रसिद्ध गजल आहे. तसेच ‘गाइड’ ह्या चित्रपटातील “ कॉटोसे खिचके ये आंचल ” अत्यंत लोकप्रिय आहे. पु ल. देशपांडे यांचे आवडते गाणे “ ओ सजना बरखा बहार ” हे लताने गायिले गाण. स्वर्गीय मेहबूब ज्यावेळी लंडनला दवाखान्यात आजारी होते. तेव्हा त्यांनी लताला “ रसिक बलमा ” हे गाणे फोनवर म्हणायला लावल त्याने त्यांच्या आजारी मनाला आनंद मिळाला. मुकेशचे सर्वात आवडते गाणे “ लग गले के फिर ये हँसी रात हो ना हो ” तसेच अनेक प्रसिद्ध गाणे “ तुम क्या जानो तुम्हारी याद मे हम कितना रोये ” “महफील मे जल उठी शमा” “ झुमझुम चलती रात ” “ तुम जाने इस जहाँ मे ’ ‘ ठंडो हवा मे ’ अशा कितीतरी गाण्यांनी जगाला वेड लावल आहे. अशी कितीतरी गाणी लताने गायीली हे लतालाही सांगता येणार नाही.

लताने मायबोलीचे वैभव ही वाढवले. मराठीत “ अमर भुपाळी ” मधील “ घनश्याम सुंदरा, अरुणोदय झाला ” तसेच ह्याच चित्रपटातील “ लटपट लटपट तुझ चालण ” माधव ज्युलीयन चे “ प्रेमस्वरूप ” आई ” कवी “ बी ” ह्यांचे ‘ चाफा बोले ना चाफा चालेना ” सुरेशभट ह्यांचे “ गोकुळात रंग खेळतो हरी ” भा. रा. तांबे यांची अनेक गीत लताच्या मधुर कंठातून अमर झाली आहे. “ जनपळ भर ” “ मधुमागसी ” “ नववधु प्रिया मी ” इत्यादी गाणी मराठी माणसाला कधिच विसरता येणार नाही. या वरून लताचा मराठी भाषेचा अभिमान दिसून येतो. कितीतरी युगे बदलतील, संगीतात अनेक परीवर्तन होतील पण लताची गाणी तरूण पिढी आठवणीने गात राहिल.

अग विख्यात लता मंगेशकर महाराष्ट्रीयन आहे व तिची मातृभाषा मराठी आहे. ह्याचा आम्हा सर्वांना अभिमान आहे. लतामंगेशकर बद्दल म्हणायचे म्हटल्यास,

“ तेरा गाना, दिलके अरमानोका मील जायेगा जब जब चंदा आयेगा तेरी याद दिलायेगा ” असेच युग गात राहील.

गीर गई किस्मत तकदीर नही खुलती
कई युगोंमेसे ऐंसी लता नही बनती।

# चंद्रकोर

मिलिन्द मधुकर कुळकर्णी
एफ. वाय. बीएस्सी

सायंकाळचा सूर्य मावळतीला जात होता. सूर्याचा लाल गोळा आग ओकून काम झाल्याने परतत होता. तांबूस उन्हाची शेवटची तिरीपे शेवटचा नमस्कार घ्यावा तशी म्हणत होती “आम्ही जातो आमुच्या गावा ........

संदीप अन निशाच्या मनात उन्हाची तिरीपच गोंधळ घालत होती. ही त्याची अखेरची भेट की नव्या जीवनाची सुरूवात याबद्दल कुतुहल युक्त भीती दिसत होती. दोघेही एक शब्द बोलत नव्हते. विचारांचा काहूर मनात माजत होता. दोघे एकमेकांकडे अतीव विश्वासाने पहात होती.

संदीप हा गोविंदशास्त्री ह्या एका प्राथमिक शिक्षकाचा मुलगा सामाजिक सुधारणा घडावी, जातीद्वेष संपावेत. जातीपाती मोडकळीत याव्यात असे गोविंदशास्त्रींचे मत स्वत: त्याबद्दल खपत असत. त्यांचा मुलगा संदीप हा सुद्धा त्याच विचारांचा. म्हणूनच वडलांच्या विचाराचा पगडा त्याच्यावर पुरेपुर बसला होता.

संदीप बी. ए. च्या शेवटच्या वर्षास होता. परिसवाद वादविवादात संदीप नाही असा एकही कार्यक्रम नसायचा. जातीद्वेष मिटायला हवेत. सामाजिक समता व्हावयास हवी. सर्वधर्मसमभाव असावा असेच त्याचेहीमत. प्रत्येक सभा तो आपल्या कणखर आवाजाने, प्रभावशाली वक्तृत्वाने विचारांची अंतिम पातळी गाठलेल्या भाषणाने जिंकीत असे. पहिल्या काही मिनीटांत सभा स्वत:च्या हातात घेई, भाषण करतांना लोकांच्या नाड्या त्याच्या हातात असत प्रत्येक जण त्याचे भाषण ऐकताना श्वास रोखून धरायचा जणूं त्यामुळे गोविंद शास्त्रींना आपल्या मुलाचा फारच अभिमान वाटणे स्वाभाविक होते.

पाचवे सत्र सुरू झाले. त्याने प्रिन्सीपल मराठी घेतले होते. आता परिसंवाद, वादविवाद सुरू होणार त्यास संदीप पूर्ण तयारीनीशी सामोरा जाणार होता. पहिला परिसंवाद जाहीर झाला. विषय होता “ २० व्या शतकातली दलीतांची स्थिती. ”

संदीपने आपल्या दलित मित्रांची स्थिती बघीतली होती. स्वत: अनुभवली नसली तरी पाहिलेली होती त्यांच्या मित्रांकडून ऐकलेली होती. परिसंवादाचा दिवस उजाडला. दुपारचा एक

वाजला होता' कॉलेजचा जिमखाना हॉल तुडुंब भरला होता. संदीप सभागृहात आला सगळे त्याला ' Best of Luck ' देत होते. काही. दलीत मित्रांशी तो काही मुद्यावर चर्चा करीत होता. सभा दीड वाजता सुरू झाली प्राचार्यांनी या विषयावर आपले विचार मांडले. लवकर आपले विचार मांडून अधिक वेळ न घेता व्यासपीठ स्पर्धकांना खुले करून दिले.

प्रथम चार पाच विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले नंतर नाव पुकारले गेले ' संदीप जोशी ' संपूर्ण सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला. टाळ्यांच्या कडकडाटात व आवेशपूर्ण आरोळ्यात दोन्ही हात उंचावून सर्वांना शांत रहाण्याची विनंती केली. प्राचार्य अन प्राध्यापक मंडळीच्या चेहऱ्यावर उत्सुकता व आनंद ओसंडून वहात होता. संदीपने चार वर्षात कॉलेजला कित्येक ढाली, कप, चषक मिळवून दिले होते.

संदीपने कणखर आजात भाषणास सुरुवात केली. विसाव्या शतकातही दलीत बांधवांची स्थिती कशी आहे. हे त्याने सभागृहास पटवून दिले. त्याचे भाषण संपले प्राचार्यांनी पाठ थोपटली. परिक्षक मंडळी खूष होती. नंतर एका विद्यार्थीनीचे भाषण सुरु झाले.

संदीप आपल्या जागेवर स्थानापन्न झाला. तोफेने आग ओकल्यानंतर जशी स्थिती होते तशी संदीपची स्थिती झाली होती. नंतर भाषणाविषयी शेजारच्या मित्रांनी अभिप्राय विचारले व्यासपिठावरची विद्यार्थीनी सुद्धा उत्तम ओघवत्या शैलीत आपले विचार मांडत होती. संदीप मंत्रमुग्ध झाला, भारावून गेला. त्या विद्यार्थीनीचे भाषण संपले संदीपने शेजारच्या मित्रास विचारले,

" कोण रे ही "

" निशा साठे "

" साठे "

ही साठे जणू स्वतःचा अनुभवच सांगत असावी असे तिच्या भाषणात प्रत्ययास आले. दलीतांच्या स्थितीचे चटके तीने जणू उपभोगले असावे. तिनें भोगलेल्या जीवनास सुंदर शद्बांची, सुंदर उपमांचे, उत्कृष्ट उदाहरणांचे रंगीबेरंगी मोहक फुले गुंफुन भाषण रुपी घरास शोभा आणली.

या परिसंवादात प्रथम क्रमांक ' निशा साठे ' चा आला. दुसरा संदीपचा सर्व मित्र नाराज व होण्याचे सांगत होते " अरे ही तर आता आपल्या कॉलेजात आलीय सुरुवातीला भाव खाऊन जाईल. पण नंतर दुसरा नंबरही टिकवणे मुश्कील असे असेकिती आले न किती गेले " असे म्हणून संदीपला, पराभवाच्या गर्तेतून ओढत होती, दिलासा देत होती.

पण संदीप पराभवाच्या गर्तेत हतला नव्हता त्याचां नजर शोधत होती. निशाचा चेहरा, निदान तिचे अभिनंदन तरी करायला हवे. सायकल स्टँड जवळ निशा १०–१२ मैत्रिणीच्या घोळक्यात दिसत होती त्याचा चेहरा फुलला. त्याने मित्रांची क्षमा मागून धावतच त्या घोळक्याजवळ गेला.

' मिस निशा साठे ' धावा टाकत तो म्हणाला

' अं! होय आलेच! ' ती मैत्रीणीच्या घोळक्यातून वाट काढीत म्हणाली

' थोडं बोलायचं होतं '

ती मैत्रिणी क्षमा मागून त्याच्या बरोबर निघाली.

" अभिनंदन, मिस निशा साठे "

" आभारी आहे "

खरोखरच आपले भाषण अत्युत्कृष्ट होते आपण जणू हे दलीतांचे जीवन उपभोगल्या प्रमाणेच बोलत होता ........ "

" मी सुद्धा दलीतचे आहे. " त्याचे बोलणे मध्येच तोडीत ती म्हणाली " त्यामुळे मला स्वताचे विचार मांडता आले. तुम्ही कॉलेजमध्ये प्रथम क्रमांक मिळवत आलात. मी प्रथम आल्याने आपण निराश झालेले दिसत नाहीत. " " त्यात काय जाहे जयपराजय हा चालायचाच आपल्या मध्ये चांगल्या ध्येयाने झपाटलेले तरूण हवेत. त्यांनी स्वत: ते ध्येय आचरणात आणावयास हवे अशी माझी एक सुप्त इच्छा आहे. तुम्ही मला जोडीदार मिळालात असे मी समजतो तुमच्या भाषणावरून अशी माझी समजूत झाली असो पण खरोखरच तुम्ही पण माझ्या विचाराप्रमाणेच विचार करतात ना?

" इश्श्य, हे काय सांगायास हवे. "

निशा ही एका समाजसेवकाची मुलगी. तिच्या वडीलांनी या करीता. आयुष्य घालवले आहे. असे निशाच्या बोलण्यात आले.

आठ दहा महिने दोघांनी एकत्र सभा गाजवल्या निशाच्या वडलांबरोबर दोघे त्यांच्याबरोबरीने हिरीरीने भाग घेत गजाननराव साठे संदीपच्या विचारांनी प्रभावीत झाले.

दोघांच्या एकत्र फिरण्याचे एक विचाराने नकळत त्याचे मन गुंफले गेले. दोघे एकमेकांच्या प्रेमात पडले. संदीप तर आता एक नावाजलेला वक्ता होता. त्याच्या विचारांना लोकांच्या मनात आदराचे स्थान होते.

निशा थोडी सावळी होती. तरी तिचे डोळे तजेलदार पाणीदार अशा विशिष्ट तेजाने चमकत असत. सावळी असल्याने तिची शोभा थोडी बिघडत होती तिचे सावळेपण सोडले तर ती म्हणजे निर्दोष सौंदर्याची उत्कृष्ट नमुना होती चंद्रावरही डाग आहेतच. आणि त्या डागांनी काही चंद्राचे सौंदर्य कमी होत नसते

तिचे विचार. त्याचे विचार दोघात साम्य दोघांच्या आवडीनिवडी सारख्या होत्या गोविंदशास्त्रीना निशा पसंत होती. आंतरजातीय विवाह स्वतः करू शकले नाहीत तरी आपल्या मुलाने केला तर ते साहजिकच खुष होणार होते प्रश्न राहिला गजाननरावांचा आता ते एका पक्षाचे नेते होते निवडणूका जवळ आल्याने त्यांनी फुरसत नव्हती. प्रचारसभा दौरे यामुळे ते घरी फार क्वचित येत. त्याच्या विचारविनिमयाकरीता दोघे गजाननरावांकडे आलीत गजाननराव थोड्यावेळात येणार असे त्यांच्या सेक्रेटरीने सांगितले.

गजाननराव आले, " काय संदीप, काय काम काढलेस " " काका.... काका.... मी.... अन.... निशा.... मी.... अन.... निशा " अरे एवढा चांगला कसा तू अन इतक्यावेळेस अडखळतोस, तू अन निशा माझ्या प्रचार सभेत बोलू इच्छीता का ? माझ्या बरोबर प्रचार दौऱ्यात येऊ इच्छीता. या खुशाल या तेवढीच माझ्या प्रचार सभेस वेग येईल" " तसे नाही काका. मी अन निशा.... लग्न. लग्न करणार आहोत " " काय. तू अन निशा लग्न करणार ? मी तुमची मैत्री निर्भेळ स्वच्छ मैत्री समजत होतो. तुझ्या सारखा पाजी तरूण मी अजून पाहिला नाही ती एक नेत्याची मुलगी आहे. तिचे लग्न एका दलीत मुलाशीच होईल की तो माझ्या कार्यास हात भार लावेल तू नाही "

संदिप बेहोश बनला. त्याच्यापासून चंद्रकोर एक प्रबळशक्ती ओढून तो विरोध ही करू शकत नव्हता त्याचा यात काय गुन्हा तोही त्यास कळत नव्हता. तो एकटा अगदी एकटा.... एकटाच राहिला होता त्याच्या निशाला एक प्रबळ शक्ती ओढून नेत होती. ! त्याच्यावर अपेक्षाभंगाचा वज्रप्रहार झाला होता.

● ● ●

## खान्देश स्पोर्टस्

सर्व प्रकारच्या क्रीडा
साहित्याचे प्रमुख विक्रेते

☎ ४३७६ स्थापना १९३७

नवीपेठ, जळगाव



आमचेकडे सर्व प्रकारचे क्रीडा साहित्य अत्यंत चांगले आणि माफक भावात मिळते. तसेच व्यायामाचे साहित्यही आम्ही पुरवतो
समक्ष अगर पत्राद्वारे चौकशी करा

## काशिनाथ लॉज
ॲण्ड
## रिफ्रेशमेन्ट हाऊस जळगाव

- परमिट रुम -



शाकाहारी व मांसाहारी जेवणाची
उत्तम व्यवस्था

प्रो. गोपाळ दशरथ महाजन ☎ ४३४२

## मे. विजय मेडीकल्स

☎ दुकान ५२३३
घर ५९३३

डॉ. अनिल आचार्य हॉस्पिटल समोर,

❊ मे. एस. पी. फार्मास्युटीकल्स
फोन ५९३३
२१ माऊली, गुरुकुल कॉलनी

❊ मे. राहुल मेडीकल्स
२, रजनी गंधा, शॉपींग सेंटर;
महेश्वरी बोर्डींग समोर जळगाव

## हिंदू उपहार गृह व भोजनालय

पोलन पेठ, अशोक टॉकीज जवळ,



उत्कृष्ट शाकाहारी जेवणाचे
एकमेव ठिकाण

प्रो.— बच्चू पहिलवान


# कोरकूंचा देश वाघांचा प्रदेश

अभय प्र. उजागरे
एम. कॉम. ज्युनियर

**— व्याघ्र प्रकल्प — मेळघाट — व्याघ्र प्रकल्प —**

अ ] मेळघाटचे निश्चित भौगोलीक स्थान— मेळघाट हा भाग चिखलदरा व धारणी या तालुक्यांचा मिळून झालेला आहे. 'मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती वनमंडळाच्या पूर्व व पश्चिम वन विभागात वसलेला आहे. मेळघाट तालुक्यातील हा सुंदर वन प्रदेश सातपुडा पर्वताच्या दक्षिण भागात मोडतो. अमरावती एकूण जिल्हयात ३६६७ चौ. कि. मी. जंगल आहे. ह्यापैकी नुसत्या मेळघाटात ३०५४ चौ. कि. मी. जंगल आहे. ह्या क्षेत्रात एकूण १३३ वनग्रामे वसलेली आहेत अक्षांश –२१ . १५ अंश उ. व २१ . ४५ अंश उ. तसेच रेखांश– ७६.५७ अंश पू व ७७.३० अंश पू मध्ये येतो. मेळघाटची समुद्र सपाटीपासून जास्तीत जास्त उंची आहे ११७७.७५ मी. वा आरक्ष क्षेत्रातील कमीत कमी उंची वाहे ३८१ मी. येथील वार्षिक कमीत कमी तपमान जास्तीत जास्त— ४२ अंश से. व कमीत कमी— १० अंश से. असते. तसेच येथील सरासरी वार्षिक पर्जन्यमान— १,६०० मि. मी. असते. मेळघाटातील वने मुख्यत: ' दक्षिणेकडील उष्ण प्रदेशातील शुष्क प्रवातीमिश्र वनांच्या ( Southern Tropical Dry Deciduous Forests ) या प्रकारात मोडतात.

ब ] व्याघ्र प्रकल्प व्याप्ती— ( आरक्ष क्षेत्र ) मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे आरक्ष क्षेत्र आहे. अेकुण १,५,७१ ७४ चौ. कि. मी. यात आहे. १) आरक्ष क्षेत्रातील अतिसंरक्षीत भाग ३०१.०५ चौ. कि. मी. २) आरक्ष क्षेत्रातील उर्वरित भाग १२६०.६९ चौ. कि. मी. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचा अवधी होता १९६३–६४ ते १९७८–७९ मेळघाट व्याघ्र प्रकल्प हा भारतातील नऊ व्याघ्र प्रकल्पांपैकी एक आहे. इतर आठ व्याघ्र प्रकल्प आहेत.१] मानस[आसाम] २] सिम्लीपाळ [ओरिसा] ३] पॅलामाऊ [बिहार] ४] कॉरबेट [उत्तर प्रदेश] ५ ] रणथंबोर [राजस्थान] ६] बांदीपुर [कर्नाटक] ७] सुंदरबन [पश्चिम बंगाल] ८] कान्हा [मध्य प्रदेश]

क] व्याघ्र प्रकल्पातील [आरक्ष क्षेत्र] बांधकामे व काही योजना

१] बंधारे— योजने प्रमाणे १६ बंधारे बांधण्याची योजना आहे.

२] डोह— या आरक्ष क्षेत्रात ५१ डोह आहेत.

३] झरे— या शिवाय येथे २८ झरे आहेत

४] टाक्या ११ पाण्याच्या टाक्या आहेत.

५] याशिवाय जंगलात ५९५ कि. मी. वापरण्यायोग्य रस्ते व वाटा आहेत. पुढे यात आवश्यक तो विस्तार करण्यात येईल. याव्यतिरिक्त जनावरांसाठी कृत्रिम क्षार चारणाची ( Salt Licks ) ची सुद्धा सोय करण्यात आली आहे. यामुळे जनावरांना शरीराच्या वाढीसाठी आवश्यक ते क्षार मिळतात खासकरून हरिणांची शिंगे गळण्याचे प्रमाण कमी होते. वन विभागाचे कर्मचारी जंगलात क्षाराचे खडे ठेवतात व जनावरे ते चाटून क्षार मिळवतात. खड्याचा कमी होणार आकार दर्शवतो कि जनावरे क्षार चाटत आहेत किंवा नाहीत. आरक्ष क्षेत्रातील प्रत्येक प्रमुख गावात व प्रमुख ठिकाणी बिनतारी संदेश यंत्र आहेत. तसेच चोरटी लाकुड तोड व जनावरांची बेकायदेशीर हत्या रोखण्यासाठी मोक्याच्या जागी पहाऱ्यासाठी चौक्या बसवण्यात आल्या आहेत. तसेच वाहनांची गस्त पण चालु असते. जंगलात लागणाऱ्या वणव्यांवर लक्ष ठेवण्याठी तसेच जंगली जनावरांच्या हालचालींचे निरक्षण करण्यासाठी ' वॉच टॉवर्स ' उभारण्यात आले आहेत.

ड ] प्रकल्पासाठी एकूण आर्थिक तरतूद

प्रकल्पासाठी एकुण ३६७१६०० रू. खर्च येणार आहे. भारत सरकारने नऊ व्याघ्र प्रकल्पांसाठी चार कोटी रुपयांची तरतूद केली आहे, त्यापैकी ३८ लाख रुपये महाराष्ट्रासाठी ठेवण्यात आले आहेत. ' वर्ल्ड वाइल्ड लाइफ फंड इंटरनॅशनल ' या आंतरराष्ट्रीय संस्थेने भारतीय वाघाला असलेला धोका ओळखुन त्याला वाचवण्यासाठी सुमारे १० लाख डॉलर्स ( ७८ लाख रुपये ) चा निधी उभारण्याची मोहिम हाती घेतली आहे. वरील संस्थेव्यतिरिक्त या प्रकल्पात ' दि बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटी, ' ' दि झुऑलॉजिकल सर्वे ऑफ इंडिया, ' 'दि बोटॅनिकल सर्वे ऑफ इंडिया, ' 'दि इंटरनॅशनल युनियन फॉर कॉन्झर्वेशन ऑफ नेचर ॲंड नॅचरल रिसोर्सेस, ' 'पंजाबराव कृषी विद्यापिठ अकोला ' या संस्था सुद्धा सहभागी झाल्या आहेत.

इ ] प्रकल्पातील निवास व्यवस्था– मेळघाट व्याघ्र प्रकल्पाला भेट देणाऱ्या पर्यटकांची रहाण्याची सोय वनविभागाच्या विश्रामगृहात होते. कोलकाझ रायपुर, तारुबंदा, ढाकणा, कोकटू, धारगड, चोरकुंड रंगुवली, बुटराम, हनु जरिदा, चुनखेरी, माखला या ठिकाणी वनविभागाची विश्रामगृहे आहेत. याशिवाय चिखलदरा, सेमाडोह, हरिसाल इत्यादी ठिकाणी बांधकाम विभाग व इतर विभागांची विश्रामगृहे आहेत. वरील ठिकाणांपैकी सेमाडोह, हरिसाल, कोलकाझ ही गावे अमरावती–बऱ्हाणपुर राजमार्गावर वसलेली आहेत. वनविभागांच्या विश्रामगृहांचे आरक्षण अमरावती येथे होते. कोलकाझ हे प्रकल्पाच्या मध्यावर वसलेले गाव आहे येथे दोन विश्रामगृहे आहेत. नविन विश्रामगृहाला चार कक्ष आहेत. प्रत्येक कक्षाचे भाडे दिवसाला १५ रुपये आहे. एका कक्षात जास्तीत जास्त चार लोक राहू शकतात. माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींनी कोलकाझला भेट दिली होती त्यावेळेस हे विश्रामगृह बांधण्यात आले आहे. ह्यात फ्रिज वेगळा, स्वतंत्र डायनिंग हॉल, प्रत्येक कक्षात ड्रेसींग टेबल, कॉफी इत्यादी सुखसोयी आहेत. ह्या शिवाय लाकडावर उत्कृष्ट कोरीव कामपण आहे. विश्रामगृहा समोर एक ३००-४०० फुट खोल दरी आहे तिथे एक डोह आहे. विश्रामगृहाच्या बाहेर एक सर्चलाइट बसवला आहे. रात्री त्याचा प्रकाश डोहावर टाकून पाणी प्यायला येणारी जनावरे बघता येतात. जुन्या विश्रामगृहास दोन कक्ष आहेत. प्रत्येकाचे भाडे दिवसाला १० रुपये आहे. याशिवाय इथे इंस्पेक्शन हट सुद्धा आहेत. त्यांचे भाडे दिवसाला २ रुपये आहे. इथे जेवणाची कुठल्याही प्रकारची सोय होत नाही. पण जर आपण सामान बरोबर घेऊन गेलो तर खानसामा जेवण तयार करून देतो. प्रकल्पात हा साल येथे किराणा सामान मिळतो. अमरावती किंवा बऱ्हाणपूर येथून बसने मेळघाट वनक्षेत्रात जाता येते. येथून सोनेगाव ( नागपूर ) हा जवळचा विमानतळ २८० कि. मी. अंतरावर आहे. कोलकाझ अमरावती हे अंतर ११४ कि. मी. आहे.

फ ] इतर मनोरंजक माहिती – १) मेळघाट वनक्षेत्रात वनविभागाचे सर्वात जुने विश्रामगृह ' जरिदा ' येथे आहे ते १८६२ मध्ये बांधण्यात आले.
२) सिपना, दोलार, खंडू या येथील प्रमुख नद्या.
३) ' वैराट ' हे येथील सर्वात उंच शिखर त्याची उंची आहे ११७७ मिटर.

४) येथील जंगलात प्रामुख्याने साग, धावडा, तिवस, सालई, करूम, हलदू. मोवई, बांबू, अमलतास, घटबोर, पळस, वड, पिंपळ चिंच, आवळा, डंबर, अंजन इत्यादि झाडे आढळतात.

५] साग हा या जंगलातील खऱ्या अर्थाने वृक्षांचा राजा उंचच उंच मोठमोठ्या पानांची सागाची असंख्य झाडे हे खऱ्या अर्थाने या वनाचे भुषण आहे. दरवर्षी सुमारे ५५ हजार घन मीटर सागाचे लाकुड मेळघाटाच्या वनातुन मिळते. हे लाकुड ज्या ठिकाणी साठवतात त्या ठिकाणाला ' डेपो ' म्हणतात, प्रकल्पात सेमाडोह, धारणी, व परतवाडा येथे डेपो आहेत. तोडलेल्या लाकडाची डेपोतल्या डेपोत ने आण करण्यासाठी प्रत्येक डेपोत ऐक पाळीव हत्ती आहे, सेमाडोह येथील डेपोतील हत्तीचे नाव ' भोलाप्रसाद ' आहे

६] मेळघाटातील कापलेल्या लाकडाची वाहतुक करण्यासाठी रोज सुमारे २०० ट्रक्स व ट्रॅक्टर्स येथे ये जा करतात.

७] सागाशिवाय येथे ' रोशा ' हे गवत विपुल प्रमाणात सापडते, या पासून सुगंधी तेल काढण्यात येते. या तेलास जागतिक बाजारपेठेत मोठी मागणी आहे या तेलाचा भाव साधारण ३०० रूपये किलो आहे.

८] मेळघाट हा व्याघ्र प्रकल्प म्हणजेच वाघांसाठी राखीव प्रदेश आहे. जेव्हा प्रकल्प सुरू झाला तेव्हा इथे २९ वाघ होते सध्या इथे 41 पट्टाईत वाघ आहेत.

८] वर नमूद केलेल्या जनावरांशिवाय येथील जंगलात बिबटा, सोनकुत्रा कोल्हा, सांबर, चौशिंगा निलगाय, लाल माकड, जंगली मांजर, अजगर, भुईरिछ, खवले मांजर, उडणारी खार राखरी खार, जंगली कोंबडी, इत्यादी जनावरे आढळतात.

९] याशिवाय येथील जंगलात ११३ प्रकारचे विविध पक्षी आढळतात त्यात गोल्डन बॅक्ड वुडपेकर, फॅनटेल, रेडस्टार, ट्रीपाय, स्पॉटेड मुनिया, फाल्कन, कॉपरस्मिथ, जंगल मैना, शिखरा इत्यादी शहरात सहसा न आढळणारे पक्षीही आहेत. तसेच एकजातीचा गरूड पण इथे आढळतो.

१०] ' कोरकू ' ही मेळघाटातील मुख्य जमात लोक फार मेहनती, प्रामाणिक, तसेच भोळे भाबडे यांचे मुख्य उपजिवीकेचे साधन म्हणजे वन विभागाने यांना पुरविलेली रोजगार देणारी कामे यात लाकूड कटाई, वहातुक, तसेच नर्सरीत काम, रोश्याच्या गवतापासुन तेल काढणे तसेच गुरे व कोंबड्या पाळणे, मध, डिंक, फळे इत्यादी वस्तु जमा करणे, औषधी वनस्पती जमा करुन त्याची औषधी तयार करुन विकणे ह्यावर त्यांची उपजि-

५] याशिवाय जंगलात ५९५ कि. मी. वापरण्या-योग्य रस्ते व वाटा आहेत. पुढे यात आवश्यक तो विस्तार करण्यात येईल. याव्यतिरिक्त जनावरांसाठी कृत्रिम क्षार चारणाची ( Salt Licks ) ची सुद्धा सोय करण्यात आली आहे. यामुळे जनावरांना शरीराच्या वाढीसाठी आवश्यक ते क्षार मिळतात खासकरुन हरिणांची शिंगे गळण्याचे प्रमाण कमी होते. वन विभागाचे कर्मचारी जंगलात क्षाराचे खडे ठेवतात व जनावरे ते चाटून क्षार मिळवतात. खड्याचा कमी होणार आकार दर्शवतो कि जनावरे क्षार चाटत आहेत किंवा नाहीत. आरक्ष क्षेत्रातील प्रत्येक प्रमुख गावात व प्रमुख ठिकाणी बिनतारी संदेश यंत्र आहेत. तसेच चोरटी लाकुड तोड व जनावरांची बेकायदेशीर हत्या रोखण्यासाठी मोक्याच्या जागी पहाऱ्यासाठी चौक्या बसवण्यात आल्या आहेत. तसेच वाहनांची गस्त पण चालु असते. जंगलात लागणाऱ्या वणव्यांवर लक्ष ठेवण्याठी तसेच जंगली जनावरांच्या हालचालींचे निरक्षण करण्यासाठी ' वॉच टॉवर्स ' उभारण्यात आले आहेत.

ड ] प्रकल्पासाठी एकूण आर्थिक तरतूद

प्रकल्पासाठी एकुण ३६७१६०० रू. खर्च येणार आहे. भारत सरकारने नऊ व्याघ्र प्रकल्पांसाठी चार कोटी रुपयांची तरतूद केली आहे, त्यापैकी ३८ लाख रुपये महाराष्ट्रासाठी ठेवण्यात आले आहेत. ' वर्ल्ड वाइल्ड लाइफ फंड इंटरनॅशनल ' या आंतरराष्ट्रीय संस्थेने भारतीय वाघाला असलेला धोका ओळखुन त्याला वाचवण्यासाठी सुमारे १० लाख डॉलर्स ( ७८ लाख रुपये ) चा निधी उभारण्याची मोहिम हाती घेतली आहे. वरील संस्थेव्यतिरिक्त या प्रक-ल्पात ' दि बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटी, ' ' दि झुऑलॉजिकल सर्वे ऑफ इंडिया, ' 'दि बोटॅनिकल सर्वे ऑफ इंडिया, ' 'दि इंटरनॅशनल युनियन फॉर कॉन्झ-र्वेशन ऑफ नेचर अँड नॅचरल रिसोर्सेस, ' 'पंजाबराव कृषी विद्यापिठ अकोला ' या संस्था सुद्धा सहभागी झाल्या आहेत.

इ ] प्रकल्पातील निवास व्यवस्था– मेळघाट व्याघ्र प्रकल्पाला भेट देणाऱ्या पर्यटकांची रहाण्याची सोय वनविभागाच्या विश्रामगृहात होते. कोलकाझ, रायपुर, तारुबंदा, ढाकणा, कोकटू, धारगड, चोरकुंड, रंगुवली, बुटराम, हनु जरिदा, चुनखेरी, माखला या ठिकाणी वनविभागाची विश्रामगृहे आहेत. याशिवाय चिखलदरा, सेमाडोह, हरिसाल इत्यादी ठिकाणी बांधकाम विभाग व इतर विभागांची विश्रामगृहे आहेत. वरील ठिकाणांपैकी सेमाडोह, हरिसाल, कोलकाझ ही गावे अमरावती–बऱ्हाणपुर राजमार्गावर वसलेली आहेत. वनविभागांच्या विश्रा-मगृहांचे आरक्षण अमरावती येथे होते. कोलकाझ हे प्रकल्पाच्या मध्यावर वसलेले गाव आहे येथे दोन विश्रामगृहे आहेत. नविन विश्रामगृहाला चार कक्ष आहेत. प्रत्येक कक्षाचे भाडे दिवसाला १५ रुपये आहे. एका कक्षात जास्तीत जास्त चार लोक राहू शकतात. माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींनी कोलकाझला भेट दिली होती त्यावेळेस हे विश्रामगृह बांधण्यात आले आहे. हयात फ्रिज वेगळा, स्वतंत्र डायनिंग हॉल, प्रत्येक कक्षात ड्रेसींग टेबल, कॉट इत्यादी सुखसोयी आहेत. हया शिवाय लाकडावर उत्कृष्ट कोरीव कामपण आहे. विश्रामगृहा समोर एक ३००–४०० फुट खोल दरी आहे तिथे एक डोह आहे. विश्रामगृहाच्या बाहेर एक सर्चलाईट बसवला आहे. रात्री त्याचा प्रकाश डोहावर टाकून पाणी प्यायला येणारी जनावरे बघता येतात. जुन्या विश्रामगृहास दोन कक्ष आहेत. प्रत्येकाचे भाडे दिव-साला १० रुपये आहे. याशिवाय इथे इंस्पेक्शन हट सुद्धा आहेत. त्यांचे भाडे दिवसाला ३ रुपये आहे. इथे जेवणाची कुठल्याही प्रकारची सोय होत नाही. पण जर आपण सामान बरोबर घेऊन गेलो तर खानसामा जेवण तयार करून देतो. प्रकल्पात हरि-साल येथे किराणा सामान मिळतो. अमरावती किंवा बऱ्हाणपूर येथून बसने मेळघाट वनक्षेत्रात जाता येते. येथून सोनेगाव ( नागपूर ) हा जवळचा विमानतळ २८० कि. मी. अंतरावर आहे. कोलकाझ अमरावती हे अंतर ११४ कि. मी. आहे.

फ ] इतर मनोरंजक माहिती – १) मेळघाट वनक्षेत्रात वनविभागाचे सर्वात जुने विश्रामगृह ' जरिदा ' येथे आहे ते १८६२ मध्ये बांधण्यात आले.
२) सिपना, दोलार, खंडू या येथील प्रमुख नद्या.
३) ' वैराट ' हे येथील सर्वात उंच शिखर त्याची उंची आहे ११७७ मिटर.

४) येथील जंगलात प्रामुख्याने साग, धावडा, तिवस, सालई, करूम, हलदू, मोवई, बांबू, अमलतास, घट-बोर, पळस, वड, पिंपळ चिंच, आवळा, डंबर, अंजन इत्यादि झाडे आढळतात.

५] साग हा या जंगलातील खऱ्या अर्थाने वृक्षांचा राजा उंचच उंच मोठमोठ्या पानांची सागाची असंख्य झाडे हे खऱ्या अर्थाने या वनाचे भूषण आहे. दरवर्षी सुमारे ५५ हजार घन मीटर सागाचे लाकुड मेळघाटाच्या वनातुन मिळते. हे लाकुड ज्या ठिकाणी साठवतात त्या ठिकाणाला ' डेपो ' म्हणतात, प्रकल्पात सेमाडोह, धारणी, व परतवाडा येथे डेपो आहेत. तोडलेल्या लाकडाची डेपोतल्या डेपोत ने आण करण्यासाठी प्रत्येक डेपोत ऐक पाळीव हत्ती आहे, सेमाडोह येथील डेपोतील हत्तीचे नाव ' भोलाप्रसाद ' आहे

६] मेळघाटातील कापलेल्या लाकडाची वाहतुक करण्यासाठी रोज सुमारे २०० ट्रक्स व ट्रॅक्टर्स येथे ये जा करतात.

७] सागाशिवाय येथे ' रोशा ' हे गवत विपुल प्रमाणात सापडते, या पासून सुगंधी तेल काढण्यात येते. या तेलास जागतिक बाजारपेठेत मोठी मागणी आहे या तेलाचा भाव साधारण ३०० रूपये किलो आहे.

८] मेळघाट हा व्याघ्र प्रकल्प म्हणजेच वाघांसाठी राखीव प्रदेश आहे. जेव्हा प्रकल्प सुरू झाला तेव्हा इथे २९ वाघ होते सध्या इथे ४१ पट्टाईत वाघ आहेत.

८] वर नमूद केलेल्या जनावरांशिवाय येथील जंगलात बिबटा, सोनकुत्रा कोल्हा, सांबर, चोशिंगा निलगाय, लाल माकड, जंगली मांजर, अजगर, भुईरिछ, खवले मांजर, उडणारी खार राखरी खार, जंगली कोंबडी, इत्यादी जनावरे आढळतात.

९] याशिवाय येथील जंगलात ११३ प्रकारचे विविध पक्षी आढळतात त्यात गोल्डन बॅक्ड वुडपेकर, फॅनटेल, रेडस्टार, ट्रीपाय, स्पॉटेड मुनिया, फाल्कन, कॉपरस्मिथ, जंगल मैना, शिखरा इत्यादी शहरात सहसा न आढळणारे पक्षीही आहेत. तसेच एकजातीचा गरुड पण इथे आढळतो.

१०] ' कोरकू ' ही मेळघाटातील मुख्य जमात लोक फार मेहनती, प्रामाणिक, तसेच भोळे भाबडे यांचे मुख्य उपजिवीकेचे साधन म्हणजे वन विभा-गाने यांना पुरविलेली रोजगार देणारी कामे यात लाकूड कटाई, वहातुक, तसेच नर्सरीत काम, रोश्याच्या गवतापासुन तेल काढणे तसेच गुरे व कोंबड्या पाळणे, मध, डिंक, फळे इत्यादी वस्तु जमा करणे, औषधी वनस्पती जमा करुन त्याची औषधी तयार करुन विकणे हयावर त्यांची उपजि-

विका होते व ह्यात ते समाधानी पण आहेत. कंदमुळे, कोंदी, मंडगी हे त्यांचे मुख्य अन्न आपल्या चालीरीती व रिवाज प्रिय असलेले हे लोक हे पण मेळघाटाचे एक भूषण आहे.

तर असे हे मेळघाटचे जंगल वेगवेगळ्या मोसमात आपल्याला याचे वेगवेगळे दर्शन घडेल पावसाळ्यात पहिला पाऊस पडल्यावर जंगलातील पशु पक्षी व आपण सुद्धा जंगलात सर्वदूर पसरलेल्या मातीच्या सुगंधाने वेडावून जावू सागवृक्षांना कोवळी पालवी फुटू लागेल जमिनीतून निरनिराळ्या वनस्पतीचे' अंकुर वर येवू लागतील,पावसाळा संपता संपता जंगलात सगळीकडे हिरवा गालिचा पसरलेला दिसेल हिवाळ्यात भल्या पहाटे सर्व जंगलातील धुके रेंगाळताना दिसेल, झाडांवर गवतावर सगळीकडे दवबिंदुंचा सडा पडलेला दिसेल तर भल्या पहाटे व संध्याकाळी मनुष्य वस्तीतुन शेकोट्यांचा धुर वर आकाशात जाताना दिसेल. संध्याकाळी झपाट्याने जंगलावर पसरू लागलेला अंधार दिसेल. तर उन्हाळ्यात पाने झडून ओकी-बोकी वाटणारी झाडे दिसतील. जिकडे तिकडे सोसाट्याचा वाऱ्याबरोबर उठणारा फुफाटा दिसेल. जमिनीवर पडलेला सुकलेल्या पानांचा सडा दिसेल जंगलात लागलेले वणवे दिसतील, रोड झालेली कुठे काहीतरी खायला मिळतेय का ? म्हणून वणवण भटकणारी जनावरे दिसतील, पाण्यासाठी कासाविस झालेली व डरेच अंतर तोडून पाणवठ्यावर येणारी जनावरेबरे दिसतील, रस्त्यावर धुळीत उमटलेल्या जनावरांच्या पायांच्या सापाच्या सरपटाच्या खुणा दिसतील तर प्रत्येकाने एकदा तरी भेट द्यावी व परत परत इथे यावे असे आहे हे मेळघाटचे जंगल व मेळघाट व्याघ्र प्रकल्प

टिप- या लेखात दिलेली आकडेवारी विषयक ब अ ते फ (१,२,३) मुद्यामध्ये दिलेली माहिती वन विभाग परतवाडा व सेमाडोह रायपुर कोलकास वन विभाग परतवाडा येथील वन विभाग कर्मचारी तसेच वन विभाग परतवाडा यांनी दिलेल्या पुस्तकेच्या सौजन्याने

## " रचनात्मक क्रांतीचा बिजमंत्र "

रचनात्मक संघर्षासाठी तरूणांनी अविरत तयारी करायला हवी जेव्हा वृक्षाची मुळे जमिनीत चांगली खोलवर रूजतात, पसरतात, तेव्हा त्याच्या फांद्या धरतीवर विस्तारतात. रचनात्मक कार्याचा अर्थ असा भूमीत रुजून, मुळे खोलवर पसरवून जीवनरस प्राप्त करणे. मदर रूटसुर्माची ताकद जेवढी, त्याची भूमीत विस्तारण्याची शक्ती जेवढी त्या प्रमाणात वृक्ष मोठा होतो, बहरतो, पसरतो त्या कित्येक घोटीव दगडांच्या चिऱ्यांतून त्या स्नायू चिरीत तो अंकुर आत पसरतो. ही मुळे केसाहून नाजूक, तंतूसमान, मुलायम असतात. किती दुरून, किती गहराईतून ती जीवनरस शोधून आणतात, वृक्षाला पुरवतात वृक्षांच्या मुळांतली त्यांची ताकद ज्या वेळी तुम्ही जाणून घ्याल, रचनात्मक श्रेयाला, साहसाला आलिंगन देता येईल. बीजमंत्र क्रांती ज्यांना करायची आहे, त्यांनी हा जाणून घेतला पाहिजे. "

## ' वळण '

भारंबे एम. डी.
टी. वाय. बीकॉम
( सीआर )

एरवी गावा बाहेरील त्या लक्ष्मी मंदिरापासून तिची पावलं नकळत गती घेत असत, अन् वळणा वरल्या गुलमोहरापाशी आपोआप गोठत. लासट हिरव्या, सात्रल्यांमुळे काहीशा काळवंडलेल्या डोंगर रांगा पाहिल्या, की तिचं मन चोरपावलांनी डोंगर कुशीत विसावलेल्या हिरव्या रानात हळूच शिरायच. कुठं रानफुलांना बिलगत त्याच्या खट्याळ स्वभा-वाच्या आठवणींनी खुदकन् हसायचं !

जून महिन्यात कॉलेज सुरु झालं की, बहरलेल्या गुलमोहरा प्रमाणेच तिच्या मनात स्मृतींचा मोहर फुलू लागे बहरलेल्या पालवीची गच्च लाल गुलाबी फुलांशी स्पर्धा चालायची. एकमेकांना आकर्षित करण्याची ! हळू हळू महिने पुढे सरकत, गुलमोहराचा बहर कमी होई, फुलं झडू लागत. हळूच कुठं डोका-वणारे गुच्छ दिसत.

असेच दिवस जात.... मग नुसताच वठलेला वृक्ष दिसू लागे ! हे सारे ती दरवर्षी नीट हेरत असे. कुणी या गुलमोहराला शाप तर दिला नाही असे तिला वाटे. बाहेर तो फुललेला असला की कॉलेज कसं फुललेलं, नाविन्यानं बहरलेला वाटायचं ! पण हळू हळू तो ओसरणारा आनंद ते मावळणारं वैभव, रेंगाळत राहाणाऱ्या त्याच्या फक्त आठवणी !

आता ती कॉलेजमध्ये नव्हती पण कॉलेजमधल्या त्या गुलमोहराची आठवण झाली की ती उगाचच कावरीबावरी होई. तिच मन कुणा अनामिक भीतीनं शंकित होई. उगाचच अंगावर काटा आणणारा,भेडसा वणारा बोडका आपल्या स्वरुपात मनापुढ थैमान घालू लागे.

आज वळणापाशी गोठलेली पावलं 'कुठ जायचं'? ''कुठे सहयात्री? म्हणून धाक दाखवीत होती. तो अन् ती आज दोन वर्षे याच गावाबाहेरील वळणापाशी भेटत. दोघांच्याही मनात नव्या उर्मी, नवी स्वप्न, एकात्मजीवनाची गुलाबी भुलावण ! तिच्या मनात त्यान दिलेली सारी वचनं, प्रितीच्या आणाशपथा पिंगा घालत.

आज तो नानांना – – त्याच्या वडिलांना सारं सारं सांगणार होता. आम्ही विवाहबद्ध होण्याचं ठरवलंय,संसार थाटायच ठरवलंय! अस सरळ सरळ व्यवहाराच्या निकषावर आपलं गाऱ्हाणं घासून पाहणार होता.

"नाना जोशी" मोठा करारी माणूस ? साऱ्या गावाला त्याचा धाक होता. गावातही माणसं ऊठ सुट नानाना सल्ला विचारायला येत असत. कुणाच्या जमिनीचे सात बाराचे उतारे पहा, कुणाच्या कर्जपाण्याची, कुळाची सोय पहा, कुणास लग्नास अनुरूप स्थळे सुचव असे नानांचे उदयोग चालत. साहजिकच येणाऱ्या जाणाऱ्यांचा राबता मोठा हे सर्व पाहुन नाना उरल्यासुरल्या वेळाच आपल शेतीची कामं पहात. माणूस जसा दिलदार तितकाच शीघ्रकोपी ? प्रामाणिकपणाच्या आड एखादी गोष्ट आली की आकाश- पाताळ एक करणारा माणूस! त्यांना पाहिजे सचोटी, प्रामाणिकपणा, कष्टाळूपणा मग नानांची तबियत खूष ? एखादी गोष्ट नानांच्या मनात भरली तर ती केल्याविना राहाणा नाहीत; पण एखादया गोष्टीला विरोध म्हणजे तो जन्मभर ! मग त्याच मन वळवणं ब्रह्मदेवालाही शक्य नाही.

'नाना –- तुम्हाला आज एक – – म्हणजे आपल ~ तो चाचरत नानांच्या मनाचे वेद घेण्याच्या प्रयत्नात आपल म्हणणं सांगण्याच्या प्रयत्नात.

" काय बन्या, अरे वक्तृत्वात, वाद विवाद अन् नाटकातून बक्षीस् मिळवणारा तू अनं तुझ मत तुला धड मांडता येत नाही. कसा वकील होणार तू ? अरे प्रतिपक्षावर कुरघोडी नाकरायची वकीलानं ? "

नानांचा नेहमी सारखा रोखठोक सवाल. !

'न - -नाही - - तस नाही नानां ! पण - - -

काय बोलाव नि कसं सागांव हे त्याला समजेना चक्रव्यूहात शिरल्यासारख वाटलं त्याला.

'ती - - तिला आज सांगेन म्हटल आहे मी - -

'काय ? छांन ? छान हं ! !,

नानांची थंड प्रतिक्रिया.

'आम्ही कोण तुमचे ?'

नानांनी एका प्रश्नातच सारे प्रश्न बाजूला सारले.

'पण - - नाना दोन वर्षे ती आणि मी - -

'हं सगळ माहीत आहे तुम्हाला? अरे गावची कार्यं करणारा मी अन घरातल्या कार्याची तू आम्हाला सांगावीस. ! ' तंसं नाही -- पण - ? सगळ माहिती आहे., ' - - ती शैला - तुझ्याच कॉलेजातली - - वर्गातली -- हुशार मुलगी. बरं जाळ्यात पकडलंन् तिनं तुला ! ' नाना पण.' त्याची बुलबुल सभांषण ! घडघडते क्षण: आणि नानांच निर्विकार सहन हया अस्वस्थ क्षणांचा तणाव आता त्याला होत नाहीये- !

- - नानांसुध्दा चाणाक्ष. हे सार प्रकरण त्यांना पूर्ण माहित आहे. ते सुध्दा त्या मुलीला दोन वर्ष पाहाताहेत तिचं वागणं बोलणं, सार काही त्यांनी मनात नीट जपून साठवून ठेवलयं ! - - एखादा किमती दागिना जपून ठेवावा तसं.!

ते चिरंजीवांची खरीखुरी परीक्षा घेताहेत. खरंच त्याच तिच्यावर प्रेम आहे का ? की नुसती गध्दे पंच विशी. - वैगरे - वैगरे - - - नाना त्याचा प्रत्येक शब्द निशी बारकाव्याने न्याहाळताहेत.

' तुला माहितच आहे बन्या, तिच्या वडिलांना नको तो दुर्धर आजार-ज्याच नाव सुध्दा उच्चारू नये - - तो कुष्ठरोग झाला आहे. आणि तरी तू मला- तो नुसता आवढा गिळून गप्प ! पुन्हा

गंभीर शांतता. एक एक क्षण युगायुगा सारखा वाटणारा त्याच्या भोवती पिंगा घालणारे यक्षप्रश्न फिदीफिदी हसणारे - - - - त्याच्या मूर्खपणाला ! अहो प्रेमवर, कुठुनतरी कानी पडणारे कुत्सित स्वर!

तो तसाच शांतपणे उभा, निश्चल, कानात प्राण अणून नानांचे एक एक शब्द, ऐकत. !

' नाना मी ठरवलय ! '

निर्विकार आणि ठामपणे आपल मत मांडणारा तो फक्त नानांच्या चेहऱ्यावरचे भाव मनात गेदांयचा प्रयत्न करतोय!

'बन्या - - मला सर्व काही माहीत आहे. कुणा सुपुत्राचा बाप अशी पोरगी आपल्या मुलाच्या गळयात बाधंणार नाही - - पण मी सुद्धा ठरवलंय - - ! नुसतेच प्रश्नचिन्ह? " तुझ लग्न शैलाशीच करून दयायचं - - थाटात माटात अन् धुमधडाक्यात गाव काही का म्हणेना, मला त्याची पर्वा नाही - - पण मी ठरवलंय - - ? "

त्याचे डोळे पाणावलेले - - नकळत नानांच्या पायाला तो स्पर्श करतोय ! पाणावल्या डोळ्यात गतस्मृती तरळत आहेत 'कुठंतरी भांबावलेले मन भविषातील सावलीच्या विसाव्याचा शोध घेऊ पाहतंय !

---

धापावलेला तो - - -

नेहमीच्या उत्सुकतेने त्या वळणावर वाट पाहिली की जी !

दोष एकमेकांच्या डोळ्यात पहाताहेत. - - - - - - तिथ तोच वळणावच्या गुलमोहर पुन्हा बहरलेला मोहरलेल्या स्वप्नांची पालवी घेऊन उभा आहे.

● ● ●

## लक्षणे युवकाची !

' निकोप व सुदृढ प्रकृति, कृतिवृत्तीत बुद्धीची चमक व धडाडी, प्रबल महत्वाकांक्षा, मुद्रेवर खेळकर हास्य सभ्यतेची जाणीव, प्रयत्नशीलता, आणि कष्टाची आवड, बरीचशी आढयता आणि तापटपणा, जुन्या नव्या गोष्टींचा एकदम तिटकारा किंवा वृथा अभिमान केव्हा स्वमताविषयीचा आग्रह व त्याच वेळी समजुतीने घेण्याची तत्परता, कुठे तरी विलक्षण श्रद्धा किंवा कमालीचा अविश्वास इत्यादी गुणांची सरमिसळ वा प्रकर्ष ही सारी युवकांची लक्षणे मानली जातात. स्फूर्ती, जोम आणि उच्छृंखलता ही तरूणाची वैशिष्ठये आहेत.

---

## " मी "

कल्पना कासोदे
११ वी आर्टस्

गाणे मी गात होते,
पण सुर काही मिळतच नव्हता,
कथा मी सांगत होते,
पण शेवट तिचा होतच नव्हता,
जीवन मी जगत होते,
पण रस त्यात वाटतच नव्हता
मार्ग मी चालत होते
पण खरा रस्ता सापडतच नव्हता,
प्रेम मी करीत होते,
पण साद त्याला मिळतच नव्हती,
स्वतःकडे मी पहात होते,
पण माझ्यात मी गवसतच नव्हते.

# फक्त ऐवढच हवे !

राजेंद्र चौधरी
एस. वाय. बी. एस. सी.

ताज्या डोलणाऱ्या कोवळ्या गुलाब फुलाप्रमाणे;
हे जीवन गुलाबी हवे ।

उडल्या बगळ्यांच्या माळा शुभ्र रंगासारखे,
स्वच्छ स्वभाव हवे ।

नसावा सतत त्याच त्याच गोष्टींचा पुनरुच्चार
बाईट त्यांचे वाटावयास हवे ।

नवीन दिशा, नवे विचार, नव्या युगाच्या,
नव्या गोष्टींशी, निगडीत हवे ।

देशाकरिता जगेन, देशाकरता मरेन,
हेच व्रत घ्यायला हवे ।

लोभ स्वार्थ यांचा त्याग करुन
आपले काम करायला हवे ।

हिंमत धरुन; कष्ट करुन
मानसन्मान मिळवायला हवे ।

तन -, मन - धन आपले सारे
देशकार्यास वाहून घ्यावयास हवे ।

राग, द्वेष, मत्सर अशा प्रकृतींना,
दूर ढकलून द्यावयास हवे ।

* * *

# – अतिरेकी –

चंद्रभान महाले
एम्. ए. (अर्थ)

एकच वाट
अनेक शकल्यांची
एकाच वृक्षावर
किलबिलणारे पक्षी
झाडांनीच मुळी उच्छाद मांडलेला
आता त्यांना
घरटं आणि झाड विभागून पाहीजे
कावळ्याचा एक डोळा
तिथ इंद्रपद भुषवतोय
झाड - - - -
पाखराची पर्वा न करता बहरत
निष्पर्ण सावली देत
पक्षाची भावना
पानांसारखी झटकून टाकत.
आताशा त्यान
कावळे, गिधाडे
यांना हाताशी धरलय.
पक्षांनाही कळून चुकलय,
कि - - - -
आपल्याच गावात
आपणच अतिरेकी झालोत.



दादर येथे, राष्ट्रभाषा सभा, पुणे यांनी आयोजित केलेल्या हिंदी एकांकिकेत द्वितिय क्रमांक आणि 'संघवी ढाल' एकांकितेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळविणाऱ्या 'अभिशत' या एकांकिकेतील मानकरी



श्री. फारुक शेख अब्दुल्ला – पुणे विद्यापिठाच्या हॉकी संघात निवड



आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत खो–खो चा विजयी संघ



श्री. अतुल तडवी – पुणे विद्यापीठाच्या फुटबॉल संघात निवड व आय्. जी. एस्.



आंतरमहाविद्यालयीन बॉस्केट बॉल – सतत तीन वर्षे विजयी संघ



श्री. किशोर भोळे – कुस्ती १०० किलो गटात प्रथम



आंतरमहाविद्यालयीन टेबलटेनीस मुलींचा विजयी संघ



कु. सुरेखा पाटील–आंतरमहाविद्यालयीन स्प
८०० मीटर धावणे प्रथम क्रमांक



आंतरमहाविद्यालयीन बुद्धिबळ विजयी संघ



श्री. मधुकर पाटील–आंतरमहाविद्यालयीन वेटलि
स्पर्धेत ५२ किलोगटात सर्वप्रथम
जळगाव विभागीय खेळाडू (रनर)



वजन उचलण्याचा संघ–
सतत पाच वर्षे चॅम्पियनशिप मिळविणारे



श्री. किरण खडके–वजन उचलण्याच्या स्पर्धेत स



आंतरमहाविद्यालयीन खो–खो मुलींचा विजयी संघ



श्री. भालचंद्र चौधरी–आंतरमहाविद्यालयीन
वेटलिफ्टिंग स्पर्धेत ७५ किलोगटात सर्वप्रथम



भुसावळ महाविद्यालय येथे आयोजित सुगम संगीत स्पर्धेत नितिन केंकरे यांना द्वितीय क्रमांकाचे वैयक्तिक पारितोषिक मिळाले आणि कु. साधना पटवर्धन यांना उत्तेजनार्थ बक्षिस मिळाले.

निरनिराळ्या संगीत स्पर्धांत भाग घेणाऱ्या कलावंतात सर्वश्री राम देशपांडे, जयंत बोबडे, नितिन केंकरे, नितिन कुलकर्णी, शिरीष बाविस्कर, रमेश भोळे गिरीश अपस्तंभ, धनंजय राजहंस, संजय राणे, कु. साधना पटवर्धन, कु. संजिवनी पाठक कु. राजश्री देशमुख, कु. विनया साठे, कु. संजीवनी गायधनी कु लक्ष्मी कुलकर्णी, कु. कस्तुरी दातार आणि कु. प्रतिभा जोशी यांचा समावेश आहे.

यंदाच्या वर्षी वेगवेगळ्या एकांकिका स्पर्धांसाठी हिंदीत ' अभिशप्त ', आणि मराठीत ' बाळू जोशीला नक्की काय वाटतं ?' अशा दोन एकांकिका बसविण्यात आल्या.

महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे यांच्या विद्यमाने दादर ( मुंबई ) येथे आयोजित झालेल्या राज्य पातळीवरील एकांकिका स्पर्धेत आपल्या संघाने सादर केलेल्या डॉ. तेजपाल चौधरी लिखित ' अभिशप्त ' या एकांकिकेस द्वितीय क्रमांकाचे सांघिक पारितोषिक आणि सर्वोत्तम स्क्रिप्ट चे पारितोषिक मिळाले. तसेच राजेन्द्र मनगुटे यांना अभिनव नैपुण्याचे प्रशस्तिपत्र ही मिळाले.

जळगाव येथे आयोजित ' संघवी ढाल ' हिंदी एकांकिका स्पर्धेत ' अभिशप्त ' या एकांकिकेच्या संघाने प्रथम क्रमांकाचे सांघिक पारितोषिक, संघवी ढाल पटकावले. या स्पर्धेत राजेन्द्र मनगुटे यांनी पुरूष गटातील अभिनयाचे द्वितीय पारितोषिक तसेच चंद्रशेखर त्रिपाठी यांना सर्वोत्तम दिग्दर्शनाचे पारितोषिक ( रौप्य पदक ) ही मिळाले.

रवीन्द्र जोशी लिखित ' बाळू जोशीला नक्की काय वाटतं ' ? या एकांकिकेच्या संघाने यंदाच्या वर्षी वेगवेगळ्या स्पर्धात एकूण पंधराशे रूपयांची रोख पारितोषिके, ढाल तसेच अनेक वैयक्तिक बक्षिसे जिंकून यशाचे उच्चांक प्रस्थापित केले. बक्षिसांची संक्षिप्त माहिती पुढील प्रमाणे आहे.

१) स्वप्नरंजन नाट्य संस्था दोंडाईचे-

१] सांघिक द्वितीय पारितोषिक २] सर्वोत्तम दिग्दर्शनाचे पारितोषिक ३] अभिनयाचे द्वितीय पारितोषिक [ कु. संगीता सोमण ]

२) जैन करंडक लघुनाट्य स्पर्धा जळगाव-

१] सांघिक प्रथम पारितोषिक - जैन करंडक
२] अभिनय- प्रथम पारितोषिक- कु. संगीता सोमण
३] अभिनय-उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्र - संजय कथुरिया
४] सर्वोत्तम दिग्दर्शन - रौप्य पदक – धनंजय राजहंस.

३) ' संवाद ' - धुळे

१] सांघिक द्वितीय पारितोषिक व ढाल
२] दिग्दर्शनाचे द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक.

४) किशोर मंडळ – मालेगाव

१[ सांघिक प्रथम पारितोषिक २] सर्वोत्तम दिग्दर्शनाचे पारितोषिक

५] लोकहितवादी मंडळ, जामनेर

१] सांघिक प्रथम पारितोषिक व ढाल. २]सर्वोत्तम दिग्दर्शनाचे पारितोषिक. ३] अभिनयाचे द्वितीय क्रमांकाचे पारितोषिल कु- रेवती वझे.

' अभिशप्त ' आणि बाळू जोशीला नक्की काय वाटतं ? या एकांकिकामधील कलावंत पुढील प्रमाणे–

जिमखान्याचा अवाढव्य पसारा सावरणे कठीण. प्राचार्य नेमाडे, उपप्राचार्य महाजन, सर्व खेळाडू, सर्व जिमखाना सेक्रेटरी व विद्यार्थी आणि सहकारी प्राध्यापक यांनी केलेल्या सहकार्याबद्दल धन्यवाद.

| | |
|---|---|
| **किरण जावळे** | **प्रा. नारायण खडके** |
| जनरल सेक्रेटरी, जिमखाना | क्रिडा–प्रमुख |

---

# कला मंडळ
## वार्षिक अहवाल १९८४–८५

---

कार्यकारिणी–

| | |
|---|---|
| डॉ. तेजपाल चौधरी. | |
| प्रा. चारुदत्त गोखले. | चेअरमन |
| प्रा. पी. एल. कोल्हे. | सभासद |
| प्रा. आर. बी. पाटील. | " |
| प्रा. पी. व्ही. वाणी. | " |
| प्रा' सौ. पिंपरकर. | " |
| प्रा. ए. जे. चौधरी. | " |
| प्रा. एम. एस. झोपे. | " |
| प्रा. सौ. एल. एस. पाटील. | " |
| श्री. दिलीप शिरसाट | " |
| | विद्यार्थी प्रतिनिधी |

१९८४–८५ या वर्षाचे कला-मंडळाचे उद्‌घाटन अपर पोलीस अधिक्षक श्रीयुत मधु शिंदे यांच्या शुभहस्ते झाले. त्याच वेळी 'एक प्रश्न पाच उत्तरे' असा एक अभिनव आणि बहारदार कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमात श्रीयुत मधु शिंदे, प्रा. म. मो. केळकर, प्रा. राजा महाजन, श्रीयुत भैय्या उपासनी आणि श्रीयुत लियाकतअली सैय्यद यांनी काही नियोजित प्रश्नांची उत्तरे अतिशय विनोदी व खुशखुशीत शैलीत दिली.

ऑगस्ट ८४ मध्ये पुणे, येथे 'पुरुषोत्तम करंडक' -एकांकिका स्पर्धेसाठी आपल्या महाविद्यालयाची 'प्रतिबिंब' ही एकांकिका सादर करण्यात आली. श्री. रमेश भोळे दिग्दर्शित या एकांकिकेस पुणेकर रसिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीने धरणगाव येथे झालेल्या सुगम संगीत स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाच्या संघाला प्रथम क्रमांकाची सांघिक ढाल मिळाली. तसेच श्री. राम देशपांडे यांना प्रथम क्रमांकाचे वैयक्तिक पारितोषिक मिळाले. आणि कु. लक्ष्मी कुलकर्णी यांना उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्र मिळाले.

राष्ट्रभाषा सभा पुणे यांच्या' विद्यमाने धुळे येथे झालेल्या हिंदी-'पद-गीत-गायन स्पर्धेत श्री. राम देशपांडे यांना प्रथम आणि कु. साधना पटवर्धन यांना तृतीय क्रमांकाचे वैयक्तिक पारितोषिक मिळाले. या स्पर्धेत श्री. नितिन कॆंकरे यांना उत्तेजनार्थ बक्षिस मिळाले.

'भावसरगम' या संस्थेच्या वतीने नूतन महाविद्यालय, जळगाव येथे आयोजित सुगम संगीत स्पर्धेत प्रथम क्रमांकाची सांघिक ढाल आपल्या संघास मिळाली. या स्पर्धेत कु. कस्तुरी दातार यांना प्रथम क्रमांकाचे वैयक्तिक पारितोषिक आणि श्री. नितिन कॆंकरे यांना उत्तेजनार्थ बक्षिस मिळाले.

भुसावळ महाविद्यालय येथे आयोजित सुगम संगीत स्पर्धेत नितिन कॆंकरे यांना द्वितीय क्रमांकाचे वैयक्तिक पारितोषिक मिळाले आणि कु. साधना पटवर्धन यांना उत्तेजनार्थ बक्षिस मिळाले.

निरनिराळ्या संगीत स्पर्धेत भाग घेणाऱ्या कलावंतात सर्वश्री राम देशपांडे, जयंत बोबडे, नितिन कॆंकरे, नितिन कुलकर्णी, शिरीष बाविस्कर, रमेश भोळे गिरीश अपस्तंभ, धनंजय राजहंस, संजय राणे, कु. साधना पटवर्धन, कु. संजिवनी पाठक, कु. राजश्री देशमुख, कु. विनया साठे, कु. संजीवनी गायधनी कु. लक्ष्मी कुलकर्णी, कु. कस्तुरी दातार आणि कु. प्रतिभा जोशी यांचा समावेश आहे.

यंदाच्या वर्षी वेगवेगळ्या एकांकिका स्पर्धांसाठी हिंदीत 'अभिशप्त', आणि मराठीत 'बाळू जोशीला नक्की काय वाटतं ?' अशा दोन एकांकिका बसविण्यात आल्या.

महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे यांच्या विद्यमाने दादर ( मुंबई ) येथे आयोजित झालेल्या राज्य पातळीवरील एकांकिका स्पर्धेत आपल्या संघाने सादर केलेल्या डॉ. तेजपाल चौधरी लिखित 'अभिशप्त' या एकांकिकेस द्वितीय क्रमांकाचे सांघिक पारितोषिक आणि सर्वोत्तम स्क्रिप्ट चे पारितोषिक मिळाले. तसेच राजेन्द्र मनसुटे यांना अभिनव नैपुण्याचे प्रशस्तिपत्र ही मिळाले.

जळगाव येथे आयोजित 'संघवी ढाल' हिंदी एकांकिका स्पर्धेत 'अभिशप्त' या एकांकिकेच्या संघाने प्रथम क्रमांकाचे सांघिक पारितोषिक, संघवी ढाल पटकावले. या स्पर्धेत राजेन्द्र मनसुटे यांनी पुरुष गटातील अभिनयाचे द्वितीय पारितोषिक तसेच चंद्रशेखर त्रिपाठी यांना सर्वोत्तम दिग्दर्शनाचे पारितोषिक ( रौप्य पदक ) ही मिळाले.

रवीन्द्र जोशी लिखित 'बाळू जोशीला नक्की काय वाटतं'? या एकांकिकेच्या संघाने यंदाच्या वर्षी वेगवेगळ्या स्पर्धात एकूण पंधराशे रूपयांची रोख पारितोषिके, ढाल तसेच अनेक वैयक्तिक बक्षिसे जिंकून यशाचे उच्चांक प्रस्थापित केले. बक्षिसांची संक्षिप्त माहिती पुढील प्रमाणे आहे.

१) स्वप्नरंजन नाट्य संस्था दोंडाईचे-

१] सांघिक द्वितीय पारितोषिक २] सर्वोत्तम दिग्दर्शनाचे पारितोषिक ३] अभिनयाचे द्वितीय पारितोषिक [ कु. संगीता सोमण ]

२) जैन करंडक लघुनाट्य स्पर्धा जळगाव-

१] सांघिक प्रथम पारितोषिक - जैन करंडक
२] अभिनय- प्रथम पारितोषिक- कु. संगीता सोमण
३] अभिनय-उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्र - संजय कथुरिया
४] सर्वोत्तम दिग्दर्शन - रौप्य पदक - धनंजय राजहंस.

३) 'संवाद' - धुळे

१] सांघिक द्वितीय पारितोषिक व ढाल
२] दिग्दर्शनाचे द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक.

४) किशोर मंडळ — मालेगाव

१[ सांघिक प्रथम पारितोषिक २] सर्वोत्तम दिग्दर्शनाचे पारितोषिक

५] लोकहितवादी मंडळ, जामनेर

१] सांघिक प्रथम पारितोषिक व ढाल. २]सर्वोत्तम दिग्दर्शनाचे पारितोषिक. ३] अभिनयाचे द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक कु- रेवती वझे.

'अभिशप्त' आणि बाळू जोशीला नक्की काय वाटतं ? या एकांकिकामधील कलावंत पुढील प्रमाणे–

सर्वश्री राजेन्द्र मनसुटे, चन्द्रशेखर त्रिपाठी राजेश शर्मा, संजय कथुरिया, संजय भोलाणे शशिकांत गुप्ते, संदीप भिसे, शफी पटेल, धनंजय राजहंस, किशोर शिंपी सुनिल सोनवणे, हिरालाल सोनवणे, कु. संगीता सोमण, कु. रेवती वझे, कु. आरती वझे, कु. देवयानी कुळकर्णी, कु. स्मिता उपासनी, आणि कु. मीना पटेल.

ध्वनि संयोजन- दीपक चांदोरकर आणि विनय नेवे

दिग्दर्शन - चन्द्रशेखर त्रिपाठी, धनंजय राजहंस

निर्मिती प्रमुख - प्रा. चारूदत्त गोखले व तेजपाल चौधरी

या शिवाय मुंबई येथील 'युवक बिरादरी' यांच्या वतीने आयोजित केलेल्या सुगम संगीत स्पर्धेत श्री. राम देशपांडे यांना प्रशस्तिपत्र मिळाले. तसेच बी. जे. मेडीकल कॉलेज, पुणे यांच्या विद्यमाने घेतलेल्या संगीत स्पर्धेत राम देशपांडे आणि श्री.नितीन केंकरे दोघांना प्रशस्तिपत्र मिळाले. श्री.राजेंद्र मनसुटे यांनी 'खान्देश प्रतिष्ठान' यांच्या वतीने आयोजित एकपात्री प्रयोग स्पर्धेत तृतीय क्रमांकाचे बक्षिस आणि नूतन महाविद्यालयातर्फे उत्तम नृत्य दिग्दर्शनाचे पारितोषिक ही जिंकले.

पुणे विद्यापीठ युवक महोत्सवासाठी चोपडा महाविद्यालय येथे घेण्यात आलेल्या जिल्हा पातळी वरील गट स्पर्धात आपल्या महाविद्यालयास एकांकिका स्पर्धेत प्रथम, पोवाडा मध्ये द्वितीय आणि समूह गीत स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळाला

सर्व कलावंतांचे अभिनंदन. आणि जून १९८५ मध्ये पुणे येथे होणाऱ्या पुणे विद्यापीठ युवक महोत्सवात आपल्या कलावंत स्पर्धकांनी उज्ज्वल यशाची कमान वाढती ठेवावी ही शुभेच्छा.

तेजपाल चौधरी
चेअरमन
कला मंडळ, मु. जे. महाद्यालय, जळगाव

• • •

# विज्ञान मेळावा अहवाल

दि. १९ आणि २० जानेवारी १९८५ रोजी जळगाव शहरातील मुळजी जेठा महाविद्यालयाच्या प्रांगणात एक अत्यंत प्रेक्षणीय आणि उपयुक्त असे विज्ञान संमलेन आणि विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनाची आणि संमेलनाच्या आयोजनाची जबाबदारी - आकाशवाणी मुंबई आकाशवाणी जळगाव आणि मुळजी जेठा महाविद्यालय जळगाव यांनी संयुक्तपणे स्वीकारलीहोती. ह्या अत्यंत वैशिठयपूर्ण आणि नाविण्यपूर्ण असलेल्या विज्ञान संमेलनास आणि प्रदर्शनास हजारो नागरिकांनी आणि विद्यार्थ्यांनी भेट देऊन अत्यंत उत्स्फूर्त असा प्रतिसाद दिला. आणि आयोजनाबद्दल जिल्हयात आणि जिल्हयाबाहेरही विविध घटकांकडून समाधान व्यक्त करण्यात आले.

समारंभाची सुरुवात संमेलनाच्या औपचारिक उद्घाटनाने झाली. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून विख्यात वैज्ञानिक डॉ. जयंत नारळीकर यांची उपस्थिती लाभली होती. कार्यक्रमाचा प्रारंभ खान्देश गीताने झाला. मुळजी जेठा महाविद्यालयीन मराठी विभाग प्रमुख आणि खान्देशातील नामवंत कवी प्रा. राजा महाजन रचित हे गीत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सादर केले. यानंतर समारंभास उचित ठरेल असे विज्ञानाची महती गाणारे डॉ. उल्हास कडूसकर लिखीत विज्ञान गीतही त्यांनी सादर केले. जळगाव आकाशवाणी केंद्राचे केंद्र निदेशक श्री. श्याम शेंडे यांनी केलेल्या प्रास्ताविका नंतर विज्ञान संमेलनाचे उद्घाटन जळगावातील ख्यातनाम उद्योगपती श्रीमान भंवरलालजी जैन यांचे शुभहस्ते तर विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे विद्यमान अध्यक्ष डॉ. अण्णासाहेब बेंडाळे यांचे शुभहस्ते झाले.

या प्रसंगी मुळजी जेठा महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. द. स. नेमाडे यांनी सर्व प्रमुख उपस्थितांचा परिचय करून दिला. आणि विज्ञान संमेलनाच्या आयोजनाची भूमिका स्पष्ट केली.

विज्ञान संमेलनाचे उद्घाटन प्रसंगी आपले मनोगत व्यक्त करतांना उद्घाटक श्रीमान भंवरलालजी जैन यांनी विज्ञान प्रगती आणि विकास यांचा थोडासा आढावा घेऊन विज्ञान विषयक प्रगतीच्या परिणामांच्या भवितव्याबद्दल त्यांना जाणवणाऱ्या काही समस्या उपस्थितांपुढे प्रकट केल्या. डॉ. अण्णसाहेब बेंडाळे यांनीही विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन करतांना उपस्थितांना मार्गदर्शनपर असे आपले विचार ऐकविले.

प्रमुख पाहुणे या नात्याने 'खगोल शास्त्रातून मिळणारा वैज्ञानिक दृष्टीकोन' या विषयावर आपले विचार मांडतांना डॉ. जयंत नारळीकर म्हणाले—

आपल्या सभोवताली पसरलेल्या विश्वात घडणारे अनेक चमत्कार हे अताकलनीय नसून मानवाच्या वाढत्या वैज्ञानिक प्रगतीच्या कक्षेतील आहेत. प्रथमदर्शी विविध वाटणाऱ्या घटकांचे आकलन नंतर विज्ञानाच्या चौकटीत करता येते असे खगोलशास्त्रांचे उदाहरणावरून त्यांनी स्पष्ट केले आणि श्रोत्यांची मने जिंकली.

यानंतर महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री. दि. ह. महाजन यांनी उपस्थितांचे आभार मानले. आणि या दिवसाच्या पहिल्या सत्राची सांगता झाली.

याच दिवशी दुपारी ३ वाजता डॉ. जयंत नारळीकर यांचा "विद्यार्थ्यांशी-गप्पा" या स्वरुपाचा एका अनौपचारिक कार्यक्रम ठेवण्यात आला होता विद्यार्थ्यांनी विज्ञान विषयावर विचारलेल्या निवडक प्रश्नांची समर्थ उत्तरे डॉ. जयंत नारळीकर यांनी दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंकलन प्रा. श्री. मु. म. थत्ते यांनी केले. कार्यक्रम अतिशय रंगदार आणि उद्बोधक असा झाला.

• • •

# भूगोल विभाग

भूगोल विभागातील प्राध्यापकांनी खालील प्रमाणे महत्वाच्या चर्चासत्रात आपले शोध निबंध सादर केलेले आहेत.

१) " जळगाव जिल्हा भूगोल " आयोजित चर्चासत्रात 'डम्पी लेव्हल' या उपकरणाची माहिती डॉ. सी. डी. गुप्ते ( पुणे विद्यापीठ भूगोल विभाग ) यानी दिली.

२) दि.३० सप्टेंबर १९८४ रोजी. एस्. एन. डी. टी महाविद्यालय पुणे येथे 'महाराष्ट्र भूगोल शास्त्र' परिषदने आयोजित केलेल्या चर्चा सत्रास खालील प्राध्यापकांनी आपले शोध निंबंध सादर केले.

अ) प्रा. स. दि. सिरसीकर व प्रा. ( मिसेस् ) एस एस. पिंपरकर यांनी जळगाव जिल्हयातील अधिकारश्रेणी व वर्धन केन्द्रे " हा शोध निबंध सादर केला.

ब) प्रा. एस. आर. पाटील व प्रा. बी. एम. पाटील यांनी " उसांची हमी किमंत व उस लागवड क्षेत्र- प्रातिनिधिक खेडे ( कासोदा ) हा शोध निबंध सादर केला.

क)प्रा. अे. पी. चौधरी व प्रा. आर. आर. भालसिंग यांनी 'सामाजिक वनीकरणात औषधी वनस्पतीचे महत्व " ( भारताचे संदर्भात ) हा शोध निबंध सादर केला.

३) दि. ७ डिसेंबर ते ९ डिसेंबर १९८४ या काळात पुणे विद्यापीठात इतिहास विभागातर्फे आयोजित "डेव्हलपमेंट अॅन्ड रुरल अॅग्रोबेसड इंड-स्ट्रीज इन कोकण फ्रॉम १९५१ ते १९८१" चर्चा सत्रात प्रा. अे. एस. भोळे यांनी शोध निबंध सादर केला.

४) १० जानेवारी १९८५ ते १२ जानेवारी १९८५ या काळात Indian Geographer's meet The sixth Annual conference, co sponso-red' by Shri Venkateshwara Univerity-Tirupati येथे आयोजित चर्चा सत्रास प्रा. अेस. आर. पाटील, प्रा. आर. आर. भालसिंग प्रा. अे. एस. भोळे. प्रा. स. दि. सिरसीकर, प्रा. अे. पी. चौधरी प्रा. बी. एम पाटील, प्रा. ( मिसेस ) एस् एस्. पिंपरकर उपस्थित होते.

५) दि. ८ जानेवारी१९८५रोजी राष्ट्रीय सेवा योजने तर्फे आंतर विद्यापीठ स्तरीय शिबिर मु. जे. महाविद्यालय जळगांव व पुणेविद्यापीठ यांच्या संयुक्त वतीने आयोजित पाल येथील शिबरात प्रा. स. दि. सिरसीकर (भूगोल विभाग प्रमुख) यांचे अंटार्टिका तिसरी मोहीम " या विषयावर व्याख्यान झाले.

६) दि. १० मार्च १९८५ रोजी 'महाराष्ट्र भूगोल शास्त्र परिषद' पुणे तर्फे आयोजित चर्चा सत्रात 'एकत्रित ग्रामीण विकासात भूगोल शास्त्राचे महत्व " हा शोध निबंध प्रा. सिरसीकर यानी सादर केला. या चर्चा सत्रास प्रा. अे. पी चौधरी प्रा. अे. एस. भोळे. प्रा, ( मिसेस ) एस. एस. पिंपरकर उपस्थित होते.

७) मु. जे. महाविद्यालय जळगांव तर्फे आयो-जित 'प्रौढ शिक्षण योजना' तर्फे 'हरिविठ्ठल नगर' ( दत्तक खेडे ) येथे संघटक प्रशिक्षण शिबरात प्रा. अे. एस. भोळे यानी " राष्ट्रीय प्रौढ शिक्षण योजनेत संघटनाची भूमिका " या संबंधी संघटकाना मार्गदर्शन केले.

८) प्रा. अे. अेस. भोळे यांनी पुणे विद्यापि-ठाला सादर केलल्या konkan A study in Rural settlement Geophiphy " या ph. D. च्या प्रबंधाला पुणे विद्यापीठाने मान्यता दिलेली आहे. त्यांनी डॉ. अेस. बी. सावंत यांच्या मार्ग-दर्शनाखाली प्रबंध सादर केला होता. त्यांना पुणे विद्यापीठाने Ph. D, पदवी प्रदान केली आहे त्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

● ● ●

---

# युवती सभा अहवाल
## १९८४-८५

---

महाविद्यालयांतील विद्यार्थिनींच्या सुप्त कलागु-णांचा विकास व्हावाया हेतूने नवीन कार्यकारिणी तर्के विविध ज्ञानवर्द्धक आणि मनोरंजक कार्यक्रम आयोजित करण्यांत आले. यासर्व कार्यक्रमांना विद्या-र्थिनींनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला.

उदघाटन समारंभ— यावर्षी युवती सभेचे उद्घाटन दि. २४।८।८४ रोजी पुणे विद्यापीठाच्या प्रौढ शिक्षण प्रकल्प अधिकारी सुश्री लता चौधरी यांच्या शुभहस्ते झाले. कार्यक्रम यशस्वीपणे आयोजित करण्यात आले.

व्याख्याने—दि. २२।८।८४रोजी 'युवतीसभेची आवश्यकता आणि उद्दिष्टये' या विषयावर प्राचार्य डी. एस्. नेमाडे यांचे मार्गदर्शनपर भाषण झाले.

१५।१२।८४ रोजी 'उपप्राचार्य दि. ह. महाजन यांच्या अध्यक्षतेखाली कुष्ठरोग आणि सामाजिक स्वीकृति' या विषयावर सौ. विद्याताई केसकर ( पुणे ) यांचे अत्यंत भावपूर्ण आणि विचार प्रधान असे भाषण झाले,

सुगम- संगीत स्पर्धा— संगीतकलेला प्रोत्साहन आणि मनोरंजन याहेतुने दि ८।९।८४ रोजी संगीत स्पर्धा आयोजित करण्यात आली. स्पर्धेत एकूण २२ विद्यार्थीनींनी भाग घेतला होता. त्यांत खालील विद्यार्थिनीनी बक्षिसे मिळवली.

प्रथम क्रमांक – कु. शुभांगी रावेरकर
द्वितीय क्रमांक – कु. प्रतिमा जोशी
तृतीय क्रमांक – कु. अनिता उजागरे
चतुर्थ क्रमांक – कु. वैशाली सराफ
उत्तेजनार्थ १ ) कु. साधना पटवर्धन
२ ) कु. लक्ष्मी कुलकर्णी

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून सौ.सुवर्णा दातार सौ. हेमलता कोलगीकर आणि प्रा. सुरेखा छापेकर ह्यांना नियुक्त करण्यात आले होते.

रांगोळी स्पर्धा आणि हस्तकला प्रदर्शन— महाविद्यालयांच्या वार्षिक स्नेह संम्मेलनाच्या निमित्ताने वरील स्पर्धा उस्फूर्तपणे आयोजित करण्यात आली-याप्रसंगी विद्यार्थिनींनी काढलेल्या विविधरंगी कलाकृतीनीं आणि हस्तकलाकौशल्य प्रकट करणाऱ्या वस्तूंनी सर्वांना आकर्षित केले.

मुक्तनाटय—स्त्री-जीवनांतील विविध समस्यांचे मार्मिकदर्शन घडविण्याच्या उद्देश्याने युवतीसभेतर्फे ज्योति म्हापसेकर लिखित " मुलगी झाली हो " ह्या गाजलेल्या मुक्तनाटयाचा प्रयोग दि. ६।१।८५ रोजी भोरगांव ग्रामपंचायतीत सादर करण्यात आला. उपस्थितजन – समुदायाने या नाटयप्रयोगाची मुक्त-कंठाने प्रशंसा केली व या परिषदेतर्फे 'युवती-सभेला १९५१ रू. रोखबक्षीस देण्यात आले. युवती सभा देणगी याबद्दल पाडळसा परिषदेची अत्यंत आभारी आहे. त्यानंतर जळगांव येथील भगिनी मंडळ. अभिजात कला मंडळ व इतर असे यामुक्तनाटचाचे एकूण सहा प्रयोग झाले. नशीराबाद येथील आंगण-वाडी केन्द्रात ही हा प्रयोग करण्यांत आला. या

संस्थेच्या प्रमुख निर्देशिका प्रा. लता पाटणकर ह्यांनी विद्यार्थिनीचा गौरव करून युवती - सभेला भगवान नटेश्वराची सुंदर प्रतिमा भेट म्हणून दिली. या मुक्तनाट्यास सर्वत्र उत्तम प्रतिसाद मिळाला उत्कृष्ट कलादर्शन घडविल्याबद्दल सर्व कलाकारांचे अभिनंदन.

परिसंवाद आणि पारितोषिक वितरण समारोह— दि. १९।२।८५ रोजी 'हुण्डाबंदी कायद्याने शक्य झाली' या विषयावर प्रा. सौ. मंदाकिनी जोशी पुणे यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद आयोजित करण्यात आला. याप्रसंगी १०-१२ विद्यार्थिनींनी आपली मते अत्यंत प्रभावी पणे व्यक्त केली. अध्यक्षा. प्रा. सौ. मंदाकिनी जोशी ( पुणे ) आणि प्रा. सौ आशा चिटणीस ( नंदुरबार ) ह्यांनी विद्यार्थिनींना अत्यंत आत्मीयतेने अमोल मार्गदर्शन केले. याचवेळी सौ. मंदाकिनी जोशी यांच्या शुभहस्ते विविध उपक्रमांत भाग घेऊन यशस्वी झालेल्या विद्यार्थिनींना आणि 'मुलगी झाली हो' मुक्तनाट्यांतील सर्व कलाकारांना पारितोषिके देण्यांत आली.

सहल—युवतीसभेतर्फे यावर्षी अजिंठा औरंगाबाद, जायकवाडी, पैठण इ. प्रेक्षणीय स्थळे दाखविण्यासाठी सहलींचे आयोजन करण्यात आले होते

आन्तरराष्ट्रीय महिलादिन समारंभ आणि दि. ८-३-८५ रोजी 'स्त्री मुक्ति' दिनाच्या निमित्ताने युवती सभेतर्फे जळगाव शहरांतील सुविद्य महिलांना 'स्वावलंबी स्त्रीचे परावलंबीत्व' या विषयावर आपले विचार व्यक्त करण्यासाठी आमंत्रित करण्यांत आले होते ह्या उपक्रमांत सर्व महिला उत्साहाने सहभागी झाल्याने कार्यक्रम अत्यंत यशस्वी झाला. प्रारंभी अध्यक्षा सौ. मंदाकिनी जोशी ह्यांनी गुलाब पुष्पे देवून सर्व भगिनींचे स्वागत केले. त्यानंतर डॉ. राधिका भांडारकर, प्रा. सौ. लीलावती जैन, सौ. कल्पना भुरे, सौ. वर्षा कोल्हे, डॉ. सौ. अरुणा पाटील, सौ. मंगला काबरा इ. महिलांनी अत्यंत समर्पक भाषेत आपल्या समृद्ध अनुभव विश्वाचे दर्शन घडवीले. अध्यक्षा सौ. जोशी ह्यांनी युवतीसभेच्या कार्याचा गौरव करून प्रस्तुत विषया संबंधी आपले विचार व्यक्त केले. यानंतर समारोपाच्या भाषणांत प्राचार्य डी. एस. नेमाडे ह्यांनी आमंत्रित महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव करून जीवनांत यशस्वी होण्यासाठी कसे सतत प्रयत्नशील राहिले पाहिजे या विषयी आपले विचार प्रगट केले.

आभार– वरील कार्यक्रमासाठी प्राचार्य डी. एस नेमाडे, उपप्राचार्य दि. ह. महाजन व प्रा. लता पाटणकर ह्यांनी वेळोवेळी केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल युवतीसभा त्यांची आभारी आहे. याच बरोबर प्रा. तेजपाल चौधरी, प्रा एम. एम. पाटील प्रा. जोशी, प्रा. जे. एम. अग्रवाल, प्रा. छापेकर, प्र. सोनाळकर, प्रा. गोखले, प्रा. सौ. जावळे याचे ही युवतीसभेला सतत सहकार्य लाभले आहे. तसेच कार्यलयातील कर्मचाऱ्यांचे सहकार्य मिळाले आहे. म्हणून युवतीसभा सर्वांची आभारी आहे.

डॉ. सौ. वासंती साळवेकर
( अध्यक्षा - युवतीसभा )

| | |
|---|---|
| प्रा. सुरेखा छापेकर | प्रा. सौ. अत्तरदे |
| प्रा. सौ. तळेले | प्रा. सौ. लता पाटील |
| प्रा. सौ. वाणी | प्रा. सौ. नारखेडे |
| प्रा. सौ. चित्रदास | प्रा. चौधरी |

# केमिस्ट्री असोसियशन अहवाल

या वर्षी आपल्या महाविद्यालयात विज्ञान मेळावा असल्याने केमिस्ट्री असो. वर फार जबाबदारी होती. ता. १८ नोव्हें. १९८५ रोजी प्राचार्य नेमाडे यांच्या अध्यक्ष ते खाली श्री. एस. व्ही. सोहनी ( चिफ क्वालीटी कंट्रोल ऑफीसर एजीस् केमिकल्स ) यांच्या हस्ते केमिस्ट्री असो. चे उद्घाटन झाले. त्यांनी Technology of Alcohols या विषयावर भाषण केले.

विद्यार्थ्यात रसायनशास्त्र या विषयांत गोडी निर्माण व्हावी म्हणून खालील स्पर्धा आयेजीत करण्यात आल्या होत्या.

1 ) Eassy ( 2 Project
3 ) Historical collection 4) chart compititon

निबंध स्पर्धेत खालील प्रमाणे बक्षीस देण्यात आलीत

१) राजेंद्र चौधरी ( S. Y. B. Sc )
२) पाटील एस्. एस्. ( S. Y. B. Sc )
३) बोंडे एम्. व्ही. ( T. Y. B. Sc )

जानेवारी १९ ते २१ या काळात आपल्या महाविद्यालयात विज्ञान प्रदर्शन भरले होते त्यात रसायनशास्त्र विभागातील प्रदर्शन अत्यंत उल्लेखनीय होते. या प्रदर्शनांत विविध प्रकारच्या रासायनिक अभिक्रीयेमुळे केलेल्या जादु पाहून लोक थक्क होत असत. रसायनशास्त्र विभागातील प्रदर्शनातील सर्वात मोठे आकर्षण म्हणजे S.Y. B.Sc मधील विद्यार्थीनी कु. रंजना कोल्हे, कु. वर्षा मोदी कु. मिना नेहते, कु. नयना पिंपरकर कु. ज्योती गाजरे व कु. हेमलता चिरमाडे. यांनी केलेले BombayHigh चे मॉडेल म्हणजे मुंबईत असलेल्या पेट्रोलच्या शुध्दीकरणाचे प्रकल्पाचे हुबेहूब चित्रण.

या प्रोजेक्टला केमिस्ट्री असो. तर्फे पहिल्या क्रमांकाचे बक्षीस देण्यात आले. त्याच प्रमाणे T. Y. B.Sc च्या विद्यार्थीनी कु. राजश्री बर्वे कु. संगीता येवले कु, स्मीता झांबरे, कु. सुजाता नेवे. कु. चित्रा कुलकर्णी. कु. विद्या दिवाण यांनी काचेवर हायड्रोक्लोरीक ॲसीड ने कोरलेली युरेनिअमची शृन्खला प्रक्रिया व अणु रचना हा देखावा फारच अुल्लेखनीय होता. या प्रोजेक्टला दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस देण्यात आले.

कु. संगीता काळविट हिने " India Want's atomic energy for Peace " या विषयावर चार्ट तयार केला होता यात अणूशक्ती आपण शांतते करीता व विनाशा करीता कशी वापरू शकतो याचे अुभे अुभ चित्रण केले होते यास प्रथम क्रमांकाचे पारितोषक देण्यात आले त्याच प्रमाणे कु. सुजाता नेवे हीने केलेल्या चार्ट Development of atomic stracture यास दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस देण्यात आले.

श्री नरेश शिंपी ( T. Y. B. Sc. ) यांना Historical Collection बद्दल पहिल्या क्रमांकाचे बक्षीस देण्यात आले.

रसायन विभागातील विज्ञान मेळाव्यात मोठे आकर्षण म्हणजे रासायनिय होम, डॉ हेमंत चौधरी व डॉ. शिरीष पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली

संजय दिनकर महाजन यांनी केलेला रासायनिक होम अत्यंत कुशलतेने लोकांना दाखविला श्री. महाजन यास प्रथम पारितोषीक देण्यात आले.

रसायन शास्त्र विभागातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी केमिस्ट्री असो. च्या सर्व समारंभात भाग घेऊन ते यशस्वी केले त्याच प्रमाणे सर्व विद्यार्थ्यांनी देखील उत्साहाने भाग घेऊन सर्व कार्यक्रम व्यवस्थीत पार पाडले त्या बद्दल विद्यार्थ्यांचे कौतुक करावे तेव्हडेच थोडे आहे रसायन शास्त्र प्रमुख प्रा. आर. डी. चौधरी यांचे अमोल मार्गदर्शन लाभले त्यांचे सहकार्यानेच आम्ही सर्व कार्यक्रम आनंदात पार पाडू शकलो ता. १।३।८५ रोजी म. खान्देश कॉलेज एज्युकेशन सो. चे अध्यक्ष श्री. अण्णासाहेब डॉ. जी. डी. बेंडाळे यांचे हस्ते बक्षीस समारंभ करण्यात आला.

प्रा. आर. बी. गुजराथी
चेअरमन, केमिस्ट्री असोसीयेशन

● ● ●

# फिजिक्स फोरम

यावर्षी सुरुवातीला जनरल सेक्रेटरी आणि वर्गप्रतिनिधी याची निवड करण्यात आली. निवडणूक होऊन खालील प्रतिनिधी फिजिक्स फोरमच्या कार्यकारिणीवर निवडून आले.

जनरल सेक्रेटरी — श्री. एस्. एल. चौधरी ( टी. वाय्. बी. एस् सी. ) वर्गप्रतिनिधी—
१) टी. वाय्. बी. एस्. सी.–श्री. व्ही.आर खडसे.
२) एस्. वाय्. बी. एस.सी.–श्री. व्ही. जी. व्यवहारे
३) एफ. वाय. बी. एस. सी– श्री. एन. के. खडके ( ए. डिव्हीजन)
४) एफ. वाय. बी. एस सी– श्री. आर. पी. बारी. ( बी डिव्हीजन )

विद्यार्थिनी प्रतिनिधी – कु. स्मिता एल. नेमाडे

जनरल सेक्रेटरी श्री. एस. एस चौधरी नंतर महाविद्यालयात न आल्याने त्यांचे जागी श्री. आर. एस. नेमाडे यांनी प्रभारी जनरल सेक्रेटरी म्हणून काम पाहिले.

यावर्षी फोरमच्या कार्यक्रमाचे उदघाटन पुणे विद्यापिठाच्या संख्याशास्त्र विभागातील प्रा. डॉ. काळे यांच्या हस्ते झाले. उदघाटनप्रसंगी त्यांनी "Examination Reforms" या विषयावर उद्बोधक असे व्याख्यान दिले या समारंभाचे अध्यक्ष प्राचार्य डी. एस. नेमाडे यांनी भूषविले होते.

यावर्षी आकाशवाणी मुंबई 'आकाशवाणी जळगाव तसेच आमचे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने विज्ञान मेळावा आयोजित करण्यात आला होता. या निमित्ताने आमच्या महाविद्यालयात विज्ञान प्रदर्शन आयोजित केले होते. विज्ञान प्रदर्शनात आमच्या फोरमच्या वतीने अनेक प्रकल्प तसेच शास्त्रीय प्रयोग ठेवण्यात आले होते. विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांचा काम करण्याचा उत्साह वाखाण्याजोगा होता.

नेहमीप्रमाणे या वर्षीही सोळा मि. मि. प्रोजेक्टरवर अनेक शास्त्रीय फिल्मस् विद्यार्थ्यांना दाखविण्यात आल्या. तसेच तीन तासांचा 'बेगुमान' नावाचा चित्रपटही विद्यार्थ्यांना प्रोजेक्टरवर दाखविण्यात आला.

आम्ही या वर्षी एक दिवसाची सहल अजिंठा येथे आयोजित केली होती.

फोरमच्या समारोप प्रसंगी आम्ही पारितोषिक वितरणाचा समारंभ आयोजित केला होता. पारितोषिक वितरण समारंभाचे प्रमुख पाहुणे श्री. बी. डी. चौधरी रिटायर्ड डायरेक्टर ऑफ टेक्निकल एज्युकेशन, महाराष्ट्र राज्य पाहुण्यांच्या हस्ते पहिले, तिसरे आणि पाचवेसत्र यात भौतिकी शास्त्रात प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांना फोरमतर्फे पारितोषिके देण्यात आली. तसेच विज्ञान प्रदर्शनात ज्यांचे प्रकल्प होते त्यातील खालील तीन विद्यार्थ्यांना बक्षिसे आणि सर्टिफिकीटस् देण्यात आली.

१] पहिले बक्षिस– श्री. एम. आर. चौधरी Transmitter या प्रकल्पाबद्दल
२] दुसरे बक्षिस– श्री. आर. एस. नेमाडे Chirpping bell या प्रकल्पाबद्दल
३] तिसरे बक्षिस– श्री. एम. एन. लिधुरे Piano या प्रकल्पाबद्दल

त्याचप्रमाणे विज्ञान प्रदर्शनात ज्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला त्यांनाही प्रमाण पत्रे वाटण्यात आली.

फोरमच्या सर्व कार्यात ज्या ज्या व्यक्तिचे प्रत्यक्षाप्रत्यक्ष सहकार्य लाभले त्याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत.

आर. एस. नेमाडे
प्रभारी जनरल सेक्रेटरी

एम. के. येवले
चेअरमन
फिजिक्स फोरम

● ● ●

# जीवशास्त्र मंडळ

जीवशास्त्र मंडळाच्या चेअरमन पदाची जबाबदारी प्रा. डॉ एकनाथ वाठ यांचेवर सोपविण्यात आली. विद्यार्थ्यांची विज्ञान अभिरुची वाढविण्यांच्या दृष्टीकोनातून तसेच शास्त्रीय विचारांचे क्षितीज रुंदावण्यासाठी अनेक उपक्रमाद्वारे विविध कार्यक्रमाचे आयोजन केले गेले.

सर्वप्रथम वर्गप्रतिनिधी व जनरल सेक्रेटरीची निवड करण्यांत आली. सर्वच प्रतिनिधींची बिनविरोध निवड करण्यात आली.

जनरल सेक्रेटरी– कु. प्रतिभा झंवर
टी. वाय. बी. एस्सी ( वनस्पती शास्त्र )
वर्ग प्रतिनिधी—
१) कु. बी. रमामणी (एम. एस्सी. सिनिअर)
२) श्री. सुभाष चौधरी (एम. एस्सी. ज्युनिअर)
३) श्री. विलास बोरोले ( टी. वाय. बी. एस्सी. प्राणिशास्त्र )
४) कु. प्रतिभा झंवर टी. वाय. बी. एस्सी. वनस्पतीशास्त्र )
५) श्री. संजय महाजन (एस. वाय. बी. एस्सी. )
६) श्री. गोपाळ पाटील (एफ. वाय. बी. एस्सी. )

विद्यार्थिनी प्रतिनिधी– कु. माधुरी नाईक

यावर्षी जीवशास्त्र मंडळाचे उद्घाटन जळगाव येथील सुप्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ. के. डी. पाटील यांचे शुभहस्ते झाले. त्यांनी 'Heart and its diseases' ह्या विषयावर सविस्तर माहितीप्रद असे व्याख्यान

दिले. उद्घाटन समारंभाचे अध्यक्षस्थान आमचे आदरणीय प्राचार्य डी. एस. नेमाडे यांनी भूषविले होते. या कार्यक्रमाला संस्थेचे माजी चेअरमन आदरणीय श्री. भाईसाहेब महाजन, खासदार यांची उपस्थिती विशेष उल्लेखनीय होती.

या मंडळाने विद्यार्थ्यांसाठी पुढील कार्यक्रम आयोजित केले

आपले महाविद्यालय; आकाशवाणी जळगाव; आकाशवाणी मुंबई यांचे वतीने विज्ञान संमेलन पार पडले. सोबतच विज्ञान प्रदर्शन भरविण्यांत आले. जीवशास्त्र मंडळाने त्यात हिरीरीने भाग घेतला. विज्ञान प्रदर्शनांत प्राणिशास्त्र व वनस्पती शास्त्र विभागाने आपआपले प्रादर्शिक ठेवले होते.

तसेच डॉ. गिरी यांचे "कुष्ठरोग व निवारण" या विषयावर प्रात्यक्षिकांसहित बोधप्रद माहिती सांगितली व नंतर प्रश्नोतरांचा कार्यक्रम होवून शंकेचे निरसन केले.

वर्षभर सातत्याने त्यात खंड पडू न देता प्रा. डॉ. पी. आय. चौधरी, वनस्पती शास्त्र विभाग व प्रा. बी. के. परदेशी यांनी विद्यार्थ्यांकरिता शास्त्रीय ज्ञानाची भित्तीपत्रके "Fragrance" ह्या शिर्षकाखाली सूचना फलकांवर लावली व विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडली,

दि. ११-३-८५ रोजी "जायकवाडी" येथे प्रा. एल. एन. मुलबागल व प्रा. आर. पी. चौधरी प्रा. डॉ. सी. विप्रदास यांचे मार्गदर्शनाखाली सहल आयोजित केली होती.

जीवशास्त्र मंडळाच्या सभासदांना एक चित्रपट दाखविण्यात आला.

दि. ३-३-८५ ला "जीवशास्त्र दिवस" चा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमांस प्राचार्य डी. एस. नेमाडे, उपप्राचार्य डी. एच. महाजन बायॉलॉजी स्टाफस् ( सहकुटुंब ) आमंत्रित प्राध्यापक, एम. एस्सी. सिनिअर, ज्युनिअर प्राणिशास्त्राचे विद्यार्थी टी. बी. एस्सी प्राणिशास्त्र, वनस्पतीशास्त्राचे विद्यार्थी यांनी भाग घेतला होता.

जीवशास्त्र मंडळाच्या सर्व कार्यक्रमांना प्राचार्य, उपप्राचार्य, तसेच माझे सहकारी प्राध्यापक व सर्व वर्गप्रतिनिधींनी वेळोवेळी अमोल सहकार्य दिले. या सर्वांचे मी मनःपूर्वक जीवशास्त्र मंडळातर्फे आभार मानतो.

प्रत्यक्षाप्रत्यक्ष मिळालेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञ आहोत.

कु. प्रतिभा झवर
जनरल सेक्रेटरी
जीवशास्त्र मंडळ.

प्रा. डॉ. एकनाथ वाठ
चेअरमन
जीवशास्त्र मंडळ

● ● ●

## साहित्य मंडळ आणि शलाका

साहित्य आणि वाङ्मय या बद्दलची विद्यार्थ्यांची अभिरूची अधिकाधिक संपन्न करता यावी या दृष्टिकोनातून साहित्य - मंडळामार्फत विविध प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेत.

या वर्षी साहित्य - मंडळाच्या कार्याचा शुभारंभ प्रा. श्रीराम पुजारी यांच्या "जीवन आणि विनोद" या उद्‌बोधक भाषणाने झाली. त्याबरोबरच

१ डॉ. भालचंद्र फडके, पुणे यांचे दूरदर्शन प्रकल्पा संबंधीचे व्याख्यान झाले.

२ डॉ. मु. श्री. कानडे पुणे यांचे 'संगीत-सौभद्र' या विषयावरील भाषण

३ प्रा. श्री. प्र. ई. सोनकांबळे यांनी "आठवणींचे पक्षी" या पुस्तकावर विद्यार्थी आणि प्राध्यापक यांचेशी केलेली चर्चा व भाषण

४ प्रा. सौ. निशा पाटील यांच्या उपस्थितीत श्री. पु. ल. देशपांडे गोळा बेरीज या विषयावलील चर्चा

५ प्रा. सौ. उषा-सावंत, प्रा. कु. सुरेखा छापेकर प्रा. सौ. चौधरी यांनी अनुक्रमे 'बोरकरांची कविता' इंदिरा संत यांचा पारितोषिक काव्य संग्रह गर्भ रेशीम आणि, नारायण सुर्वे लिखित 'सनद' या पुस्तकां-वरील भाषणे.

६ प्रा. य. प्र. कुळकर्णी नाशिक विद्यार्थी आणि प्राध्यापकांशी चर्चा

७ विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या कथाकथन, काव्य वाचन, अभंग गायन, निबंध लेखन इत्यादी स्पर्धा.

असे विविध स्वरूपाचे उपयुक्त कार्यक्रम साहित्य मंडळाचे वतीने राबविण्यात आलेत.

कथाकथन, काव्य गायन अभंगगायन आणि निबंध स्पर्धेत पुढील स्पर्धा यशस्वी ठरते.

| | | |
|---|---|---|
| १ कथाकथन- | क्र. १ | कु. कल्पना रमेश जोशी |
| | क्र. २ | रवीन्द्र माधवराव मोराणकर |
| २ काव्यगायन- | क्र. १ | कु. वंदना विठ्ठलराव पाटील |
| | क्र. २ | चौबे जयप्रकाश नरोत्तम |
| ३ अभंग-गायन | क्र. १ | राम वसंतराव देशपांडे |
| | क्र. २ | नितीन विजय केंकरे |
| ४ निबंध-लेखन | क्र. १ | सौ. आडगावकर |
| | क्र. २ | प्रभाकर चौधरी. |

साहित्य मंडळाचा एक भाग म्हणून दरवर्षी 'शलाका' ही चक्रमुद्रित भित्तिपत्रिका दरवर्षी केली जाते. यंदाचे हे वर्ष आंतरराष्ट्रीय युवक-वर्ष म्हणून 'युनो' तर्फे जाहीर करण्यात आल्यामुळे या वर्षातील सहभागाचा एक प्रयत्न म्हणून 'शलाका' या भित्तिपत्रिकेचा एक दर्जेदार असा युवा-विशेषांक प्रसिद्ध करण्यात आला.

या सर्व कार्यक्रमांच्या आयोजनासाठी संबंधित व्यक्तींच्या लाभलेल्या सहकार्याबद्दल आभार !

(प्रमुख)
प्रा. सु. का. जोशी
प्रा. तेजपाल चौधरी
प्रा. श. मु. छापेकर
प्रा. शा. न पाटील

विद्यार्थीप्रतिनिधी-

श्री. प्रभाकर चौधरी [ साहित्य मंडळ ]
श्री. रमेश भोळे [ शलाका ]
श्री. सुबोध सराफ [ शलाका ]

● ● ●

## वादविवाद मंडळ

विद्यार्थ्यांमधील वक्तृत्व गुणांना उत्तेजन मिळावे आणि आपले विचार प्रभावीपणानं मांडता

येण्याची कला त्यांना आत्मसात करता यावी. एखाद्या समस्येच्या सर्व बाजूंनी विचार करून अभ्यास पूर्ण असं स्वतःच मत मोठ्या आत्मविश्वासानं आणि निभिडपणानं मांडता येण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण करता यावी या उद्दिष्टांत वाद-विवाद मंडळाच्या कार्यक्रमाचं स्वरूप निश्चित करण्यात आले

जळगाव शहरातील आणि शहराबाहेरील विविध ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या आंतरमहाविद्यालयातील वाद-विवाद स्पर्धा आणि वक्तृत्व स्पर्धात सहभागी होण्यासाठी महाविद्यालयाचे संघ पाठविण्यात आलेत.

विद्यार्थ्यांना काही-प्रचलित समस्यांवर आधारित असलेले विषय अभ्यासासाठी देऊन त्यांचेशी अनौपचारिक चर्चा घडवून आणण्याचा प्रयत्न हे यंदाच्या वाद-विवाद मंडळाच्या कार्यक्रमाचं प्रमुख वैशिष्ठ्य म्हणावं लागेल. या उपक्रमाला विद्यार्थ्यांनी पुष्कळसा अनुकुल प्रतिसाद दिला.

पुणे विद्यापीठातील दूर दर्शन विभागाचे प्रमुख डॉ. भालचंद्र फडके आणि श्री. वि. न. पंडित निवृत्त प्रशिक्षण अधिकारी आणि विकास अधिकारी आयुर्विमा महामंडळ (नाशिक-विभाग) यांची मार्गदर्शनपर व्याख्यानेही आयोजित करण्यात आली. या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना उपयुक्त अशी बरीच माहिती मिळू शकली.

प्रमुख–

प्रा. श. मु. छापेकर
प्रा. टी. के. अत्तरदे
प्रा. एन. व्ही भारंबे
प्रा. एम. एम. परदेशी
प्रा. एम. एल. पाटील
प्रा. श्रीराम जोशी

प्रा. प्रकाश चौधरी
प्रा. शा. न. पाटील

विद्यार्थी प्रतिनिधी– श्री. संदीप चिंतामणी
श्री. कौस्तुभ परांजपे

• • •

# मानसशास्त्र विभाग

मानसशास्त्राचा मानवी जीवनाशी अत्यंत जवळी कतेचा संबंध असल्यामुळे अनेक वर्षांपासून हा विषय महाविद्यालयात शिकविण्यात येतो. सामान्य मानसशास्त्र, सामाजिक मानसशास्त्र, मानवीजीवनात मानसशास्त्र मनोविकृतीशास्त्र, शैक्षणिक मानसशास्त्र उपयोजित मानसशास्त्र इ. विषय ११वी पासून पदवी-पर्यंत शिकविण्यात येतात.

विशेष बाब म्हणजे द्वितीय व तृतिय वर्ष कला या वर्गासाठी विशेष स्तरावर मानसशास्त्र विषय जून १९८४ पासून सुरु करण्यात आला. तृतिय वर्षं या वर्गासाठी आवश्यक असणारी अद्ययावत प्रयोगशाळा जून १९८५ पासून उभारण्यात येत आहे. तसेच मानसशास्त्राचे ज्ञान संपादनासाठी आवश्यक व महत्त्वपूर्ण पुस्तकेही महाविद्यालयाच्या ग्रंथालयात संग्रही करण्यात आली आहेत.

"ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा व्यक्तीमत्व विकास" पुणे विद्यापीठ या विषयावरील परिसंवादात प्रा. सुभाष राणे यांनी भाग घेवून डॉ. सी. जी. देशपांडेशी चर्चा केली. पालक-बालक संबंध व्यक्तीमत्व विकास मानवी जीवनात मानसशास्त्राचे महत्व इ. विषयावर डॉ. एस. डब्लू देशपांडे पुणे विद्यापीठ डॉ. सी. जी. देशपांडे पुणे विद्यापीठ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच पुणे विद्यापिठ, मानसशास्त्र अभ्यासक्रम मंडळाचे अध्यक्ष प्रा. ए. जी. चिटणिस यांनी मानसशास्त्र विभागाला भेट देवुन प्रशंसोदगार काढले. वेळोवेळी प्राचार्य डी. एस. नेमाडे उपप्राचार्य डी. एच महाजन यांचे मार्गदर्शन लाभले.

प्रा. एस. एस. राणे
प्रमुख

• • •

# एन. एन. सी. अहवाल
## १९८४–८५

दरवर्षाप्रमाणे यंदाही ३७२ विद्यार्थी/विद्यार्थीनींनी एन सी. सी. चे ट्रेनिंग पूर्ण केले

रक्तदान, वृक्षारोपण व इतर सामाजिक उपक्रमात महाविद्यालयातील एन. सी. सी. च्या विद्यार्थी। विद्यार्थिनींनी बहुसंख्येने सक्रीय भाग घेतला.

युवक सप्ताहात सर्व विद्यार्थ्यांनी जळगाव येथील अंध शाळेत स्वच्छता मोहीम राबविली.

या वर्षी विद्यार्थ्यांचे वार्षिक प्रशिक्षण शिबिर शेगाव येथे पार पडले तर अमरावती येथे विद्यार्थीनींचे वार्षिक प्रशिक्षण शिबीर संपन्न झाले.

१५ आगष्ट स्वातंत्र्यदिनी प्राचार्य नेमाडे यांच्या हस्ते ध्वजारोहन समारंभ पार पडला.

या वर्षी पुढील प्रमाणे वेगवेगळया कॅम्पमध्ये सहभागी होवून विद्यार्थ्यांनी प्राविण्य दाखविले.

आर्मी अटॅचमेंट नगर U/o एस. टी. जुनागडे जयराज छपरीबंद, एम. आर. शर्मा बी. एस. नागरिक ATC नासिक एस. पी. पाटील, गिर्यारोहक शिबिर उत्तर प्रदेशातील उत्तर काशी येथील शिबिरात U/o जे. आर छपरीबंद याने विशेष प्राविण्य दाखविले.

बेसिक कँम्प बेळगाव कु. बिऱ्हाडे Pre R. D. यवतमाळ येथे कु. शर्मिला शर्मा हिने विशेष नैपुण्य दाखविले.

वणी येथील ट्रेकिंग कँम्पला कु. खैरुन्नीसा पटेल, कु. बिऱ्हाडे कु. बडगुजर कु. योगिनी सरोदे या विद्यार्थिनी सहभागी झाल्या. आर्मी अटॅचमेंट कॅम्प कामठी येथे कु. योगिनी सरोदे व कु. अलपना सैनी यांची निवड झाली होती.

बास्केटबॉल या खेळात कु. बाहेकर, कु. नयना लढ्ढा यांनी प्रशंसनीय प्राविण्य दाखविले.

२६ जाने १९८५ रोजी प्राचार्य नेमाडे यांनी ध्वजारोहण करून एन. सी. सी. च्या जवानांकडून मानवंदना स्वीकारली. परेडचे संचालन S/Uo मोहम्मद शफी पटेल याने केले. प्राचार्यांच्या हस्ते खालील विद्यार्थ्यांना मेडल्स दिलेत.

बेस्ट सिनिअर U/o एम. ए. पटेल.
बेस्ट U/o एस. टी. जुनागडे.

मॅपरिडिंग U/o जे. आर. छपरीबंद.
बेस्ट रँक होल्डर CPL एम. आर. खारूल.
बेस्ट कॅडेट एम. जी. शर्मा.
फर्स्ट इन क्लास कंट्री व्ही. ओ. इंगळे.

बेस्ट सर्व्हिस इन एन. सी. सी. Sgt / व्ही. आर. पाटील. विद्यार्थिनीमध्ये खालील प्रमाणे मेडल्स दिलेत १) बेल्ट कॅडेट कु. वंदना लड्ढा २) बेस्ट फायरर L/c अुज्वला कोतवाल ३) बेस्ट सर्व्हिस इन एन.सी.सी. Sgt योगिनी सरोदे, ४) फर्स्ट इन क्लास कंट्री CPL सोनाली पोतनीस फर्स्ट इन एड कॅडेट तेजास्विनी दीक्षित व बेस्ट रँक होल्डर U/o खैरुन्निसा पटेल. एन.सी.सी.च्या अे. बी. व सी. परिक्षेचा निकाल नेहमीप्रमाणे १०० % लागला.

एन.सी.सी. ऑफीसर L+ ए. पी. चौधरी यांनी रेक्टर शिपच्या जबाबदारीमुळे एन सी.सी. चा राजीनामा दिला तरी त्यांचे सदैव मार्गदर्शन नक्कीच लाभेल यात शंका नाही.

एन.एस.ए. प्रमुख सर्व विभाग प्रमुख यांनी वेळोवेळी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार.

भूगोल विभाग प्रमुख प्रा. एस. डी. सिरसीकर व सहकारी प्राध्यापक यांच्या सहकार्याबद्दल आभारी आहोत.

लेफ्टनंट एस. एम. रडे
लेफ्टनंट सौ. एम. एम. जावळे
व सर्व अंडर ऑफीसर्स करिता.

● ● ●

# वसतीगृह अहवाल ८४–८५

१९८४–८५ या वर्षी विद्यार्थी विद्यार्थिनींच्या वसतिगृहात अनेक सुधारणा करण्यात आल्या. विद्यार्थ्यांना आपल्या जीवनात वेगवेगळ्या गोष्टी शिकता याव्या व चांगले मार्गदर्शन लाभावे म्हणून वसतीगृहात अनेक कार्यक्रम आयोजित केले गेले.

सिनेकलावंत "दत्तोपंत दराडे" यांनी नाट्यछटा व विनोदपूर्ण प्रसंग विद्यार्थ्यांपुढे सादर करुन त्यांचे मनोरंजन केले. विद्यार्थिनींसाठी डॉ. सौ. अरूणा पाटील यांचे 'स्त्रिया व त्यांना होणारे रोग' या विषयावर मार्मिक भाषण झाले. त्याच्या विवेचनातून विद्यार्थिनींच्या शंकाचे निसरन झाले. प्रा. रा. वा. पाटील यांचे "मानवी जीवन व काव्य" या विषयावर उदबोधक मार्गदर्शन लाभले. सौ. बंदना गोखले यांनी "योगासन" या विषया बद्दल माहिती देऊन स्पष्ट करून दिले की मानवी जीवन व योगासन हे कसे परस्पर निगडीत आहे त्यांनी योगासनाचे प्रात्यक्षिक सुद्धा करून दाखविले. सौ. सुलभा शालीग्राम यांनी "सौन्दर्य कायम कसे राखता येते" याबद्दल माहिती देऊन फेशियल करण्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले.

"आंतरराष्ट्रीय युवा वर्षा निमित्त वसतीगृहातील विद्यार्थी–विद्यार्थीनींनी श्रमदान केले. "युवक-युवतींचे देशासाठी कर्तव्य कोणते." तसेच राष्ट्रीय एकात्मता कशी आणता येईल यासाठी श्री. तोताराम यांनी स्वरचित स्वातंत्र्यगीते गाऊन दाखविली. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या मनात देशाबद्दल आपुलकीची भावना निर्माण झाली. यावर्षी वसतीगृहाच्या आवारात वृक्षारोपणाचा कार्यक्रमही पार पडला. प्रा. निवळीकरांचे "प्रौढशिक्षणात युवा-युवतींचे कर्तव्य" या विषयावर स्तुत्य भाषण झाले.

विजया दशमीच्या शुभ दिनी दर वर्षाप्रमाणे यावर्षी सुद्धा मेसमधील कर्मचाऱ्यांना विद्यार्थी–विद्यार्थिनीं कडून ज्या भेट वस्तू व कपडे देण्यात आले त्यांचे वाटप प्राचार्य नेमाडे यांच्या हस्ते झाले. गरीब व हुशार, होतकरू विद्यार्थ्यांसाठी "कमवा व शिका" ही योजना आहे ह्या योजनेचा अनेक विद्यार्थ्यांनी लाभ घेतला वसतिगृहातील शिपाई मावळे यांचे अचानक दुःखद निधना बद्दल विद्यार्थ्यांनी श्रद्धांजली वाहिली व त्यांच्या कुटुंबियांना आपापल्या परीने आर्थिक मदत केली. विद्यार्थी–विद्यार्थिनींचे एक दिवसाचे स्नेहसंमेलन घेण्यात आले. होते. या दिवशी सहभोजनाचा कार्यक्रमही चांगल्या रितीने पार पडला.

वसतीगृहातील निरनिराळ्या कार्यक्रमांना प्राचार्य नेमाडे, उपप्राचार्य डी. एच. महाजन, प्रा. व्ही. जे. चौधरी, प्रा. बी. एस. महाजन, व इतर प्राध्यापक उपस्तित राहून वेळोवेळी मार्गदर्शन केले. तसेच सहकार्य केले याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

वसतीगृह प्रमुख
**प्रा. अे. पी. चौधरी**
**प्रा. सौ. मालती जावळे**

● ● ●

# ग्रंथालय वार्ता

सुसज्ज आणि अद्ययावत ग्रंथ संग्रह असलेले ग्रंथालय हे चांगल्या आणि आदर्श शिक्षण संस्थेचे एक महत्वाचे अंग असते या संदर्भात आमच्या महाविद्यालयाचे एक उत्तम उदाहरण म्हणून सांगता येईल.

दर वर्षाप्रमाणे १९८४–८५ या वर्षात विविध विषयावरील २७४४ ग्रंथ विकत घेण्यात आले. विद्यापीठ अनुदान मंडळाकडून, यु. जी. सी. ग्रँट, पी. जी डी. ग्रँट आणि बेसिक ग्रँट या योजनांतर्गत ही खरेदी करण्यात आली. त्यामुळे आधिच्याच विपुल, समृध्द ग्रंथ संभारात आणखीनच मोलाची भर पडली. आज मितीला ग्रंथालयातील ग्रंथसंख्या ७६१२९ झालेली आहे.

नेहमीप्रमाणे ग्रंथालयातील अभ्यासिका सकाळी ७–३० ते संध्याकाळी ५ पर्यन्त व संध्याकाळी ७ ते रात्री १० पर्यंत अशी सतत उघडी असते. वसतिगृहातील व महाविद्यालयाच्या परिसरात राहणाऱ्या बहुसंख्य विद्यार्थ्यांना या अभ्यासिकेचा लाभ होत

असतो. गावातील विद्यार्थ्यांनाही अभ्यासाच्या सोयीसाठी रात्री ७ते१० पर्यंत ला. ना. सार्वजनिक विद्यालयात अभ्यासिकेची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.

१) पुस्तक पेढी योजनेतून जवळ जवळ १२५ विद्यार्थ्यांना पुस्तके देण्यात आली.

२) एस. वाय. बी. ए. व टी. वाय. बी. ए. मराठी स्पेशल आणि संस्कृत स्पेशल घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वर्षभर अभ्यास करण्यासाठी पुस्तके देण्यात आली.

३) विद्यार्थ्यांना अभ्यासात उपयुक्त अशी नियतकालिके अभ्यासिकेत ठेवण्यात येतात.

४) ज्यूनिअर कॉलेजमधील विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाची गोडी लागावी म्हणून अक्षर मेवा योजना कार्यान्वित केली. मराठीतील श्रेष्ठ व ज्येष्ठ लेखकांचे उत्तमोत्तम ग्रंथ विद्यार्थ्यांना वाचता यावेत यासाठी अभ्यासिकेत ठेवण्यात आले. गडकरी जन्मशताब्दिनिमित्त गडकऱ्यांचे ग्रंथ विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आले.

वरील योजनांप्रमाणे विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरतील अशा विविध योजना वेळोवेळी विद्यार्थी, प्राध्यापक यांच्या सहकार्याने राबविता येतात. ग्रंथाप्रमाणेच विविध विषयांच्या अभ्यासासाठी संदर्भ म्हणून नियतकालिकेही मागविली जातात.

ग्रंथालयाचे कामकाज सुविहितपणे वर्षभर चालू असते. या कामी सर्वांचा चांगला प्रतिसाद व सहकार्य मिळत असते; प्राचार्य डी. एस. नेमाडे, उप-प्राचार्य डी. एच. महाजन, लायब्ररी इन्चार्ज डॉ. सु. रा. चिरमाडे, ग्रंथालय समितीतील सर्व सदस्य प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी वर्ग व ग्रंथालयातील सर्व कर्मचारी वर्ग या सर्वांचे हार्दिक सहकार्य लाभले, त्याबद्दल त्यांचे हार्दिक आभार.

पी. डी. बऱ्हाटे
ग्रंथपाल प्रमुख

# कला व वाणिज्य मंडळ कनिष्ठ महाविद्यालय

१) वाणिज्य मंडळाचे चेअरमन म्हणून या वर्षी प्रा. आर. जी. गुजराथी यांची व कला मंडळाचे चेअरमन म्हणून प्रा. एस. ओ. उमाळे यांची नियुक्ती करण्यात आली.

२) सालाबादप्रमाणे यावर्षी कनिष्ठ महाविद्यालयाच्या निवडणुका उत्साहाने व शांततेने पार पडल्या. वाणिज्य मंडळाचे जी. एस. म्हणून अमृत सोनवणे व कलामंडळाचे जी. एस. म्हणून खडके निवृत्ती चुनीलाल हे निवडून आले. विद्यार्थीनी प्रतिनीधी म्हणून खिमानी रोशमीन एस. ( ११वी कला ) व कु छाया भाटिया, कु. साधना ब्रियणी या वाणिज्य मंडळातर्फे निवडून आल्या.

३) कलामंडळाचे उद्घाटन भडगाव कॉलेजचे प्राचार्य राम शिंदे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. वाणिज्यमंडळाचे उद्घाटन खान्देश एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन अण्णासाहेब डॉ. जी. डी. बेंडाळे यांच्या शुभहस्ते झाले. त्यानंतरचे वर्ष-भरचे भरगच्च कार्यक्रम संयुक्तपणे करण्यात आले.

सुप्रसिद्ध दलित साहित्यीक व उपप्राचार्य प्र. ई. सोनकांबळे यांनी आपल्या जीवनातील व साहित्यातील दाहक पण वास्तव अनुभूतींचा प्रभावी अविष्कार आपल्या भाषणातून केला.

सरकारी महाविद्यालय औरंगाबाद येथील प्राचार्य माहोळकर यांचे " सिनेमातील गाणी व त्यांच्या वास्तवतेशी संबंध " या विषयावर प्रभावी भाषण झाले.

सुप्रसिद्ध शेतीतज्ञ देवरामभाऊ नारखेडे यांनी आपल्या जीवनातील रोमांचकारी अनुभव सांगून विद्यार्थ्यांनी साहसी जीवन जगण्याचे आवाहन केले.

यावर्षी ' आजचा तरुण आजच्या समस्या सोडविण्यास समर्थ आहे का' ? या विषयावर चुरशीची वादविवाद स्पर्धा आयोजित करण्यांत आली. त्यात नूतन व मु. जे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी हिरीरीने भाग घेतला.

शाहीर तोताराम कोळंबे यांनी विविध गीतांच्या गायनाचा कार्यक्रम सादर केला.

श्री. जी. डी. कुळकर्णी यांनी युद्धभूमीवरील स्वतःचे अनुभव व प्रवासवर्णनाचे प्रत्ययकारी वर्णन केले.

सालाबादप्रमाणे यावर्षीही दोन दिवसाच्या स्नेहसंमेलनाचा बहारदार कार्यक्रम झाला. त्यात अनेक विद्यार्थी कलावंतांनी भाग घेतला होता.

आर. जी. गुजराथी
चेअरमन
कला मंडळ कनिष्ठ महाविद्यालय.

एस. ओ. उमाडे.
चेअरमन
वाणिज्य मंडळ मु. जे.
कनिष्ठ महाविद्यालय


श्री स्वामी समर्थ
इंडस्ट्रीयल
इलेक्ट्रोप्लेटर्स

ऑफीस
१७५ भवानी पेठ
झाशी पुतळा, बेंडाळे चौक,
आठवडे बाजार जवळ,
जळगाव ४२५००१



वर्क्स
प्लॉट नं. १९ सदाशिव नगर
एम. आय. डी सी.
काशीनाथ लॉज समोर
जळगाव ४२५००३

हितेंद्र प्रोव्हीजन्स

वैशिष्टे:-
* किराणा
* जनरल
* स्टेशनरी

१०, लेवाबोर्डींग शॉपींगसेंटर
जळगाव. ४२५००१

इथं नाविण्य जन्म घेतं !
* साजन सरिता *

कापडाचे भव्य शो रुम
स्टेशन रोड, जळगाव
☎ ५४१८

बेकारी टाळा
आजच नावे नोंदवा
मोटार ड्रायव्हींग शिका.
हेवी ट्रक, फीयाटकार, ॲटो-रिक्षा

रमेश मोटार ड्रायव्हींग स्कुल
☎ ३३८०

१९, खान्देश मील कॉम्लेक्स पिंप्राळा रोड,
जळगाव ४२५००१
( लेडीज साठी स्वतंत्र्य व्यवस्या )

वृक्षलावा
सौंदर्य वाढवा
गार्डनिंग स्पेशालिस्ट
सर्व प्रकारची फुले व रोपे मिळतील

नारखेडे फार्म
एम. जे. कॉलेज रोड
बहिणाबाई उदयाना शेजारी जळगाव

संपर्क- नारखेडे ब्रदर्स ॲन्ड सन्स
गार्डनिंग ॲन्ड सिव्हील कान्ट्राक्टर




डॉ. अण्णासाहेब बेंडाळे – विज्ञानप्रदर्शनाचे उद्घाटन करताना



विद्यार्थी प्रतिनीधी (C. R.) १९८४-८५

# SHOE CENTRE

**295, MAHATMA GANDHI ROAD**
**JALGAON 425 001**

**२१ व्या शतकातील फॅशनची कमाल**

# शू सेंटरमध्येच

## शू सेंटर

२९५, महत्मा गांधी रोड
(महापालीके जवळ)
जळगाव ४२५ ००१